म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ना.वा.
दा. क्र. १९६६

IRBK-0101966

IRBK-0101966

21 MAR 1972

क्र। १६६८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

"प्रभात" च्या दौलतीचे

**माधवराव** **रामशास्त्री**

आणि

**श्री० दामले** **श्री० फत्तेलाल**

ह्यांनींच रजतपटावर निर्माण केलेला हा

**रामशास्त्री**

मी त्यांनाच अर्पण करतों.

—शिवराम श्री. वाशीकर

IRBK-0101966
IRBK-0101966

महाराष्ट्राच्या इतिहासांतील एका उज्ज्वल प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर, पुण्याच्या प्रभात फिल्म कंपनीनें "रामशास्त्री" चित्रपट निर्माण केला. त्याचीच ही कथा, चित्रपटाच्या रौप्य महोत्सवाच्या शुभप्रसंगीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे, हें पाहून मला पराकाष्ठेचा आनंद होतो. चित्रपटाच्या मूळ कथाप्रसंगांत कांहीं ठिकाणीं मीं भर घातली आहे तर कांहीं ठिकाणचे प्रसंग कमी केले आहेत. चित्रपटाच्या कथानकाचा पूर्ण आधार घेऊन ही कथा लिहिण्यास परवानगी दिल्याबद्दल आणि कथेचें सौंदर्य वाढविण्यास प्रत्यक्ष प्रसंगांचे फोटो दिल्याबद्दल आम्ही — मी स्वतः व प्रकाशक श्री. के. भि. ढवळे — कंपनीचे फार आभारी आहोंत.

शिवराम श्री. वाशीकर

मुंबई १५ डिसेंबर, १९४४

# १

हे चातुर्मासाचे दिवस म्हणजे माहुली क्षेत्राच्या ब्रह्मवृंदाला भाग्याचे दिवस वाटतात. मुलुखागिरी करणारे शिपाईगडी, किंवा पंतप्रधान पेशवे, यांना तरवार टाकून देवधर्म करायला याच वेळीं सवड असते. कृष्णाबाईचा उत्सव, पेशव्यांची वार्षिक दक्षणा, अनगळ सावकारांचें वाटप, असें कांहीं ना कांहीं याच सुमारास असल्यामुळें माहुलीचा ब्रह्मवृंद या वेळीं मोठा प्रसन्नचित्त असतो. आजचाही प्रसंग त्यांतलाच होता. पेशव्यांची वार्षिक दक्षणा वाटण्याचा आजचा दिवस होता. निरनिराळ्या ठिकाणांहून व निरनिराळ्या क्षेत्रांहून नाना शास्त्रांत पढलेले मोठमोठे शास्त्री आले होते. तसेंच "रामो हरिः"पासून संस्कृत अध्ययनाला सुरुवात करणारे भावि शास्त्रीही दक्षणा घेण्यासाठीं आज येथें आले होते.

महादेवाच्या पिंडीला चाललेला अभिषेक संपला होता व जमलेले ब्राह्मण दोन रांगांनीं उभे राहून राष्ट्रीय प्रार्थना करीत होते. प्रार्थनेचा स्वर हळू हळू वाढूं लागला. आतां तर प्रार्थनेचा स्वर वाढविण्याची स्पर्धाच लागली. "तदप्येषः श्लोकोभिगीतो मरुतः" येथून तर त्यांचा स्वर आकाशभेदी होऊं लागला. "आमच्या साम्राज्या" साठीं प्रार्थना करण्यांत सगळा ब्रह्मवृंद अगदीं तन्मय झाला होता; तरी त्यांतल्या एका व्यक्तीची सारखी चुळबुळ चालली होती. प्रार्थना संपत आली तशी ती अधिकच वाढूं लागली. प्रार्थना संपली, मंत्रपुष्प झालें व एक शास्त्री हात जोडून सगळ्या ब्राह्मणांना उद्देशून म्हणाले—

"आतां दक्षणेसाठीं सर्वांनीं आमराईतल्या तंबूत यावं अशी विनंती आहे."

हें ऐकण्याबरोबर तर त्या व्यक्तीच्या चर्येवर संताप दिसला. दांत ओठ खात "काट्यांला सांगायचं तरी किती" असें स्वतःशीं पुटपुटत ती नदीतीरावर आली.

त्या वेळीं ब्राह्मणांचीं मुलें कांठावर गुरुचरित्र वाचीत होतीं, कांहीं रामरक्षा म्हणत होतीं, कांहीं पुरुषसूक्त म्हणत होतीं, तर कांहीं संध्या करीत होतीं, तर अजून नदींतच डुंबणारा ब्राह्मणाचा एक मुलगा या सगळ्यांकडे पाहात, एक प्रकारें त्यांना वेडावीत म्हणत होता—

"शास्त्राभ्यास नको, श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको ॥
योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ॥"

तोंच त्याला हाक ऐकूं आली.

"राम्या–राम्या–गाढवा, अजून पाण्यांत डुंबतो आहेस, चल नीघ बाहेर."

त्या हाकेबरोबर रामनें मागें पाहिलें, तों आपले मामा हरभट आपल्याकडे एवढे एवढे डोळे करून पाहाताहेत असें त्याला दिसलें. त्याची चर्या एकदम मलूल झाली. मामांच्या आज्ञेप्रमाणें तो नदींतून घाटावर आला. तो वर येतांच त्याला एक चांगला तडाखा देऊन मामा म्हणाले,

"शिंदळिच्या आंघोळ करून लवकर ये म्हटलं होतं ना?"

सरळ बोलायचें सोडून मामांनीं उगीचच तडाखा दिला म्हणून राम त्यांच्याकडे थोड्या रागानें पाहूं लागला, तों मामा त्याच्या अंगावर ओरडले,

"बघतोस काय तोंडाकडे! आतां तरी आटप."

राम कसें तरी आंग पुसून कोरडें नेसून मामाबरोबर निघाला. जातां जातां मामा त्याला शांत आणि समजावणीच्या सुरांत म्हणाले,

"आतां आमराईत दक्षणा घ्यायला जायचं आहे हं राम. तुला एक रुपया तरी दक्षणा मिळेल."

"होय काय ?" रामनें उगीचच उत्सुकता दाखवली.

"हो तर! रुपया तरी मिळेलच मिळेल. पण तुला कुणीं विचारलं तर सांग म्हणावं मी पाठशाळेंत शिकायला जात असतों."

तें ऐकण्याबरोबर राम चालतां चालतां थबकला आणि कांहींशा तीव्र स्वरांत म्हणाला,

"काय म्हटलंत ? खोटं सांगूं ?"

हरभट त्याच्याहीपेक्षां चढ सुरांत त्याच्या आंगावर खेकसले,

"खोटं न खरं, तुला काय करायचं ? मीं सांगितलं तसं सांग नि दक्षणा घे. अरे मूर्खा, मींसुद्धा असंच कांहींतरी सांगून दक्षणा उपटणार आहें."

रामला तें पटलें नाहीं; मामांचें करणें त्याला रुचलें नाहीं; पण तो त्यांच्या मागून जात होता. त्याच्या मनाची सारखी ओढाताण चालली होती. तोंच ते दोघेही दक्षणा घेण्याच्या तंबूजवळ आले. दक्षणेला अद्याप सुरुवात झाली नव्हती. तंबूच्या बाहेर पुष्कळ ब्राह्मण व ब्राह्मणांचीं मुलें जमलीं होतीं. मगाचचेच शास्त्रीबुवा त्या सगळ्यांना उद्देशून म्हणाले,

"ज्या ब्राह्मणांचं अध्ययन झालं असेल व जीं ब्राह्मणांचीं मुलं पाठशाळेंत अध्ययन करीत असतील, त्यांनींच दक्षणेकरतां आंत यावं."

हें ऐकल्यावर तर रामच्या मनाचा फारच गोंधळ उडाला. त्यानें तशाच स्थितींत एकदां आपल्या मामांकडे पाहिलें. तो कांहींतरी विचारणार तों मामाच त्याला किंचित् दरडावून म्हणाले,

"बावळटासारखं करूं नको. सांगितलंय तसं म्हण. घरांत दक्षणा आली पाहिजे."

तोंच तंबूतून आवाज ऐकूं आला, "हे दशग्रंथी ब्राह्मण आहेत."

दक्षणा घेण्यास आलेल्या एका विद्वान ब्राह्मणाचा परिचय होता तो! पेशव्यांच्या पदरचे एक शास्त्री लोकांचा परिचय करून देत व त्यांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें कमी अधिक दक्षणा मिळे.

रामची पाळी जवळ जवळ येऊं लागली. त्याच्या आधीं दोन तीन मुलें होतीं. कोणीं सांगितलें मी पूजा शिकतों, कोणीं सांगितलें मी पुरुषसूक्त शिकतों. एक अगदीं लहान मुलगा होता, त्याला शास्त्रीबुवांनीं विचारलें,

"बाळ, तूं कुठल्या पाठशाळेंत शिकतोस?"

"कुठल्या म्हणजे? गुरुजींच्या!"

"आणि काय शिकतोस?" किंचित् स्मित करून शास्त्रीबुवांनीं विचारलें,

"संध्या शिकतों."

"होय काय!" असें म्हणत त्याच्या पाठीवर थापट्या देत त्यांनीं त्याचें कौतुक केलें व दक्षणा दिली.

त्याच्या मागोमाग राम आला. त्यालाही शास्त्रीबुवांनीं विचारलें,

"कुठल्या पाठशाळेंत शिकतोस तूं?"

त्या प्रश्नानें राम गांगरला. तो इकडे तिकडे पाहूं लागला. आतां हा कार्टा घोटाळा करणार असें हरभटांना वाटलें, पण तेवढ्यांत त्यांना एक युक्ति सुचली. ते भरदिशीं पुढें झाले आणि "त्याला ऐकूं येत नाहीं, बहिरा आहे तो!" असें म्हणत हरभटांनीं रागानेंच रामचा कान पकडला आणि कानांत सांगण्याच्या आविर्भावानें ते मोठ्यानें म्हणाले,

"ऐकलंस काय? शास्त्रीबुवा विचारताहेत, तूं पाठशाळेंत जातोस ना? त्यांना उत्तर दे. हो म्हण."

बोलतां बोलतां त्यांनीं रामच्या कानाला हिसडा दिला. रामनें तोंडानें "हो" म्हटल्याचें कांहीं ऐकूं आलें नाहीं. पण हरभटांनीं दिलेल्या हिसड्यानेंच त्याची जी मान हलली तीच होकारार्थी आहे असें समजून हरभटांनींच शास्त्रीबुवांना उत्तर दिलें.

"हो म्हणतो आहे."

रामला एक रुपया दक्षणा मिळाली, पण दुसऱ्या मुलांप्रमाणें त्याची चर्या खुलली नाहीं. तो त्रस्त आणि बेचैन मुद्रेनेंच तंबूच्या बाहेर पडला. आपण रुपया मिळविला पण खोटें बोलून मिळविला, स्वतःची इच्छा नसतांना आपण दुसऱ्यासाठीं पाप केलें हें मनांत येऊन आपल्या दुबळेपणाचा त्यालाच संताप आला. चालतां चालतां तो एकदम थबकला, हातांतल्या रुपयाकडे त्यानें पाहिलें, जोरानें मूठ वळली आणि तो फेकून देण्यासाठीं हात जोरानें मागें घेतला.

पण एकदम त्याचा विचार बदलला. त्यानें तो रुपया फेकला नाहीं. पुन्हा मूठ उघडून रुपयाकडे पाहिलें. पुन्हा तो रुपया मुठींत घट्ट धरला. तसाच तो मागें वळून चालूं लागला. या वेळीं त्याची चर्या एका विचारानें तेजस्वी झाली होती. त्याच्या आंगांत जोम आला होता. त्याचीं पावलें जलद जलद पडत होतीं.

तो परत तंबूकडे निघाला होता. अखेरी अखेरीस तर तो जणूं पळतच होता. अजूनही दक्षणा घेणारांची गर्दी होतीच. पण कोणालाही न जुमानतां राम मुसंडी मारून आंत घुसला आणि ज्या शास्त्र्यांनीं त्याला दक्षणा दिली होती त्यांच्यासमोर जाऊन हातांतला रुपया त्यांच्यापुढें फेकीत निश्चयाच्या खणखणीत स्वरांत म्हणाला,

"ही घ्या तुमची दक्षणा परत! दक्षणा घेण्याचा मला अधिकार नाहीं. मी कुठल्याही पाठशाळेंत शिकलों नाहीं आणि शिकतही नाहीं. म्हणून ही दक्षणा घेण्याचा मला मुळींच अधिकार नाहीं· मी ती दक्षणा घेणार नाहीं."

# २

त्या वेळीं रामाचे मामा हरभटजी तेथें होते. त्यांना पाहाण्याबरोबर राम किंचित चरकला. पण किती ? क्षणभर देखील नाहीं. त्यांच्याकडे न पाहातांच रुपया फेकून तो आवेशानें निघून गेला होता. चार प्रतिष्ठित मंडळींत आपली अब्रू काढून जणूं काय धिक्कार करीतच "राम्या" चालला आहे असें हरभटजींना वाटलें. त्याचा त्यांना अतिशय संताप आला. ते त्याच्यावर दांत ओठ खाऊं लागले.

पण रामला केवढा आनंद झाला. खोटें सांगून आपण मिळविलेल्या रुपयाचा आपण मोह धरला नाहीं; विशेषत: मामांच्या आहारीं न जातां अगदीं खरें आणि स्पष्ट सांगून आपण दक्षणा परत दिली याचा रामला किती आनंद झाला होता. त्या भरांत भराभर पावलें टाकीत तो घरीं आला. त्या वेळीं त्याची बायको जानकी सोप्यावर सागरगोट्या खेळत बसली होती.

आठ-दहा वर्षांची अल्लड पोर! रामच्या आईच्या नातलगांपैकींच होती ती! लहानपणीं यांच्याच घरीं राहिलेली; दोघेंही एकत्र खेळलेलीं, त्यामुळें पुढें लग्न झालें तरी जानकीला तें सासर असें कधींच वाटलें नाहीं. रामच्या आईनेंही तिला सून म्हणून कधीं वागविलें नाहीं; आणि राम नि जानकी आतां तर काय जन्माचीं सोबती झालीं होतीं.

जानकी खेळण्यांत अगदीं दंग झाली होती. एका घटकेपूर्वींच ती भुकेनें व्याकूळ होऊन "मला अगोदर जेवायला वाढा" असा सासूजवळ हट्ट घेऊन बसली होती. पण "नवऱ्याच्या आधीं बायकोनं जेवूं नये असं शास्त्र आहे" असें रामच्या आईनें म्हणतांच ती बाहेर येऊन खेळत बसली. आरंभीं तिचें लक्ष लागेना, पण खेळ रंगूं लागला तशी तीही भूक विसरून त्यांत रंगूं लागली. त्यांत

ती इतकी गुंग झाली, कीं पाठीमागें राम येऊन उभा राहिला हेंही तिच्या लक्षांत आलें नाहीं. तिनें उंच फेकलेला गजगा रामनें वरच्यावर झेलला, तेव्हां ती शुद्धीवर आली. रामला पाहातांच जमिनीवरचे सगळे गजगे गोळा करून ती उठली आणि लाडक्या पण रुष्ट स्वरांत म्हणाली,

" हें काय रे राम ! किती वाट बघायची तुमची आम्हीं."

" कशाला वाट बघत होतां आमची तुम्ही ?" रामानेंही तिला तिच्याच सुरांत विचारलें.

" कशाला म्हणजे ? आम्हांला भूक लागली नाहीं वाटतं ?"

" भूक लागली तर जेवून टाकायचं !"

" जेवून टाकायचं ? वाऽ रेऽ वा ! मी बायको आहें तुझी ! नवऱ्याच्या अगोदर बायकोनं जेवूं नये असं शास्त्र आहे." 'एवढंसुद्धा तुला माहीत नाहीं ?' अशा भावानें ती त्याच्याकडे पाहूं लागली.

" हो. पण मला जेवायचं नसलं तर ?"

रामच्या या उत्तरानें आपली फजीति झाली असें जानकीला वाटलें. तरी तसें न दाखवतां ती कुर्ऱ्यानेंच म्हणाली,

" तर तर, जेवायचं नाहीं म्हणे ! कां नाहीं जेवायचं ?"

" माझं पोट भरलंय...."

" पोट भरलंय ? कशानं ?"

" आनंदानं !"

" कसला आनंद झाला आहे एवढा ?"

राम एकदम गंभीर होऊन सांगूं लागला.

" मी पैशासाठीं खोटं बोललों नाहीं. मामांच्या धाकानं खोटं सांगून दक्षणा उपटली नाहीं मीं. मी पाठशाळेंत जात नाहीं, मला दक्षणा घेण्याचा अधिकार नाहीं, असं खरं खरं सांगून दक्षणा परत दिली आणि दक्षणा परत दिल्यावर मला केवढा आनंद झाला म्हणून सांगूं जानकी...."

“ दिसतोच आहे तो तोंडावर !” रामच्या सात्त्विक अभिमानाला जानकीनें एवढेंच वाक्य उच्चारून केवढा दुजोरा दिला !

“ त्याच आनंदानं माझं पोट अगदीं भरून गेलंय !”

लागलीच जानकी म्हणाली,

“ हं. तें मात्र नाहीं चालायचं हं ! मला फार भूक लागलीय आणि सत्यवचनी राम जेवल्याशिवाय जानकी जेवायची नाहीं,” असें म्हणत त्याच्या हाताला धरून तिनें त्याला ओढीतच स्वयंपाकघरांत आणलें आणि सासूबाईजवळ तक्रार केली,

“ सासूबाई पाहिलंत का ? हा म्हणतो मी जेवत नाहीं....”

रामची आई मध्येंच म्हणाली,

“ जानकी, किती सांगायचं तुला ! रामला असं ‘अरे’ ‘तुरे’ म्हणूं नये. पांच सहा महिन्यांपूर्वीं तुम्ही मुलं मुलं होतां, एकमेकांशीं खेळत होतां, हमरीतुमरीवर येत होतां, तें सगळं खरं, पण आतां तो नवरा झाला आहे तुझा !”

जानकी वरमून अजीजीच्या सुरांत म्हणाली,

“ आतां नाहीं हं सासूबाई. एखादे वेळीं लक्षांतच राहात नाहीं. ”

“ बरं राम, चल, सोवळं नेस नि जेवायला बैस. जानकी, तूं पण बैस, वेळ झालाय फार !”

“ अं हं ! रामचं झाल्यावर मग.” पुन्हा जानकीकडे तीव्र दृष्टीनें पण कौतुकाच्या हसऱ्या मुद्रेनें पाहात रामची आई म्हणाली,

“ अग, असं नवऱ्याचं नांव घेऊं नये, जानकी !”

“ खरंच कीं, त्याचं झाल्यावर मग.”

रामच्या आईनें कांहींशा कठोर स्वरांत विचारलें,

“ काय म्हणालीस ? त्याचं ?”

आपली चूक लक्षांत येऊन जानकीलाही गंमत वाटली आणि रामकडे पाहात हसत हसतच तिनें आपली चूक सुधारली, “नाहीं नाहीं, त्यांचं.”

पानें मांडलींच होतीं. राम आणि जानकी दोघेंही पाटावर बसलीं. राम आतां घास घेणार तोंच संतापानें लाल झालेले हरभटजी आले. रामला जेवायला बसलेला पाहून तर त्यांचा संताप अधिकच वाढला. दांत ओठ खात ते रामच्या आईला उद्देशून म्हणाले,

"झक् मारली नि तुझ्या संसाराचं लोढणं गळ्यांत बांधून घेतलं. आजच्या काळांत सख्खा भाऊ सख्ख्या बहिणीला विचारीत नाहीं आणि तू तर माझी लांबची बहीण; तरीसुद्धा...."

आपल्या दादाला एकदम इतकें संतापायला काय झालें हें रामच्या आईच्या लक्षांतच येईना. तिनें मध्येंच विचारलें, "पण इतकं संतापायला काय झालं?"

"तुझं बत्तीस लक्षणी पोरटं आहे कीं," रागानें बेफाम होऊन हातवारे करीत हरभट म्हणाले.

"काय केलं त्यानं?" रामच्या आईनें अगदीं शांतपणें विचारलें.

"काय केलं? चांगली रुपया दक्षणा आलेली परत दिली. काय रे, किती सांगायचं तरी किती तुला! नशीबानं चांगली रुपया दक्षणा मिळाली होती. ती कां दिलीस परत? आं? कां आली इतकी मस्ती?" असें म्हणत म्हणत हरभट रामला मारण्यासाठीं त्याच्या आंगावर धावून गेले. रामच्या आईला त्या वेळीं भीति वाटली. तीही धावतच पुढें गेली आणि तिनें रामला पाठीशीं घातलें. त्याबरोबर हरभटांचा संताप अधिकच वाढला. ते तिला वाटेल तें बोलूं लागले.

"लपव, लपव, घाल त्याला पदराखालीं! तुलाही तेंच पाहिजे तर माझं तरी काय नडलंय? तूं दुसऱ्याचीं भांडीं घास, धोतरं बडव, दासी-कुणबिणीचीं कामं कर आणि राम्या, तूं दक्षणा लाथाड. बेरड हो, दरोडेखोर हो...."

"असे कां उगीच शिव्याशाप देतोस?"

"उगीच? उगीच? खरं आहे तुझं बाई! तुझी दया केली, तुझ्यासाठीं गांव सोडून इथं माहुलीला आलों, भिक्षा मागितली,

भिक्षुकी केली नि तुमचीं पोटं जाळलीं. चूक झाली माझी. तूं इतकी उफराटी असशील असं मला वाटलं नव्हतं."

हरभटांचें हें बोलणें मात्र रामच्या आईला सहन झालें नाहीं. तिला फार वाईट वाटलें. ती अगदीं काकुळतीच्या सुरानें म्हणाली, "उफराटी! दादा, नको रे म्हणूं असं! मी जन्मांत तुझे उपकार विसरणार नाहीं. पडत्या काळांत मला सावरलंस तूं. अनाथ गाईला आधार दिलास तूं. पोरक्या पोराचं रक्षण केलंस तूं."

हरभट एकदम उसळून म्हणाले, "रक्षण केलं नाहीं. पोळ पोसला पोळ, शिंगं फुटलीं तसा मस्त झाला आणि माझ्यावरच उलटला. चार चौघांत मला हुंदाडलं. मला तोंडघशीं पाडलं. आतां या फुटक्या तोंडानं तुझ्या घरांत एक घास घेणार नाहीं कीं पाण्याचा एक थेंब घेणार नाहीं."

हरभट खरोखरीच निघून गेले. त्यांना अडविण्यासाठीं रामची आई "दादा" "दादा" अशा हाका मारीत दारापर्यंत गेली होती. हरभटांनीं तिचें मुळींच ऐकलें नाहीं कीं मागें वळून पाहिलें देखील नाहीं. तिच्याकडे न बघतांच हातानें "छे: छे:" करीत आणि तोंडानें कांहींतरी बडबडत ते पुढें पुढेंच जात होते. आतां मात्र रामच्या आईचा धीर सुटला. खरोखरीच तिला हरभटजींचा आधार वाटत होता. तो असा अकस्मात्पणें नाहींसा झाल्यामुळें तिला वाईट वाटलें. आणि तो आधार जायला आपला रामच कारणीभूत झाला हें पाहून तिला त्याचा संताप आला. त्या रागाच्या भरांत, कोपऱ्यांतली काठी घेऊन आतां तीच त्याला मारण्यासाठीं त्याच्या आंगावर धावून गेली.

"कार्ट्या, कुठल्या जन्माचं वैर साधलंस? काय काय उलट उत्तरं दिलींस दादाला?"

सासूबाईचा कधीं नाहीं तो अवतार बघून जानकीही घाबरली. रामच्या आईनें बोलतां बोलतां काठी उगारतांच जानकी धांवतच त्या दोघांच्यामध्यें जाऊन उभी राहिली. तिनें रामला पाठीशीं घालून

"सासूबाई सासूबाई" म्हणत रामच्या आईचा हात धरला. पण रामनेंच तिला बाजूला केलें आणि तो निर्भय मुद्रेनें खणखणीतपणें म्हणाला,

"मारूं दे, मार! मार! आईच आहेस तूं; तुझा राग शांत होईपर्यंत झोडपून काढ मला...."

"झोडपायलाच पाहिजे तुला. त्रागा केलास म्हणजे मी भिऊन जाईन असं वाटलं होय तुला? खरं सांग, दादाला काय उर्मटपणानं बोललास तूं?"

"कांहीं देखील बोललों नाहीं मीं...." रामनें तितक्याच चढ सुरांत उत्तर दिलें.

"वर आणखी खोटं बोलतोस?"

"मी खोटं बोलत नाहीं." राम कांहींसा चिडून म्हणाला.

"मग दादाला संताप कां आला?"

"मी खोटं बोललों नाहीं म्हणून," प्रत्येक शब्दावर जोर देत राम ठासून बोलत होता. "मी खोटं बोलून दक्षणा उपटली नाहीं म्हणून! विद्वान् ब्राह्मणांनीं आणि पाठशाळेंत शिकणाऱ्या मुलांनींच दक्षणा घ्यावी असं शास्त्रीबुवा म्हणाले. मामा म्हणत होते, मी खोटं बोलून दक्षणा उपटणार आहें, तूंसुद्धा खोटं सांग."

रामच्या सांगण्याच्या त्या एकंदर आविर्भावानें रामची आई किंचित् दिङ्मूढ झाली. त्याला मारण्यासाठीं उचललेला तिचा हात खालीं झाला. तो सांगत असतांना ती त्याच्याकडे टक लावून पाहात होती. जणूं काय ती त्याच्या अंतःकरणांतील विचारांची कालवाकालवच पाहात होती. पाहातां पाहातां तिचा राग कमी झाला, तिच्या हातून काठी गळून पडली. पण तिला कांहीं बोलवलें नाहीं. तिनें आपली मान वळविली. ती तशीच जड पावलांनीं रामपासून दूर झाली. आईची ती स्थिति पाहून रामही गोंधळला. त्याचा बोलण्याचा आवेश एकदम कमी झाला. तो कांहींशा मवाळ नि विनवणीच्या सुरांत म्हणाला,

"मग तूंच सांग आई, खोटं बोलून देखील मीं दक्षणा आणायला पाहिजे होती? तुला तें आवडलं असतं?"

तिनें एक सुस्कारा टाकला. ती म्हणाली,

"नाहीं, तूं खोटं बोलला नाहींस हेंच चांगलं केलंस."

बोलतां बोलतां तिचा कंठ भरून आला, तिला अधिक बोलवेना, पण आईच्या त्या उत्तरानें रामला मघांपेक्षांही आनंद झाला. त्याची चर्या एकदम हसरी झाली व "होय ना? होय ना?" करीत तो धांवतच आईजवळ गेला. तिनें त्याच्याकडे पाहिलें नाहीं, पण त्याला पोटाशीं ओढून घेतलें. राम आईच्या तोंडाकडे पाहात म्हणाला,

"आई! आई!"

तरीही तिनें रामकडे पाहिलें नाहीं. ती आपल्याच विचारांत होती. त्या सगळ्या विचारांचा निष्कर्ष म्हणूनच कीं काय रामच्या आंगावर हात फिरवीत कांहींसें त्याला उद्देशूनच ती म्हणाली, "दादाचा आधार होता. जहागिरदारांच्या वाड्यांत दळण, कांडण करून जेवढं मिळतं तेवढ्यावर आतां आपलं भागणार नाहीं रे राम!"

"आई, तूं अगदीं काळजी करूं नकोस. मी आहें, मी पैसे मिळवीन."

"पैसे मिळविणं सोपं नाहीं राम. ब्राह्मण विद्वान असला तरच त्याला मानानं पैसा मिळतो."

"मग मीही विद्वान होईन, अगदीं ठरलं माझं, आतांपासनं पाठशाळेंत जायचं, शिकायचं, अगदीं विद्वान् शास्त्री व्हायचं."

"पूर्वीचे दिवस राहिले नाहींत आतां. तुझे वडील विद्वान् शास्त्री होते. त्यांनीं विद्यादानाचं मोल घेतलं नाहीं. पण आतांचे गुरुजी मोलाविना विद्या देत नाहींत."

आईनें सांगितलेली अडचण खरीच होती. रामसुद्धां किंचित् घोटाळ्यांत पडला. त्याची चर्या थोडी हिरमुसली झाली. पण लागलाच त्याला आणखी एक विचार सुचला. तो चुटकी वाजवीत आईला म्हणाला,

"असं कर कीं आई, तूं कामाला जातेस ना, तिथल्या जहागिर-दारांच्या मुलाला शिकवायला शास्त्री आहेत. 'तुमच्या मुलाबरोबर माझाही राम शिकूं दे.' असं तूं जहागिरदारीणबाईंना सांगितलंस तर त्या कांहीं नाहीं म्हणणार नाहींत तुला! अं? होय ना? हं, असंच कर आई!"

जानकीला देखील रामचा विचार फार आवडला असें दिसलें. तीसुद्धा सासूला उद्देशून म्हणाली,

"हां, हां. असंच करा सासूबाई."

रामचा विचार चांगला होता, पण त्याच्या आईला तो उत्साह-जनक वाटला नाहीं. त्याला कारणही तसेंच होतें आणि तिनें तें लपवूनही ठेवलें नाहीं. ती म्हणाली, "तसंसुद्धा करायला हरकत नाहीं. दुसऱ्या मुलांना त्यांनीं असा आसरा दिलाच आहे, तसा ते तुलाही देतील नि तूं मनाचा निश्चय केलास म्हणजे कैलाससुद्धा चढशील. पण अजून तूं थिरथिरा आहेस. उनाडक्या करायची तुझी बुद्धि अजून स्थिर झाली नाहीं. तेव्हां तुझ्याबद्दल जहागिरदारीणबाईंना मीं सांगायचं नि हात दाखवून अवलक्षण केल्यासारखं व्हायचं!"

"नाहीं ग आई" राम अगदीं काकुळतीला येऊन सांगूं लागला, "मी अगदीं अगदीं नीटपणानं वागेन. तूं सांगशील तसा वागेन. वाटेल तें सहन करीन पण शिकेन. अगदीं तुझी शप्पत, एकदां माझ्यावर विश्वास ठेव."

रामची आई त्याच्याकडे निरखून पाहात होती. त्याचें बोलून झाल्यावर देखील एक क्षणभर ती त्याच्याकडे पाहातच होती. तेवढ्यांत जानकीहि म्हणाली, "हं. सासूबाई, एकदां विश्वास ठेवा."

"बरं तर राम, जहागिरदारीणबाईंना विचारून तुझी शिकण्याची करतें सोय! आत्तांच विचारून येतें त्यांना!"

आणि खरोखरीच रामची आई लागलीच जहागिरदारांच्या वाड्यांत गेली. आईनें आपल्यावर विश्वास ठेवला, ती लागलीच आपली सोय

करायला गेली, याचा रामला आनंद झाला. अभिमानही वाटला. तशाच मुद्रेनें त्यानें एकदां जानकीकडे पाहिलें. लागलीच जानकीनें त्याला बजावलें,

"आतां सांगितल्याप्रमाणं वागलं पाहिजे हं तुम्हांला."

"हो वागणारच...."

"मग काय, तुम्ही शिकणार, विद्वान् होणार, मोठे रामशास्त्री होणार...."

"शुः शुः शुः!" राम मध्येंच म्हणाला, "माझं नांव घ्यायचं नाहीं तूं!"

"घ्यायचं, नवरा मोठा माणूस झाला म्हणजे बायका मोठ्या अभिमानानं चांगलं तोंड भरून नांव घेतात त्याचं! कसं? रा म शा स्त्री!"

★

# ३

सगळ्यांच्या सुदैवानें जहागिरदारीणबाईंनीं रामच्या आईच्या शब्दाला मान दिला. राम जहागिरदारांच्या वाड्यांत शिकायला जाऊं लागला. याच्यासारखींच आणखींही गरिबांचीं पांच सहा मुलें तेथें शिकायला येत होतीं.

पण जहागिरदारांसारख्या श्रीमंतांच्या घरीं, श्रीमंतांशीं वागायचें माहीत नसलें म्हणजे त्यांच्याच कृपेनें मिळालेलें भाग्य फार काळ टिकत नाहीं. रामच्या बाबतींत तसेंच झालें.

जहागिरदारांचे चिरंजीव, त्यांतल्या त्यांत एकुलते एक आणि आईबापांचे लाडके. बुद्धीनेंही यथातथाच. पण श्रीमंतीची आणि अधिकाराची घमेंड मात्र मोठी.

आज त्यांच्या मनांत शिकायला बसायचेंच नव्हतें, पण गुरुजींनीं दादापुता करून मोठ्या मिनतवारीनें त्यांना पाठशाळेंत आणून बसवलें

होतें. एवढ्यांत खुद्द जहागिरदारसाहेबांनीं गुरुजींना भेटीला बोलावलें म्हणून गुरुजी तिकडे गेले. मग काय, जहागिरदारांचे चिरंजीवच सर्वाधिकारी झाले. त्यांनीं लागलीच हुकूम सोडला.

"आमची आज्ञा आहे. गुरुजी येईपर्यंत सगळ्यांनीं विटीदांडू खेळायचा !"

श्रीमंतांची आज्ञा ती ! पाळलीच पाहिजे. बाहेरच्या बाजूला सगळीं मुलें खेळायला आलीं. श्रीमंतांनीं दुसरा हुकूम सोडला. "विटी झेलेल त्याचा डाव. आम्ही श्रीमंत म्हणून पहिल्यानदां खेळणार आम्ही !"

श्रीमंतांनीं विटी कोलवली, ती एकानें झेलली. तेव्हां तो 'माझा डाव' 'माझा डाव' करीत श्रीमंतांकडे आला. त्याबरोबर त्याच्यावर दांडू उगारून श्रीमंत म्हणाले,

"चल चल. माझा डाव म्हणे, पहिला डाव भुताचा, आतां मी खेळणार."

श्रीमंतांनीं पुन्हा विटी कोलवली ती पुन्हा त्यानेंच झेलली. तेव्हां तो म्हणाला,

"आतां तरी...."

"आतां तरी नाहीं न् कुता तरी नाहीं. आम्हीच खेळणार."

तो बिचारा हिरमुसला झाला. त्याची चर्या पाहून रामला वाईट वाटलें. श्रीमंतांचा रागही आला. पण तो त्यानें मुकाट्यानें गिळला. श्रीमंत पुन्हा खेळूं लागले. याही वेळीं दुसऱ्या मुलानें त्यांची विटी झेलली. तो डाव मागायला गेला. तों श्रीमंतांनीं त्यालाही धुडकावून लावलें. हक्क असून खेळायला मिळत नाहीं म्हणून मुलांचा जो विरस होई, तो पाहून रामला श्रीमंतांचा अधिकअधिकच राग येऊं लागला. पण करणार काय ?

अखेरीला रामनें विटी झेलली. डाव मागायला अधिकार येण्याबरोबर तो आवेशानें श्रीमंतांकडे गेला आणि म्हणाला,

" आणा इकडे दांडू, मीं जिंकलंय तुम्हांला."

" तर, तर. आम्हांला जिंकतोय. आज सगळे डाव आम्हीच खेळणार."

" न्यायानं दुसऱ्याकडे जाणारा डाव जबरदस्तीनं आपणच खेळणं अन्यायाचं आहे."

" असूं दे, असूं दे, आम्ही अन्यायच करणार."

" अन्यायानं माणूस चिडतो."

" चिडूं दे ! काय करणार तूं माझं चिडून ? हातांतन दांडू हिसकून तर घेत नाहींस ?"

" तुम्हीं नाहीं दिला तर हिसकून घेईन."

" बघूं या कीं कसा घेतोस तें !"

" माझा हक्काचा डाव मी खेळणार." असें म्हणत राम थोडा आवेशानें पुढें झाला. श्रीमंत घाबरून मागें सरकले आणि रडत रडत दांडू जमिनीवर आपटून म्हणाले,

" अं, अं, अं, मला मारणार तूं ? मार, मार. आतां गुरुजी आले म्हणजे बघ, गुरुजी, गुरुजी...."

याच सुमारास जहागिरदारांची भेट घेऊन गुरुजी परत येत होते. श्रीमंतांची हाक ऐकतांच त्यांनीं ओ दिली. " ओ, ओ, काय झालं श्रीमंत."

" तो बघा राम्या मारतोय मला ! माझा दांडू घेतला हिसकून." गुरुजी रामवर चवताळून म्हणाले.

" राम्या, माजोऱ्या, श्रीमंतांना मारलंस, दांडूनं मारलंस !"

" मीं मारलं नाहीं गुरुजी."

" पुन्हा उलटून बोलतोस ? श्रीमंत खोटं सांगतात काय ? अं ? मारलं नाहींस तर दांडू कसा आला तुझ्या हातांत ? ज्याचं खातोस त्याच्यावरच उलटतोस. माफी माग त्यांची."



" काय म्हटलंत ?
खोटं सांगूं ? "



" दुसऱ्यांचीं भांडणं आंगावर
घेऊन न्याय करीत बसायची
आपली स्थिति नाहीं रे राम ! "

"नाहीं मागणार, माझी चूक नाहीं." रामनेंही तितक्याच जोरानें उत्तर दिलें.

"अरे उमेटा, तुझी मस्ती घालवली पाहिजे. माग माफी त्यांची."

बोलतां बोलतां गुरुजी डोळे मोठे करीत रामच्या पुढें पुढें येऊं लागले. रामच्याही आंगाचा संताप झाला होता. तो जागेवरून हालला देखील नाहीं. गुरुजी त्याच्याजवळ आले आणि त्याच्या कानाला धरून त्याला ओढीत त्यांनीं श्रीमंतांच्या पायांजवळ आणलें आणि पुन्हा रागाच्या खड्या सुरांत आज्ञा केली, "ठेव डोकं श्रीमंतांच्या पायांवर."

एवढें म्हणूनच ते राहिले नाहींत, तर ते त्याची मान वाकवूं लागले. आतां मात्र रामच्यानें राहावलें नाहीं. त्यानें गुरुजींच्या हाताला जोरानें हिसका दिला. त्या हिसक्यानें गुरुजी तोंडघशीं पडले. सगळीं मुलें हसूं लागलीं. श्रीमंतही हसूं लागले.

★

# ४

रागाचा आणि आवेशाचा तो सगळा भर ओसरल्यावर मात्र रामला वाईट वाटलें. आपण केलें तें चुकीचें नव्हतें. अगदीं रीतसर आणि न्यायाचेंच होतें, तरी झाला हा प्रकार एकंदरींत चांगला झाला नाहीं हें मनांत येऊन त्याला फार वाईट वाटलें. त्याच्या डोळ्यांत पाणी देखील भरलें. विचारांच्या तंद्रींत तो तसाच घरीं आला. घरांत जानकी एकटीच होती. राम अवेळीं परत आला आणि त्याची मुद्रा कशीतरीच आहे हें पाहून जानकीनें आश्चर्यानें विचारलें,

"हें काय, आज इतक्या लवकर? आणि असे कां दिसतां?"

"कसा दिसतों?" रामानें वैतागाच्या सुरांत उलट विचारलें, "अं? कसा दिसतों? पस्तावल्यासारखा, कीं खेटरानं मारल्यासारखा?"

कधींच नाहीं ती रामची आतांची बोलण्याची पद्धत पाहून जानकी मनांतल्या मनांत चरकली. ती म्हणाली,

" भीति वाटते मला, असं कांहींतरी संतापी बोलूं नये."

" आज माझा मलाच संताप आला आहे, जानकी." राम किंचित् शांतपणें बोलूं लागला, " आज माझ्या हातनं घडलं तें वाईट घडलं. वाईट वाटतं मला, पश्चाताप होतो, अगदीं खेटरानं मारल्यासारखं वाटतं."

" पण असं घडलं तरी काय हातनं ?"

" घडलं कसलं ? मींच केलं, पण केलं तें ईश्वरसाक्ष न्यायाचं होतं. तो जुलूम जबरदस्तीचा अन्याय मला सहन झाला नाहीं आणि त्या वेळीं मी आईला विसरलों."

" म्हणजे काय झालं असं ?"

" गोष्ट अगदीं क्षुल्लक आहे ग. श्रीमंत आणि आम्ही, सगळे विटीदांडू खेळत होतों. दुसऱ्यांनीं डाव जिंकला तरी श्रीमंत त्यांना खेळूं देई ना. राग आला मला, पण गिळला. मीं डाव जिंकला, तेव्हां म्हटलं, मी खेळणार."

" बरोबर आहे."

" तसं श्रीमंत म्हणाले, मीच खेळणार."

" वा रे वा—"

" मीं घेतला दांडू हिसकून."

" चांगलं केलं, तसंच पाहिजे तसल्याला."

" मग लागला रडायला."

" दुबळं माणूस दुसरं काय करणार ?"

" पण तें बघून गुरुजी म्हणाले, तूं मारलंस त्यांना, माग त्यांची माफी, ठेव डोकं त्यांच्या पायावर."

" अरे वा रे वा गुरुजी !"

" माझी चूक असती तर मीं शंभर वेळां माफी मागितली असती.

" होऽओऽ, खरंच आहे."

" पण गुरुजी माझी मान धरून त्याच्या पायांवर वाकवूं लागले."

" जुलमानं ?"

" हंऽअं"

" मान वाकवली नाहीं ना तुम्हीं ?"

" नाहीं."

" छान-छान !"

" पण एका गोष्टीचं वाईट वाटलं." राम गंभीर होऊन सांगूं लागला, " मीं आईला म्हटलं होतं, मी नीट वागेन, तूं सांगशील तस्सा वागेन, काय वाटेल तें सहन करीन, पण शिकेन. आईनें माझ्या शब्दावर विश्वास ठेवला, माझ्यासाठीं तिनं जहागिरदारांना विनवण्या केल्या आणि मीं ? मी बेभान झालों, उर्मट झालों, आईचा विश्वासघात केला. नाहीं, तोंड नाहीं मला आईपुढं यायला !"

" पण सासूबाईंना तसं नाहीं वाटणार." त्याची समजूत घालण्याच्या सुरांत जानकी म्हणाली.

" तिला नाहीं तसं वाटणार कदाचित्, आई आहे ती, पण मला कांहीं तरी लाज वाटायला पाहिजे. मी तिचा एवढा मोठा मुलगा, तिला सुख द्यायचें तें राहिलं बाजूलाच, उलट तिला दुःख होईल, तिला खालीं बघावं लागेल, असं करतोंय मी. तिला सुख द्यायचा आतां एकच मार्ग राहिला आहे मला !"

" कोणता तो ?"

" इथून काळं करणं, तिच्यापासून दूर कुठें तरी जाणं."

तोंच रामची आई तेथें आली. आईला पाहातांच रामला उमाळा आला. तो एकदम तिच्या पायांवर पडला व म्हणाला,

" आई आई, मी चुकलों. तुला सांगितलं तसा वागलों नाहीं, पण, पण क्षमा कर मला."

त्याला उठवीत रामची आई म्हणाली, " ऊठ राम."

" नाहीं, क्षमा कर मला. तूं क्षमा म्हटल्याशिवाय तुझे पाय सोडणार नाहीं मी."

" ऊठ राम! क्षमा आहे तुला. मला सगळं समजलं. गुरुजींनीं सगळं सांगितलं आहे. तुमचं बोलणं मीं ऐकलं...."

" आई, मीं तुला म्हटलं होतं, काय वाटेल तें सहन करीन, पण शिकेन; तसं सहन केलं ग पुष्कळ! पण अन्याय सहन झाला नाहीं मला! आई, खरंच का ग तें चुकलं माझ्याकडन ?"

" चुकलं तरी कसं म्हणूं आणि नाहीं तरी कसं म्हणूं ?"

" म्हणजे ग काय ? न्यायाचं असेल तें सांग."

" तुझ्याकड चूक नाहीं, पण दुसऱ्यांचीं भांडणं आंगावर घेऊन न्याय करीत बसायची आपली स्थिति नाहीं. तुझी बुद्धि, तुझे गुण बघितले म्हणजे वाटतं, आमचंच कपाळ फुटकं त्याला तूं तरी काय करणार ?" बोलतां बोलतां रामच्या आईचे डोळे पाण्यानें भरले. तिला अधिक बोलवलें नाहीं. ती मान वळवूं लागली, तों राम म्हणाला,

" आई आई, माझ्याकड पाहा एकदां."

रामकडे पाहात त्याची आई म्हणाली,

" त्यांचं रूप तुझ्यांत आहे. त्यांचे गुण तुझ्यांत आहेत, पण पुरुषाच्या गुणांना नि रूपाला विद्येशिवाय तेज नाहीं रे राम! आपल्या विद्वत्तेच्या जोरावर त्यांनीं सभा जिंकली होती. अजिंक्य पंडित म्हणून स्वत: पेशव्यांनीं त्यांच्या कानांत हिऱ्या-मोत्यांची भिकबाळी घातली होती. त्या वेळीं तूं लहान होतास. तुला त्यांनीं खांद्यावर टाकला, म्हणजे तूं त्या भिकबाळीकडे टक लावून पाहात असस. त्या वेळीं ते म्हणत, तुला सुद्धा मी शास्त्री करणार आहें, मग तूं सुद्धा अशीच मानाची भिकबाळी जिंकशील. पण देवाच्या मनांत तसं नव्हतं."

रामच्या आईनें बोलतां बोलतां एक सुस्कारा टाकला. तिला अधिक बोलवलें नाहीं. रामलाही वाईट वाटलें. आईची आणि बाबांची इच्छा

पुरी करणें आपलें कर्तव्य आहे, तें केलें पाहिजे अशा भावनेनेंच कीं काय, तो आईला म्हणाला,

"आई आई, असं म्हणूं नकोस. मी आतां सुद्धा शिकेन. शास्त्री होईन नि बाबांच्यासारखी मानाची भिकबाळी जिंकीन. शिकण्यासाठीं मी काय वाटेल तें करीन, पण बाबांची इच्छा पुरी करीन."

★

## ५

रामनें प्रतिज्ञा केली खरी, पण ती पार पाडणें किती कठीण होतें, याची त्याला कल्पना नव्हती. संध्येशिवाय त्याला कांहींही येत नव्हतें. शिकायचें म्हटलें तर 'रामो हरिः' पासूनच त्याला शिकायला पाहिजे होतें. आतां माहुलींत तरी तें शक्य नव्हतें. शिवाय घरींही कांहींतरी मिळवून आणून देणें अवश्य होतें. नोकरीही करतां येईल आणि शिकतांही येईल अशी भाग्याची नोकरी त्याच्यासाठीं थोडीच वाढून ठेवली होती!

पण शिकण्याच्या आधीं पोटाचीच सोय बघणें त्याला भाग होतें. नोकरी करून हातावर पोट भरायचें म्हणजे साताऱ्याला किंवा पुण्याला जायला पाहिजे होतें. त्यांतल्या त्यांत आपल्याला सातारा जवळ म्हणून अगोदर तेथेंच आपल्या नशिबाची परीक्षा बघावी असें त्यानें मनाशीं ठरविलें.

साताऱ्यांतल्या राजरस्त्यावर येऊन तो उभा राहिला. साताऱ्याचा तो नाका होता. तेथून तीन रस्ते जात होते. त्या तिन्ही रस्त्यांकडे पाहात तो उभा होता. यापूर्वी तो पुष्कळदां साताऱ्यास आला होता. साताऱ्याचे सगळे रस्ते त्याला माहीत होते. यापूर्वीं तो असा कधींही घोटाळ्यांत पडला नव्हता. पण आज मात्र कोणत्या रस्त्यानें जावें हें त्याला समजेना. कोणत्या रस्त्यानें गेलें म्हणजे नोकरी मिळेल याचाच

तो विचार करीत होता कीं काय कोण जाणे. कांहीं वेळ असाच गेला. विचार करून कोणत्या रस्त्यानें जावें हें कांहीं त्याला ठरवतां आलें नाहीं; तेव्हां पाय नेतील त्याच रस्त्यानें तो जाऊं लागला.

जातां जातां त्याला एक वाडा दिसला. तो त्याच्या ओळखीचा वाटला. लहान असतांना तो आपल्या वडलांबरोबर तेथें दोनतीनदां येऊन, जेवून दक्षणा घेऊन गेला होता. आतांही कदाचित् येथेंच आपलें अन्नोदक नेमलें नसेल कशावरून, असा मनांत विचार येण्याबरोबर त्याला उत्साह आला. तो वाड्यांत गेला आणि देवडी-वाल्याला म्हणाला,

"राम राम, शिपाईदादा."

देवडीवाल्यानें त्याच्याकडे एक कुर्रेबाज नजर टाकली.

राम पुढें म्हणाला,

"मला अनगळ सावकारांना भेटायचंय शिपाईदादा."

रामच्या त्या बोलण्यानें शिपाईदादांना राग आलेला दिसला. ते त्याच्यावर ओरडून म्हणाले,

"आँ! कोन र तूं? शिरिमंत ननासायबास्नी नांवानं हटाकनारा कुटल्या गांवचा म्हाराज लागून ग्येलायास, आँ?"

शिपायाच्या रागाचें कारण समजतांच राम किंचित् मऊ स्वरांत म्हणाला,

"असं होय? मला माहीत नव्हतं त्यांना नानासाहेब म्हणतात तें!"

"म्हायती न्हवतं म्हन. मला इच्चारायचं व्हतंस, म्यां सांगितलं असतं. चल जा हतन. मुरदाड मानूस."

"मी माहुलीहून मुद्दाम आलों आहें शिपाईदादा."

"अर व्हय. म्हावलीस्न दर दिस मानसं येत्याती नि जात्याती."

"असं म्हणूं नका शिपाईदादा. मी नोकरीच्या आशेनं आलों आहें. नानासाहेबांना भेटूं दे मला एकदां! ब्राह्मणाचा एक गरीब मुलगा आहें मी!"

" अर बाबा, अस लई गरीब येत्याती. त्या सव्यांस्नी शिरिमंत नोकरी धेयाला लागल, तर त्येस्नीच चाकरी कराया लागल."

असें म्हणून आपण रामला श्रीमंतांच्याच शब्दांत धुडकावलें म्हणून त्याला जो आनंद झाला, त्यानें त्याचा तोच ह:ऽह:ऽ करीत हसूं लागला. एवढ्यांत सावकारांचा पुजारी तेथें आला, त्याला आपली करामत सांगण्याच्या आढ्यतेनें तो म्हणाला,

" अव पुजारीबावा, ह्ये बगीतलं काय, पोरगं शिरिमंतांकड नोकरी मागाया आलंया. ह्येच्यासाठीं नोकरी वाडून ठेवलीया व्हय हतं? म्यां सांगितलं त्येला, चल चालता व्हो. नोकरी न्हायी न् चाकरी न्हायी हतं."

तो पुजारी शांतपणें देवडीवाल्याला म्हणाला,

" नानासाहेबांनीं काय सांगितलं?"

" त्येंच्याकड धाडतुया कशाला मी?"

" काय वेडा आहेस तूं! अरे याचकाला विन्मुख धाडण्याचं पातक तूं कशाला घेतोस? जाऊं द्या बिचाऱ्याला, भेटूं दे श्रीमंतांना! त्याचं नशीब तुला तरी काय माहिती नि मला तरी काय माहिती. नसली नोकरी 'नाहीं' म्हणतील. निदान एक वेळचं जेवण नि चार पैसे दक्षणा तरी मिळेल गरीबाला! (रामला) चल रे माझ्या बरोबर."

" आतां तुमीच म्हंतायसा, म्हणून सोडतों त्येला आमंदीं. जा बाबा, जा. बग तुजं तकदीर!"

राम व पुजारी देवडींतून आंत गेले. सावकारांच्या दिवाणखान्या-जवळ आल्यावर पुजारी रामला म्हणाला,

" ते पाहा तिथं नानासाहेब बसले आहेत. त्यांना नमस्कार कर. फार दयाळू आहेत ते! असली तुझी वेळ चांगली, तर होईल तुझं काम!"

राम दिवाणखान्यांत आला व नानासाहेबांना नमस्कार करून म्हणाला,

"मी गरीब ब्राह्मण आहें. माहुलीहून आलों आहें."

"काय काम आहे ?" नानासाहेबांनीं अगत्याच्या स्वरांत विचारलें.

"मोठ्या आशेनं आलों आहें."

"ठीक आहे. पंक्तीला जेव न् चार पैसे दक्षणा घेऊन जा."

राम अजीजीच्या सुरांत म्हणाला, "आपण दयाळू आहांत. मी फार गरीब आहें. आपल्या वाड्यांत नोकरी मिळेल अशा आशेनं आलों आहें मी !"

"नोकरी ? नोकरी कसली करणार तूं ?"

रामला आशा वाटली. तो अधिक उत्साहानें किंचित् चढ सुरांत म्हणाला,

"कसली वाटेल तसली, आपण सांगाल तसली. माझ्यावर दोन माणसं अवलंबून आहेत. कांहींही करून त्यांच्या पोटापुरतं मिळालं म्हणजे झालं."

"खरं आहे. पण आमच्या इथं नोकरी नाहीं बाबा कसली ! एक शागीर्द मात्र पाहिजे आहे. करशील तूं शागिर्दीचं काम ?"

कसली कां असेना, नोकरी मिळणार याच आनंदानें राम हुरळून एकदम म्हणाला,

"करीन, फार उपकार होतील माझ्यावर !"

"उपकार होतील. सगळं कांहीं होईल; पण शागिर्दीचं काम होईल काय तुझ्या हातन ?"

"होईल होईल."

"अरे काय होईल काय ? काम नीट होईल काय तुझ्या हातन ? अरे, कारकुनाचं काम होतं, पण शागिर्दीचं होत नाहीं. तें अवघड नसतं पण कटकटीचं असतं."

"असूं दे. अवघड असूं दे, कटकटीचं असूं दे. जितकं अवघड नि जितकं कटकटीचं, तितकं चांगलं. त्यांत मला करामत तरी दाखवतां येईल."

"शागिर्दीत कसली करामत दाखवतोस दगडाची !"

"पण मी आपल्या कसोटीला उतरेन."

"वेळ पडली तर धुणं धुवावं लागेल, पाणी भरावं लागेल, [illegible]ंसुद्धा काढावीं लागतील."

"हो हो, काढीन. पण मला नोकरी द्या. दोन माणसांच्या पोटाला अन्न द्या."

"ठीक आहे मग. राहा आमच्या इथं आजपासन. अरे, याला आंत घेऊन जा आणि आमच्या ह्यांना म्हणावं, हा मुलगा आजपासन आमच्या इथं शागीर्द राहिला आहे. याला काम सांगा. (रामला) चार आठ दिवसांनीं तुझं काम पाहून वेतन ठरवूं हं !"

★

# ६

शागिर्दाची कां होईना, पण एकदा नोकरी मिळाली, आतां मला मिळणारे सगळे पैसे मी आईला पाठवीन, मग तिला पहिल्यासारखे कष्ट करावे लागणार नाहींत, अशा सुखद विचारांनीं रामला फार आनंद झाला. तो उत्साहानें काम करूं लागला.

शागिर्दाचेंच काम तें ! आणि त्यांत सावकारांच्या वाड्यांतला राबता ! आणखी दोन शागीर्द त्यांच्या येथें काम करीत होते. त्यांच्या हाताखालीं आलेला हा नवा शागीर्द. पुष्कळदां त्यांचेंदेखील काम याला करावें लागायचें. कामाच्या रगाड्याखालीं त्याला एवढीदेखील उसंत मिळेनाशी झाली. आतांपर्यंत खावें, प्यावें नि नदींत डुंबावें असे त्याचे दिवस गेलेले, त्यामुळें आरंभीं त्याला तें फार जड गेलें, त्रास झाला, कित्येकदां अपमान वाटला, कित्येकदां 'नको ही नोकरी' असा त्याला वैतागही आला. पण आईसाठीं हें सगळें सहन करायला पाहिजे असें त्यानें ठरविलें.

असेही कांहीं दिवस गेले. रामला कामाचा सराव झाला. लोकांशीं बोलण्यालाही तो कांहींसा चेचवड झाला. कामाचा उरक अ म्हणून असो, किंवा काम करतां करतां देखील कशी विश्रांति घ्या हें तो शिकला म्हणून असो, आतां त्याला पहिल्यासारखा त्रास मांत. होईना. मनाला थोडी स्वस्थता मिळाली, कीं "नोकरी करूनदेखील मी शिकेन" असें आईजवळ म्हटलेलें त्याला आठवे आणि तो विचार मात्र त्याला बेचैन करी. अलीकडे अलीकडे "आपण नुसती पूजा शिकलों असतों तरी देखील फार बरं झालं असतं; इथं येणाऱ्या शास्त्रीबुवांसारखी तासा दोन तासांत पूजा आटपून बाकी सगळा वेळ दुसऱ्या अध्ययनांत घातला असता." असेही विचार त्याच्या डोक्यांत येऊं लागले. याच शास्त्रीबोवांना "तुम्ही मला पूजा शिकवाल का?" असें एकदां विचारून तरी पाहूं या, असें त्यानें मनाशीं ठरविलें. दुसऱ्याच दिवशीं त्याला ती संधी मिळाली.

आज सकाळीं बाईसाहेबांचें मध्येंच थोडें अधिक काम निघाल्यामुळें शास्त्रीबोवा पूजेला येईपर्यंत त्यांचें गंध उगाळून ठेवण्यास रामला सवड झाली नव्हती. पूजेची तयारी होती, पण ठिकाणावर गंध दिसलें नाहीं. तेव्हां शास्त्रीबोवा ओरडून म्हणाले,

"अरे राम, गंध नाहीं उगाळलंस अजून?"

"आत्तां उगाळून देतों, सकाळपासन सवडच झाली नाहीं हो!"

"अलीकडे तूं फार आळशी व्हायला लागलास!"

राम गंध उगाळतां उगाळतांच बोलूं लागला, "नाहीं हो शास्त्रीबुवा, मला किती किती आणि कसलं कसलं काम करावं लागतं, तें कसं सांगूं तुम्हांला? कामाचं कांहीं नाहीं वाटत मला, पण काम करूनच्या करून काय वाटेल तें बोलूनही घ्यावं लागतं. एकसारखं आपलं 'राम्या, हें केलं नाहींस, राम्या, तें केलं नाहींस, राम्या–राम्या–राम्या!' राम्यानं कान किटून जातात दिवसभर! तुम्हीच तेवढे मला 'राम' म्हणतां, तुमचाच तेवढा या वाड्यांत विरंगुळा वाटतो."

" पण करणार काय ? पत्करलेलं काम करायला पाहिजे...."

" यापेक्षां या सातार्‍यांतच वडर होऊन चार दगड टाकले असते नि एक वेळ पोटाला मिळालं असतं तरीसुद्धा चांगलं झालं असतं असं वाटतं."

" वडर कशाला ? नुसती एक पूजा म्हटली असतीस तरीसुद्धा मानानं पोटाला मिळवलं असतंस !" शास्त्रीबोवा बोलतां बोलतां देव उतरूं लागले व तोंडानें अस्पष्ट अशी पूजा म्हणूं लागले.

" अगदीं माझ्या मनांतलं बोललांत शास्त्रीबुवा."

" म्हणजे ?"

" कालपासून मलासुद्धा वाटतंय, कीं पूजा शिकावी...."

" आतां वाटून काय उपयोग ? संस्कृत भाषेला लहानपणीं जीभ वळते. तुझ्या वयांत जीभ दगडासारखी होते. जीभ वळायची नाहीं. तुला कांहीं यायचं नाहीं नि शिकवणारा मात्र मूर्ख ठरायचा !"

राम काकुळतीनें म्हणाला,

" नाहीं हो शास्त्रीबुवा ! येईल मला ! चार दिवस वेळ लागेल, पण येईल, ब्राह्मणाची जीभ आहे ती ! तुम्ही मुद्दाम शिकवूं नका. पूजा करतांना थोडं स्पष्ट म्हणा, तें ऐकूनसुद्धा मी पाठ करीन."

शास्त्रीबोवा त्याच्याकडे पाहून हसले, पण पूजा थोडी स्पष्ट म्हणूं लागले. गंध उगाळतां उगाळतां रामही पूजा पुटपुटूं लागला.

तोंच किशा शागीर्दानें " राम्या, राम्या, अरे राम्या " अशा दोनतीन हाका मारल्या. पण रामचें त्याच्याकडे लक्ष नव्हतें. तेव्हां किशा तेथें आला आणि त्याचा कान धरून म्हणाला,

" मगापासन तुझ्या नांवानं कोकलतोंय, ऐकूं आलं नाहीं ? आत्तां इतक्यांत नानासाहेब येतील. त्यांचे हातपाय धुण्याची तयारी काय तुझ्या बापानं करायची ? चल ऊठ."

असें म्हणत किशानें रामला उठवलें. राम किशाच्या पुढें चालूं लागला. जातां जातां किशा त्याला हिणवण्यासाठीं पुन्हा म्हणाला,

"मूर्ख नाहींतर, शागिर्दीचं काम करून याज्ञिकी शिकतां आ असती, तर आत्तांपर्यंत मीसुद्धा मोठा शास्त्री होऊन बसलों असतों."

'राम्या-किशांनीं' नानासाहेबांच्या हातपाय धुण्याची तया केली तोंच नानासाहेब आल्याची वर्दी देण्यासाठीं एक शिपाई आल व चुटक्या वाजवीत म्हणाला,

"अर राम्या-किशा, आल आल, नानासाब आल."

लागलीच किशानें धोतर सावरल्यासारखें केलें. रामनें घंगाळांतला तांब्या भरून घेतला. खांद्यावरचा पंचा नीट सावरून ठेवला. नानासाहेबांच्या खडावा ऐकूं येतांच दोघेही तयारीनें राहिले. नानासाहेब एका गृहस्थाबरोबर बोलत येत होते. चौरंगाजवळ येतांच एका शिपायानें त्यांच्या पायांतल्या खडावा काढल्या, त्या कपाळाला लावल्या व बाजूला ठेवल्या. रामनें त्या शिपायाकडे एकदा तिरस्कारानें पाहिलें. नानासाहेब चौरंगावर बसतांच किशानें त्यांचा पाय हातांत घेतला व रामकडे पाहून डोळ्यानें खूण केली. लागलीच राम पाणी घालूं लागला. नानासाहेबांच्याबरोबर आलेला गृहस्थ नानासाहेबांच्या कानाकडे पाहात आनंदाच्या कौतुकी स्वरांत म्हणाला,

"वा: वा: ! चांगला जिन्नस लायक ठिकाणीं चढला म्हणजे मुलगी सुस्थळीं पडल्यासारखा आनंद होतो आम्हा सराफांना !"

ते गृहस्थ म्हणजे पुण्याचे एक प्रसिद्ध सराफ होते. परवांच त्यांनीं नानासाहेबांना एक चांगली तेजस्वी आणि मोलवान् भिकबाळी दिली होती. ती आजच नानासाहेबांनीं कानांत घातली होती. तिचेंच वर्णन सराफानें आत्तां केलें होतें. शेठजींचा रोख लक्षांत घेऊन नानासाहेब कांहींशा विनोदी पण कांहींशा खोचक सुरांत म्हणाले,

"वा: वा: ! शेठजी, आम्हांला हरभऱ्याच्या झाडावर चढवून चांगलीच किंमत उकळायचा बेत दिसतोय् आपला."

शेठजींनींही नानासाहेबांच्याच सुरांत उत्तर दिलें,

"आम्हांला हिऱ्यामोत्यांची परीक्षा असते तशी माणसांचीही परीक्षा असते, नानासाहेब. पैसे केंव्हां आणि कुठें उकळायचे व रास्त किंमतच कुठें घ्यायची हें आम्हांला समजतं."

"असं असं. मग आम्ही कुठल्या यादींत आहोंत?"

"हिऱ्या-मोत्यांचे दागिने गहाण ठेवून घेणाऱ्या छत्रपतींच्याही सावकारांना उगीच अवास्तव किंमत सांगून आपलंच हसं करून घेण्यांत काय अर्थ आहे बरं?"

"मग काय किंमत आहे? सांगा तरी."

"एक हजार रुपये फक्त."

"काय? एक हजार? अबब!"

"माल पाहा. याच्या तोडीचे दोनच नग माझ्या हातून गेले आहेत. एक श्रीमंत पेशव्यांच्या कानांत आहे आणि दुसरी भिकबाळी, केशवशास्त्र्यांनीं मागें पुण्यास शास्त्र्यांची सभा जिंकली त्या वेळीं श्रीमंतांनीं खूष होऊन स्वतः त्यांच्या कानांत घातली, ती!"

सराफाच्या या बोलण्याबरोबर राम मनांत चरकला. "आपल्या विद्वत्तेवर तुझ्या वडलांनीं सभा जिंकली होती. ते म्हणत, राम, मी तुलासुद्धा शास्त्री करणार आहें. मग तूंसुद्धा अशीच मानाची भिकबाळी जिकशील हं." हे त्याच्या आईचे शब्द त्याला एकदम आठवले. त्याला आपण दिलेलें उत्तरही आठवलें. तो वर नानासाहेबांच्या कानांतील भिकबाळीकडे पाहूं लागला. वर पाहात पायांवर पाणी घालीत असल्यामुळें पाण्याची धार नीट पायांवरच पडेना. ती वर वर जाऊन नानासाहेबांचें पिंडरीपर्यंत धोतर भिजलें. नानासाहेबांना संताप आला. त्या भरांत त्यांनीं खाड्कन् रामच्या मुस्काडांत मारली आणि म्हटलें,

"राम्या, गाढवा, कुठें आहे तुझं लक्ष? कुठें ओततोस पाणी? अं?"

"नाहीं" खिजलेल्या रामनें कांहीं तरी उत्तर दिलें.

"नाहीं काय ? किशा, दे रे त्याला एक थप्पड !" किशानें रामला थप्पड दिली. रामनें त्याच्याकडे रागानें पाहिलें. त्याला फार अपमान वाटला, पण तो त्यानें गिळला.

"पाहातोस काय ? आणखी थोबाडून काढला पाहिजे तुला. काम एकीकड, लक्ष दुसरीकड, अं ? कुठें बघत होतास पाणी घालतांना ?"

रामनें उत्तर दिलें नाहीं. सावकारांनीं पुन्हा दरडावून विचारलें,

" अं ? कुठें होतं तुझं लक्ष ?"

"आपल्या कानांत चमकणाऱ्या भिकबाळीकड माझं लक्ष गेलं होतं."

"कां ? कां रे बाबा ! माझ्या भिकबाळीकड कां लक्ष गेलं तुझं ?"

"तेजस्वी आहे, प्रकाश पडून त्याचं आपल्या गालावर वलय झालं होतं, फार सुंदर दिसत होतं तें !"

"अगदीं तोंडाला पाणी सुटण्यासारखं ? अशी भिकबाळी आपल्या कानांत असावी असं वाटण्यासारखं ? अं ?"

रामनें खालच्या मानेनें उत्तर दिलें, "होय."

"अशी भिकबाळी कानांत असावी असं तुला वाटलं ?" नानासाहेबांनीं आश्चर्यानें विचारलें.

"हो. मला वाटलं, माझ्या कानांत अशी भिकबाळी असती तर....तर...."

"तर काय ? बोल कीं. तुझ्या कानांत ही कशी दिसली असती असं तुला वाटतं ?"

राम स्तब्ध होऊन सावकारांकडे नुसतें पाहूं लागला. त्यांच्या चर्येवर, आपल्याला तुच्छ लेखून हिणवण्याचा भाव त्याला दिसला म्हणून तो कांहीं बोलला नाहीं.

सावकार त्याच्याकडे तुच्छतेनें पाहात आहेत हें पाहून किशा व पांडूही रामाकडे तिरस्कारानें पाहूं लागले. राम अस्वस्थ होऊं लागला.



"मला वाटलं, मा
कानांत अशी भिकबा
असती तर ... तर .



"होऽआ असू दे
आमचा गमनेडा"

"बोलून चालून शागीर्द तूं," किशा रामला म्हणाला, "एखादा दागिना असला तरीही आंगावर घालायला लाज वाटली पाहिजे."

"अर, तुला एवडी बी अकुल नाय, भिकबाळी घालायाच्या नशीबाचा असतास तर हातामंदी भीकझोळी घेऊन शेगीर्द कशापायी झाला असतास? म्होट म्होट राज, सरसेनापती, सरदार, सावकार ह्येस्नीच असल दागिन सोबत्यात."

पांडोबाच्या त्या बोलण्यानें नानासाहेब खूष झाले. त्यांनींही पांडोबालाच दुजोरा दिला.

"समजलं काय राम्याजीपंत? पुरुषाच्या तोंडावर वीराचं, लक्ष्मीचं नाहींतर सरस्वतीचं तेज असलं तरच दागिन्यांनीं त्याची शोभा वाढते. एकाद्या विद्वान, पंडित शास्त्र्यानं असली भिकबाळी घातली तर मात्र ती त्याला शोभेल."

"असल्याच कांहींतरी विचारांत हा गुंग असतो," किशा मध्येंच म्हणाला, "नि कामं नीट करीत नाहीं. तेव्हां नानासाहेबांनींच त्याला एकदा बजावून सांगावं, कीं तूं शागीर्द आहेस. शागिर्दाचीं कामं तुला करायला पाहिजेत."

आतांपर्यंत चाललेल्या या सगळ्या प्रकारानें रामच्या आंगाचा संताप होऊन गेला होता. विशेषतः पांडोबाच्या आणि किशाच्या हिणवण्यानें तो अधिक चिडला. तो एकदम म्हणाला,

"तें सांगायला कशाला पाहिजे? मी शूर नाहीं, श्रीमंत नाहीं, विद्वान नाहीं. तुझ्यासारखाच एक शागीर्द आहें. पण श्रीमंतांचे पाय चाटणारा कुत्रा नाहीं. मी एक मनुष्य आहें."

बोलतां बोलतां रामनें हातांतला तांब्या खालीं ठेवला व तो निघून जाऊं लागला. रामच्या या उर्मटपणाचा नानासाहेबांना राग आला. त्यांनीं पांडूला हुकूम सोडला,

"पांड्या, बघतोस काय? धरून आण त्याला इकड. पायावर पाणी घालायचं सोडून चाललाय कुठें! घरांतल्या शागिर्दांचे असले चोजले मला मुळींच खपायचे नाहींत."

एवढ्यांत पांडूनें रामला धरून आणून नानासाहेबांच्या पुढें उभें केलें. त्याला उद्देशून नानासाहेब हुकमी स्वरांत म्हणाले,

"उचल तो तांब्या."

पण रामनें तांब्या उचलला नाहीं. तो रागानेंच नानासाहेबांच्या तोंडाकडे टक्क लावून पाहात होता. नानासाहेब पुन्हा त्याच्या आंगावर ओरडले,

"तुला फार मस्ती आलीय. उतरायला पाहिजे ती. उचल तांब्या अगोदर! उचलतोस कीं नाहीं?"

तरीही राम घुम्म्यासारखाच राहिला. नानासाहेबांचा राग अनावर झाला. त्यांनीं त्याच्या आणखी एक मुस्काडांत दिली आणि किशाला हुकूम सोडला,

"किशा, देरे तांब्या त्याच्या हातांत. बघतों कसा पाणी घालीत नाहीं तें!"

किशानें तांब्या भरून उचलला व रामच्या हातांत देण्यासाठीं त्यानें त्याचा हात धरला. रामनें त्याच्या हातांतला तांब्या हिसकून घेतला आणि तसाच जमिनीवर आपटून म्हटलें,

"नमस्कार नानासाहेब, या घटकेपासून मी तुमचा शागीर्द नाहीं. तुमच्या म्हणण्याप्रमाणें मी विद्वान् पंडित किंवा शास्त्री होऊन मनुष्यांत येईन, तरच तुम्हांला तोंड दाखवीन."

★

# ७

मनुष्याच्या आयुष्यांत कोणता प्रसंग कोणती क्रांति घडवील हें कांहीं कोणाला सांगतां येणार नाहीं. नानासाहेबांच्या वाड्यांत अगदीं अकल्पितपणें घडलेल्या या प्रसंगाच्या पोटांत रामच्या आयुष्यांतील कोणत्या क्रांतिकारक घटना सांठवून ठेवल्या होत्या, हें काय कोणाला सांगतां आलें असतें ?

त्या एकंदर प्रकारांनीं, नानासाहेबांच्या आणि त्यांच्या सेवकांच्या मर्मभेदक शब्दांनीं रामचा स्वाभिमान एकदम जागा झाला. मानहानि करणारांचा जळजळीत शब्दांनीं धिक्कार करून तो नानासाहेबांच्या वाड्यांतून बाहेर पडला.

तो सरळ गांवाच्या बाहेर आला. एका आंब्याच्या गर्द छायेखालीं तो तास दोन तास स्वस्थ बसला, तेव्हां कोठें त्याचें उसळलेलें रक्त थोडें शांत झालें. आतां तो थोडा शांतपणें विचार करूं लागला. चांगला प्रहरभर तरी तो तसाच विचारांत पडला होता. अखेरीस त्यानें निश्चय केला. तो आवेशानें उठला व सरळ माहुलीच्या रस्त्याला लागला.

त्यानें दहावीस पावलें टाकलीं असतील नसतील तों तो थबकला. त्याच्या डोक्यांत आणखी एक विचार आला. तो रेंगाळूं लागला. एकदां परतही फिरला. पण एका दृष्टीनें आज तो बेरड झाला होता. आपल्या निश्चयाच्या आड येणारे कोणतेही मायामोह, कोणत्याही लहानमोठ्या अडचणी जुमानायच्या नाहींत असें त्यानें ठरवलें. तो पहिल्यापेक्षांही आनंदी चर्येनें माहुलीचा रस्ता पुन्हा चालूं लागला. नोकरीला राहिल्यापासून तो घरीं गेला नव्हता. शेणांतल्या किड्याचें जिणें टाकून एक मोठी महत्त्वाकांक्षा पुरी करण्याकरतां आईचा आशीर्वाद मागण्यासाठीं आज आपण माहुलीला निघालों आहों, या

विचारानें त्याला अधिक उत्साह वाटला. त्याचीं पावलें जलद पडूं लागलीं. राम आपल्या घरीं आला. त्या वेळीं त्याची आई घरीं नव्हती. जानकी आंत कांहींतरी काम करीत होती. रामनें अंगणांतूनच हाक मारली,

"आई, आई !"

हाक ऐकून जानकी बाहेर आली. रामला पाहातांच तिला आनंद झाला. पण ती फार लाजली. रामला बसण्यासाठीं तिनें सोप्यावर पाट मांडला व टेकायलाही पाठीमागें एक पाट ठेवला. पाट मांडतां मांडतां ती म्हणाली,

"नदीवर गेल्याएत."

तिच्या सगळ्या हालचालींकडे रामही कौतुकानें पाहात होता. पाट मांडून झाल्यावर जानकी रामजवळ गेली. तिनें त्याच्या हातांतलें गांठोडें घेऊन खालीं ठेवलें, त्याला हाताला धरून पाटावर आणून बसवलें. त्याला पाटाकडे आणतां आणतां ती म्हणाली,

"आतां नांवानं हाक मारून 'ये' म्हणणार नाहीं. मी शाहाणी झाल्येंय."

"मग मलासुद्धा आतां शाहाणं व्हायला पाहिजे तर !" कांहींशा विनोदानें रामनें उत्तर दिलें.

मान वेळावीत लटक्या रुसव्यानें जानकी म्हणाली,

"अंऽ चला जा, मी नाहीं."

"नाहीं म्हणजे ? मी शाहाणा व्हायला नको ? बायको शाहाणी नि नवरा वेडा असूं दे !"

रामच्या त्या बोलण्यानें जानकीच्या अल्लडपणानें एकदम उसळी मारली. लाडिकपणें त्याला एक चापटी मारीत ती म्हणाली,

"होऽओ. असूं दे आमचा राम वेडा."

"तुमचा राम वेडा असूं दे पाहिजे तर, पण शाहाण्या बायकोच्या वेड्या नवऱ्याला तरी कांहीं लाज वाटली पाहिजे कीं नाहीं ?"

बोलतां बोलतां राम गंभीर होऊं लागला.

"हें काय हो!" जानकीही थोड्या गंभीरपणें म्हणाली, "एका शब्दाबद्दल असं लाजवतां तें! चुकलें मी तसं म्हटलं तें! आतां नाहीं ना रागावणार?"

असें म्हणत त्याच्या तोंडाकडे पाहात त्याच्या हनुवटीला धरून त्याची मान हालवीत ती पुढें म्हणाली,

"अं? ना–आ–हीं, नाऽहीं, नाऽहींऽऽईच्."

"राग? मला राग आहे कुठें?"

त्याच्या नाकावर बोटाची चापटी मारून जानकी विनोदी स्वरांत म्हणाली,

"इथ्थं, नाकाच्या शेंड्यावर...."

रामनें एक मोठा सुस्कारा टाकला. तो कांहींशा वैतागानें म्हणाला, "हंऽ त्याला फार दिवस झाले. त्या वेळीं मी शास्त्रीबुवांचा राम होतों, आतां राम्या शागीर्द आहें. नाकांत वेसण घातलेला, चोवीस तास कामाला जुंपलेला घाण्याचा बैल आहें."

रामच्या त्या बोलण्यानें जानकी चरकली.

"आपल्याला तिथं इतकं काम करावं लागतं?"

"कामाचं चीज असलं तर माणूस ढोरासारखं काम करूनसुद्धा हसतमुख असतं; पण श्रीमंताच्या घरांतला शागीर्द, म्हणजे ओझं वाहाणारा नुसता गाढव, लाकडाच्या खोडाचा, चामड्यानं मढवलेला मृदंग, दोन्ही तोंडांवर थपडा खाण्यात आणि थपडा देणाऱ्याच्या मर्जीप्रमाणं 'जी बाईसाहेब', 'हां साहेब' असे गोड आवाज काढावेत. मन नाहीं, मान नाहीं, बुद्धि नाहीं. जनावरंसुद्धा एखादेवेळीं मान झुंडारतात...."

बोलतां बोलतां रामचा आवाज त्वेषानें चढूं लागला. जानकीला तें सहन झालें नाहीं. ती मध्येंच म्हणाली, "असल्या ठिकाणीं इतके दिवस राहिलांत तरी कसे?"

" एकटा असतों तर खरंच राहिलों नसतों."

" मग काय ? बायकोसाठीं ? आईसाठीं ?"

रामचें जानकीच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतें. तो पुढें म्हणाला,

" माणसांतलं मनुष्यपण नाहींसं करणारी, पदोपदीं मानहानि करणारी ही नोकरी करण्यापेक्षां मी एकटा असतों तर खरंच मरण पत्करलं असतं."

तें ऐकून जानकीही थोडी चिडून म्हणाली,

" बोलूं नका अगदीं. नवऱ्यानं असल्या मानहानीनं मिळवलेलं अन्न खाण्यापेक्षां मी चार घरीं अधिक कष्ट केले असते, अर्धपोटीं राहिलें असतें."

उद्वेगानेंच पण किंचित् हसून राम म्हणाला,

" जानकी, नुसतं ऐकून तुला इतका राग येतो. तर मला काय वाटत असेल बरं ?"

" कांहींसुद्धा वाटत नाहीं. तसं वाटलं असतं तर तुम्ही ती नोकरी केव्हांच सोडली असतीत."

"काय वाटत होतं नि किती वाटत होतं, तुला कसं सांगूं जानकी ? तुम्हांला तोंड दाखवायला शरम वाटत होती मला. मानहानीचे कढ सांठत सांठत एक दिवस फार झालं. कालचाच दिवस तो. काल मीं अनगळ सावकाराच्या नोकरीवर लाथ मारली."

अभिमानानें आणि आनंदानें जानकीनें विचारलें,

" लाथ मारली ?"

" हो. लाथ मारली आणि निश्चय केला."

" निश्चय केला ? कसला ?"

" शिकायचं, विद्वान व्हायचं, शास्त्री व्हायचं," राम निश्चयाच्या उत्साही स्वरांत सांगूं लागला, " मग कांहींही होवो, कितीही कष्ट पडोत, कसलेही हाल सोसावे लागोत, जगाच्या पाठीवर कुठेंही जावं लागो,

मानानं जिवंत राहाण्याइतकी विद्या संपादन केल्याखेरीज राहायचं नाहीं, असा मीं निश्चय केला आहे. कुठं जायचं, काय करायचं, कसं राहायचं, हेंही मीं ठरवलं आहे. आईचा आशीर्वाद घ्यायला आणि तुझा निरोप घ्यायला आलों आहें मी."

जानकीनें उत्सुकतेनें विचारलें,

"कुठं जायचं ठरवलंय विद्या शिकायला?"

"फार लांब, काशीला."

"काशीला जाणार?"

तोंच नदीवरून त्याची आई आली. तिनें रामचें व जानकीचें शेवटलेंच वाक्य ऐकलें होतें. तिलाही आश्चर्य वाटलें. तिनें आश्चर्यानेंच विचारलें,

"कोण? राम? राम काशीला जाणार?"

सासूला पाहातांच जानकी आंत पळून गेली. रामनें आईजवळची घागर घेतली. दोघेंही आंत गेलीं.

★

# ८

रामनें घडलेली सगळी हकीकत आईला सांगितली. ठरलेला बेतही सांगितला. तें सगळें ऐकून रामच्या आईला एकीकडून आनंदाचें भरतें येत होतें, तर एकीकडून राम आपल्यापासून फार दूर जाणार म्हणून काळजीही वाटत होती. पण ती चांगली खंबीर मनाची होती. रामच्या मनाचा झालेला कोंडमारा तिनें ओळखला होता. त्याचा झालेला निश्चयही लेचापेचा नव्हता, हेंही तिनें जाणलें होतें. तिनें त्याचा पाय मागें ओढला नाहीं, एवढेंच नव्हे, तर आपल्या आशीर्वादपर शब्दांनीं त्याच्या अंतःकरणांतली महत्त्वाकांक्षेची ज्योत तिनें प्रज्वलितच केली. जानकी तर काय, अगदीं पहिल्यापासून

तिच्याच हाताखालीं वागलेली, अगदीं लहानपणापासून रामच्या सहवासांत असलेली, त्याच्याच मोठेपणांत आपला मोठेपणा मानणारी, तिनेंही त्याला उत्साह दिला, धीरानें निरोप दिला.

माहुलीहून काशीचा प्रवास म्हणजे लहानसहान गोष्ट नव्हे. पण रामनें तो पार पाडला. रस्त्यांत त्याला फार कष्ट पडले. पण ते सगळे त्यानें सहन केले. आईचा आशीर्वाद, जानकीचा उत्साही निरोप, विशेषतः विद्वान शास्त्री होऊन मानाचें जिणें जगण्याची महत्त्वाकांक्षा, यांनीं त्याच्या आंगांत खडतर कष्ट सोसण्याची अमोघ शक्ति निर्माण केली होती.

राम काशीला आला. विश्वेश्वराचें शिखर दिसतांच त्यानें त्याला मोठ्या भक्तिभावानें नमस्कार केला. गंगेवरच्या देखाव्यानें तर त्याचें अंतःकरण भरून आलें. पुष्कळ लोक आंघोळी करून घाटावर येऊन पोथ्यांचीं पारायणें करीत होते, तर दुसरे कांहीं लोक घाटावरून गंगेंत उड्या मारीत होते. बुड्या मारून स्नान करणारे लोक गंगास्तोत्र म्हणत होते.

"काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजठरव्यापिनी ज्ञानगंगा।"

"स्वर्गारोहणवैजयंति भवतीं भागीरथि प्रार्थये।"

"झंकारकारि हरिपादरजोपहारि गांगं पुनातु सततं शुभकारि वारि।"

त्या सगळ्या देखाव्यानें रामचें अंतःकरण प्रसन्न झालें. पण आपल्याला गंगेची अशी प्रार्थना करतां येत नाहीं म्हणून त्याला फार वाईट वाटलें. तो गंगेला उद्देशून म्हणाला,

"माते गंगे, हे सगळे ब्राह्मण किती गोड नि पवित्र वाणीनं तुझी प्रार्थना करताहेत. मी देखील ब्राह्मणाच्याच जन्माला आलों आहें." तोंच त्याला आणखी एक स्तोत्र ऐकूं आलें.

"सकलकलुषभंगे स्वर्गसोपानसंगे
प्रचुरतरतरंगे देवि गंगे प्रसीद।"

" वा: किती गोड शब्द ! अंत:करण अगदीं प्रसन्न होतं. ब्राह्मणांच्या या पवित्र वाणीला मी पारखा झालों आहें; पण हे जगन्माते गंगे, तुझ्या या वेड्या पुत्राची बालभाषेंतील प्रार्थना ऐक. तुझ्या आश्रयाला आलेल्या लाखों लोकांना तूं विद्या मिळवून दिलीस. मीही विद्येच्या आशेनं आज तुझ्या पायांजवळ आलों आहें. मला लाथाडूं नको. आईच्या मायेनं आशीर्वाद दे. मला विद्या दे. "

रामनें स्नान केलें. विश्वेश्वराचें दर्शन घेतलें. थोडा फराळ केला. थोडी विश्रांति घेतली. मग त्यानें काशींतल्या पाठशाळांची चौकशी केली. पायगुंडे गुरुजींची पाठशाळा फार चांगली आहे, गुरुजीही मोठे दयाळू आहेत, असें त्याला समजलें. तेव्हां तो सरळ गुरुजींकडे गेला. त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें आणि म्हणाला,

" मी एक अनाथ गरीब मुलगा आहें. फार लांबून, म्हणजे दक्षिण देशांतील माहुली गांवाहून आलों आहें. शास्त्रविद्या शिकण्याच्या हेतूनें आलों आहें. गुरुजींनीं कृपाळू होऊन मला विद्या द्यावी, एवढीच प्रार्थना आहे. "

" ठीक ठीक. मी विद्या देईन तुला ! बरं, आतांपर्यंत कुठल्या पाठशाळेंत होतास ? " गुरुजी म्हणाले.

त्या प्रश्नानें रामला लाज वाटली. त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां गुरुजींनींच पुन्हा विचारलें,

" कुठपर्यंत पठण झालं आहे तुझं ? "

तरीही रामनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्यानें मान खालीं घातली. गुरुजी पुढें म्हणाले,

" व्युत्पत्ति झालीच असेल. "

रामनें खालच्या मानेनें उत्तर दिलें, " नाहीं. "

" बरं, षड्लिंगें ? "

रामनें पहिल्यासारखेंच उत्तर दिलें, " नाहीं. "

" नाहीं ? बरं कौमुदी ? "

" नाहीं. " अतिशय जड स्वरानें रामनें म्हटलें.

" नाहीं ? बरं समासचक्र ? "

" नाहीं. " असें म्हणतांना रामचा स्वर रडका झाला.

" तेंही नाहीं ? बरं रूपावली ? "

" नाहीं. "

रामच्या त्या उत्तरानें गुरुजींना आश्चर्यही वाटलें आणि या दगडाला घडवण्यांत कांहीं अर्थ नाहीं असेंही वाटलें. ते कांहींशा कठोर स्वरांत म्हणाले,

" रूपावलीही नाहीं ? मग शिकला आहेस तरी काय ? "

लाजेनें रामही बेभान झाला होता. तो वैतागानें म्हणाला,

" काय शिकलों आहें ? खूप खूप शिकलों आहे. धोतरं बडवायला, पाणी भरायला, पाय धुवायला, भांडीं घासायला...." रामच्या वैतागानें गुरुजी शांत झाले. त्याला पश्चात्ताप झाला आहे, त्याची शिकण्याची इच्छा आहे, हें त्यांच्या पुरतें लक्षांत आलें, तेव्हां मध्येंच ते रामला म्हणाले,

" शांत हो, शांत हो. तुला कांहींही येत नसलं तरी हरकत नाहीं. शिकण्याची तुझी इच्छा आहे ना ? "

" इच्छा ! किती प्रबल इच्छा आहे म्हणून सांगूं आपल्याला ? "

" होय ना ? माणसाची इच्छा आणि प्रयत्न जगांत काय करणार नाहीं ? मी तुला अगदीं पहिल्यापासून शिकवीन, चांगला विद्वान् करीन तुला. "

या वेळीं रामला किती आनंद झाला असेल, गुरुजींच्याबद्दल कोणत्या कोणत्या भावनांनीं त्याचें अंतःकरण उचंबळून आलें असेल, तें कोण वर्णन करणार. तो गहिंवरून आला होता. त्याच्या डोळ्यांत अश्रु होते. त्यानें गुरुजींना साष्टांग नमस्कार घातला. गुरुजींनीं त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला.

★



" तुमचा सहाध्यायी राम, आज रामशास्त्री झाला. "
" खरंच माझा राम रामशास्त्री झाला, त्यानं मानाची शालजोडी मिळवली. "



# १

राम वयानें मोठा होता. वयोमानाप्रमाणें व्यवहारांतल्या इतर व्यवधानांनीं त्याचें अंतःकरण व्यापलें होतें. म्हणजे अभ्यासाला लागणारी विद्यार्थ्याची निर्विकार नि निष्काळजी वृत्ति त्याची राहिली नव्हती. पाठांतरासाठीं विद्यार्थ्याला अत्यावश्य असणारी मनाची शांत वृत्ति त्याची चळली होती. तरीही रामला शिष्य म्हणून पत्करल्याचा त्याच्या गुरुजींना कधींही पश्चात्ताप झाला नाहीं. उलट दिवसेंदिवस त्याला शिकवण्यांत गुरुजींना साभिमान आनंदच वाटूं लागला. एकदां ते आपल्या शिष्यांना म्हणाले देखील,

"तैल बुद्धीचा मेहनती विद्यार्थी स्वतःबरोबर आपल्या गुरूलाही यश आणि दिगंत कीर्ति मिळवून देतो. माझ्या शिष्यांत राम असा सर्वोत्तम शिष्य आहे."

कोठलाही मायामोह आड येऊं न देतां निश्चयानें आणि अविश्रान्त मेहनतीनें रामनें आपल्या गुरुजींजवळ सतत बारा वर्षें अध्ययन केलें. तो वेदशास्त्रपारंगत विद्वान शास्त्री झाला. त्याचें अध्ययन पूर्ण झाल्यावर गुरुजींनीं आपल्या सगळ्या शिष्यांची सभा भरवून रामला वेदशास्त्रपारंगततेची शालजोडी अर्पण करण्याचा समारंभ केला. त्या वेळीं रामवरील प्रेमामुळें त्यांचें अंतःकरण इतकें भरून आलें होतें, कीं त्यांच्या मनांत असून देखील त्यांना अधिक बोलवलें नाहीं. ते आपल्या शिष्यगणाला उद्देशून एवढेंच म्हणाले,

"तुमचा सहाध्यायी राम, आज रामशास्त्री झाला."

आणि लागलीच त्यांनीं रामला शालजोडी व नारळ अर्पण केला. रामनें ती शालजोडी अंगावर घेऊन गुरुजींना नमस्कार केला. तेव्हां सभेंतले सगळे विद्यार्थी त्याचा गौरव करण्यासाठीं त्याच्या नांवाचा घोष करीत म्हणाले,

"वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्री, वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्री."

रामचेंही अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें. तो कांहींसा गद्गद स्वरांत म्हणाला, "शिकण्याचं वय निघून गेलेला, पखालीनं पाणी वाहाणारा, मनुष्यजातींतला, शागीर्दाच्या रूपांतला हा अडाणी रेडा आज या पदाला पोंचला त्याचं सगळं श्रेय माझ्या गुरुजींना आहे. कोणत्याही औपचारिक गुरुदक्षिणेनं त्यांचं ऋण माझ्या हातून फिटणार नाहीं."

गुरुजींनीं त्याला धीरगंभीर स्वरानें आशीर्वाद दिला,

"बेटा राम, रामशास्त्री, विद्येसारखी शक्ति नाहीं, विद्येसारखं अमोघ शस्त्र जगांत दुसरं नाहीं. तें कोणाला हिरावून घेतां येत नाहीं, शस्त्रानं छिनलं जात नाहीं, अग्नीनं जाळलं जात नाहीं. विद्या ही देवानं दिलेली पवित्र देणगी आहे. ती तुझी एकट्याची नाहीं. अगदीं निरपेक्षवृत्तीनं ती दुसऱ्याला दे. धर्म, न्याय, समाज आणि राजा यांना तुझ्या विद्येचा भरपूर उपयोग होऊं दे, पण मानमराबत, कीर्ति किंवा धनदौलत यांच्या मोहाला बळी पडून तूं आपली विद्या विकूं नको. एवढं केलंस म्हणजे मला माझी गुरुदक्षणा मिळाली. तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे."

★

# १०

आतां मात्र आईला केव्हां भेटेन असें रामला झालें. ज्या आश्रमांत पितृतुल्य गुरूच्या छत्राखालीं आणि भातृतुल्य सहाध्यायांच्या सहवासांत त्यानें बारा वर्षें काढलीं त्या विश्वेश्वराच्या काशीनगरींत आतां त्याला घटकाभर देखील चैन पडेनासें झालें. मन घट्ट करून साश्रुनयनांनीं सगळ्यांचा निरोप घेऊन तो दुसऱ्याच दिवशीं माहुलीला जाण्यासाठीं निघाला.

इकडे त्याची आई अगदीं थकली होती. आज कित्येक दिवस ती आजारीच होती. अगदीं अलीकडे अलीकडे तर ती आंथरुणाला खिळलेली होती. जानकी मात्र तिचें अगदीं कमी पडूं देत नव्हती. एकनिष्ठेनें ती तिची सेवाशुश्रुषा करीत होती. या चार पांच दिवसांत तिचें दुखणें वाढतच चाललें. तिनें आतां रामचा ध्यास घेतला. जानकीच्या देखत आपण असें धीर सोडल्यासारखें करूं लागलों, तर ती अगदींच खचेल, म्हणून ती जवळ असतांना रामची आई आपले उमाळे मोठ्या कष्टानें दाबून टाकीत असे. पण आतां तिला तेंही त्राण राहिलें नाहीं. मग ती अगदीं क्षीण स्वरांत "धाव रे रामराया, किती अंत पहासी" असें म्हणूनं जणूं आपण रामाचा धावाच म्हणतों आहों, असें भासवी.

पण आज मात्र आपली खरी स्थिति जानकीला सांगितल्याशिवाय इलाज नाहीं असें तिला वाटलें. नित्याप्रमाणें औषधाची वेळ होतांच उगाळलेलें चाटण बोंडल्यांत घेऊन जानकी सासूजवळ आली. चाटणाचें बोट तिच्या तोंडाजवळ नेऊन ती म्हणाली,

"हं."

चाटण न चाटताच तिच्याकडे पाहात रामची आई अगदीं हळू स्वरांत म्हणाली,

"आतां कशाला कष्ट घेतेस जानकी ? मी कांहीं या दुखण्यांतून उठत नाहीं...."

जानकी मध्येंच म्हणाली, "आजारी माणसानं असं बोलूं नये."

तिनें चाटणाचें बोट पुन्हा तिच्या तोंडाजवळ नेलें. तें रामच्या आईनें चाटलें व म्हटलें,

"तेवढ्यानंच तुला बरं वाटत असलं, तर औषध घेतें बापडी, पण माझं मला समजलं आहे. या दुखण्यांतन जगण्याची मला कांहीं आशा नाहीं. माझी एकच आशा राहिली होती. राम–राम भेटला असता म्हणजे त्याच्या मांडीवर मी सुखानं मेलें असतें."

त्या बोलण्यानें जानकीचे डोळे भरून आले. पण चट्कन् मान वळवून तिनें ते पुसले व ती म्हणाली,

"आपली पुण्याई आहे. परमेश्वरकृपेनं आपण बऱ्या व्हाल. ते येतील, आपल्याला भेटतील."

तशाही स्थितींत रामची आई किंचित् हसली आणि म्हणाली,

"तुझ्या तोंडांत साखर पडो. पण माझं इतकं भाग्य नाहीं जानकी! श्रवणाच्या शापानं रामप्रभूचा पिता दशरथ अखेरीला राम-राम-राम अशा हाका मारीत, शोक करीत मेला, तसंच मला मरावं लागणार. राम-राम-अरे रामराया....."

बोलतां बोलतां तिचा स्वर मोठा झाला. तिचे डोळे किंचित् तारवटूं लागले. जानकी थोडी घाबरली पण तसें न दाखवतां ती कांहींशा गद्गद स्वरांतच म्हणाली,

"त्रास होतो आहे. स्वस्थ निजावं ...."

"नाहीं ग जानकी, कौसल्येसारखाच रामच्या नांवानं हंबरडा फोडल्याशिवाय मला स्वस्थता वाटत नाहीं ग. राम, या वेळीं तूं कुठं आहेस रे ...."

काय योगायोग! याच वेळीं राम आपल्या घरांत आला होता. त्यानें दारांतूनच हाक मारली,

"आई, आई...."

हाक मारीत मारीतच तो आंत आला होता. रामला पाहातांच तसल्याही स्थितींत जानकीला जो आनंद झाला तो काय सांगून येणार आहे? दोघांनींही एकमेकांकडे पाहिलें. रामची आणि आईचीही दृष्टादृष्ट झाली. आईनें रामला ओळखलें. ती म्हणाली,

"कोण राम, हो, माझा रामच तूं! ये, राम, जवळ ये रे, केव्हां आलास?"

राम आईजवळ गेला आणि म्हणाला,

" आत्तांच आलों. काशीहून आलों. तुझा राम, विद्वान रामशास्त्री होऊन आला. ही पाहा शास्त्रपारंगतेची मानाची शालजोडी."

शालजोडीकडे अभिमानानें पाहात त्याची आई म्हणाली,

" खरं? खरंच माझा राम, रामाशास्त्री झाला. त्यानं मानाची शालजोडी मिळवली. माझ्या डोळ्यांचं पारणं फिटलं राम."

तिच्या आंगावरून हात फिरवीत राम गहिंवरून म्हणाला, " आई, काय ग तुझी स्थिति झाली आहे ही!"

" राम, माझी अखेरची वेळ आहे ही. तुझी मांडी दे, तुझ्या हातचं पाणी दे एकदां!"

अगदीं भरून आलेल्या अंतःकरणानें उठून रामनें आईचें डोकें मांडीवर घेतलें.

" मी काशीहून तुझ्यासाठीं गंगोदक आणलं आहे, आई."

रामनें आईच्या तोंडांत गंगोदक घातलें. तें घेतल्यावर मोठ्या हुषारीनें, समाधान झाल्याच्या आनंदानें ती म्हणाली,

" पुत्रजन्म सफळ केलास, विद्वान झालास, मान्यता पावलास, गंगोदक देऊन माझं जन्ममरण चुकवलंस,..आतां माझी कांहीं आशा राहिली नाहीं. जानकी, तूंही ये अशी."

जानकी जवळ आली. तिच्या तोंडावरून मायेचा हात फिरवीत रामला उद्देशून ती म्हणाली,

" राम, जानकीसारखी सून मिळायची नाहीं हं. बिचारीनं फार कष्ट सोसलेत. तिनंच आतांपर्यंत माझा जीव जगवला, तुझी भेट करवली. सांभाळ तिला. लक्ष्मीनारायणाचा संसार करा. मी जातें आतां. त्यांना सांगतें, तुमच्या रामनं तुमची इच्छा पुरी केली. तुमचा राम, रामशास्त्री झाला."

★

# ११

काशीहून विद्यासंपन्न होऊन निघतांना आईला सुखांत ठेवण्याचें रामनें केवढें मोठें मनोराज्य केलें होतें ! पण घरीं येण्याबरोबर आईच्या झालेल्या मृत्यूनें तें एकदम ढासळलें. त्याच्या मनावर तो फार दांडगा आघात झाला. त्यांतल्या त्यांत त्याला एवढेंच समाधान वाटलें, कीं आपण शास्त्री होऊन आल्याचें आईनें पाहिलें. मानाची मिळालेली शालजोडी आईनें आपल्या हातांनीं आपल्या आंगावर घातली. अगदीं अखेरच्या घटकेला कां होईना, आपल्याबद्दल तिनें धरलेल्या सगळ्या आशा, तिच्या रामनें पुऱ्या केल्याचें सुख तिला लाभलें आणि आपल्याच मांडीवर तिनें शांत चित्तानें अखेरचा श्वास घेतला.

अशा तऱ्हेनें दुःखांतही समाधानाच्या गोष्टी आठवीत आठवीत त्या पतिपत्नींचे कांहीं दिवस गेले. जगरहाटीप्रमाणें दुःख विसरून रामला प्रापंचिक व्यवहारांत पडणें भागच होतें. लवकरच तो पुण्यास आला. तेथें त्याच्या सुदैवानें, फारसे आयास न करतां, त्याला त्याच्या विद्वत्तेच्या जोरावर पेशव्यांच्या दरबारीं शास्त्रीपदाचा मान मिळाला.

आतां मात्र त्याला सगळे रामशास्त्री म्हणूं लागले. पेशव्यांनीं त्याला शास्त्री म्हणून नेमलें होतें, एवढ्याचसाठीं लोक त्याला रामशास्त्री म्हणत असें नव्हे, तर कांहीं प्रसंगीं शास्त्रपारंगततेच्या कसोटीला ते चांगले उतरले होते, म्हणून लोक त्यांना खऱ्या भावानें रामशास्त्री म्हणत. हळूहळू वेदशास्त्रपारंगत म्हणून त्यांची कीर्ति चहूंकडे पसरूं लागली. त्यांच्या विद्वत्तेवर आणि योग्य असेल तें कोणाचीही भीडमुर्वत न ठेवतां स्पष्ट आणि निःस्पृहपणानें बोलण्याच्या त्यांच्या गुणावर, पेशवे अगदीं लुब्ध झाले होते. मनुष्याच्या आंगांतील या दुर्मिळ गुणांचें मोल जाणणाराही तसाच गुणग्राही पाहिजे असतो.

रामशास्त्र्यांच्या सुदैवानें, पेशवे तसे गुणग्राही होते यांत शंका नाहीं. रामशास्त्री, शास्त्रिपदावर असतांना राजकारणाच्या एका महत्त्वाच्या प्रसंगीं, पेशवे आपल्या नित्याच्या पूजादि ब्रह्मकर्मांत फार वेळ मग्न झाले आहेत हें पाहून रामशास्त्र्यांनीं त्यांना स्पष्ट सांगितलें,

"तुम्ही जन्मानं ब्राह्मण असलां, तरी कर्मानं आणि कर्तव्यानं क्षत्रिय झालां आहांत. मराठी राज्याचं संरक्षण करण्याचा तुमचा क्षात्रियधर्म तुम्हांला अगोदर पाळला पाहिजे."

कर्तव्याची जाणीव देणारा रामशास्त्र्यांचा हा उपदेश पेशव्यांनीं ताबडतोब मान्य केला.

रामशास्त्र्यांना लहानपणापासूनच अन्यायाची दांडगी चीड होती. श्रीमंत पेशव्यांच्या हातूनही अन्याय होऊं नये, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष-पणें त्यांच्या हातून राजकर्तव्य उपेक्षिलें जाऊं नये, म्हणून ते डोळ्यांत तेल घालून जपत.

ते पेऱ्यांच्या हंगामाचे दिवस होते. शास्त्रीबोवा कांहीं कामासाठीं चार दिवस माहुलीस आपल्या घरीं आले होते. आपलीं नित्याचीं कर्मे आटपून शास्त्रीबोवा सदरेवर आले, तों रस्त्यावरून कांहीं बायका-पुरुष एकच गलगा करीत ओरडत चाललेले त्यांना दिसले.

"ढालाइतांनीं माजी प्वारं पकाडलीं."

"माझ्या नांगराचं बैल उसापलं."

"धेन्याच्या त्वांडावर किर त्यानं फटकारा मारला."

पळतां पळतां उच्चारलेलें लोकांचें असें एकादेंच वाक्य शास्त्रीबोवांना ऐकूं येत होतें. लोकांची ती अगतिक धावपळ पाहून रामशास्त्र्यांना गप्प राहावलें नाहीं. ते दारांत आले आणि धावणाऱ्या लोकांतल्या एका वृद्ध शेतकऱ्याला त्यांनीं विचारलें.

"काय रे, काय झालं? कसली गडबड आहे ही?"

तो शेतकरी समोर शेताकडे बोट दाखवून म्हणाला,

"बगा बगा त्ये सेत्रीबुवा, ढालाइतांनीं आमचा सत्यानास चालवलाया !"

रामशास्त्र्यांनीं समोर शेताकडे पाहिलें तों तेथें पेशव्यांचे ढालाईत आणि शेतकरी यांची मारामारी चाललेली त्यांना दिसली. ती पाहून रामशास्त्रीही त्या शेतकऱ्याबरोबर धावत शेताकडे गेले. ते शेतावर आले त्याच सुमारास एका ढालाइतानें एका शेतकऱ्याच्या हातांतला नांगर हिसकून घेऊन फेकून दिला, बैलांना भाल्यानें टोचून उधळून लावलें आणि त्या शेतकऱ्याला गचांडी देऊन म्हटलें,

"चल तुला येटा धरलया."

शेतकरी रागानें मानेला हिसका देत म्हणाला,

"न्हायी येत जा."

"हं. मुस्क्या बांदून न्हेयीन तवां समजल."

रामशास्त्र्यांनीं पुढें होऊन रागाच्या कठोर स्वरांत ढालाइतांना विचारलें, "काय रे, काय दंगा चालवलाय तुम्हीं ?"

ढालाइतांनीं अधिकाराच्या बेफिकीर स्वरांत उत्तर दिलें,

"दंगा बिंगा काय नाय. शिरिमंतांनीं पन्नास येटं मागितल्याती त्ये धरतुया. येटं आत्ताच्या आतां पायजेत असा हुकूम हाय."

"अरे पण शाहाण्यांनो, पेरणीच्या अशा ऐन हंगामाला हे निवडक जवान तुम्हीं वेठे म्हणून धरलेत, तर वर्षभर त्यांनीं काय करावं, काय खावं, त्यांच्या बायकापोरांनीं काय टाचा घासून मरावं ?"

या सरळ प्रश्नानें रामशास्त्र्यांच्या भोळेपणाची त्या ढालाइतांना कींव आली. याच्यासारख्या व्यवहारशून्याशीं बोलण्यांतच अर्थ नाही अशा भावानें ढालाइतांचा जमादार किंचित् हसून म्हणाला,

"त्येनीं काय करावं, काय खावं, कसं मरावं, त्येचा इचार शिरिमंतांनीं करावा. हाकला र हाकला येटं."

ढालाइत वेठ्यांना म्हणाले,

"उठा र उठा समद जन...."

दुसरे दोन ढालाईत बसलेल्या वेठ्यांना काठीनें ढिवचीत म्हणाले,

"उठा र उठा...."

ढालाइतांच्या त्या वर्तनानें रामशास्त्र्यांना अतिशय संताप आला. ते आवेशानें पुढें होऊन सगळ्यांना उद्देशून म्हणाले,

"उठूं नका." ढालाइतांनाही त्यांनीं त्याच सुरांत सांगितलें, "जा. श्रीमंतांना सांगा, वेठे येत नाहींत."

रामशास्त्र्यांचा इतका जोराचा पाठिंबा मिळतांच उठलेले वेठे शेतकरी खालीं बसले व त्यांनीं एकच गिल्ला केला.

"न्हायी येत, न्हायी येत, न्हायी येत."

हा सगळा प्रकार पाहून त्या म्हाताऱ्या शेतकऱ्यालाही चेव आला. तो ढालाइतांच्या पुढें येऊन आवेशानें म्हणाला,

"हां हां, सांगा शिरिमंतांस्नी, या वक्ताला येटं येत न्हायिती."

"कस येत न्हाइत, त्ये बघतुच कीं आतां."

असें म्हणून ढालाइताच्या जमादारानें वेठ्यांवर काठी उगारली. त्याबरोबर रामशास्त्री पुढें होऊन त्याचा हात धरीत म्हणाले,

"हां! खबरदार त्यांच्या आंगाला हात लावाल तर."

"हें बगा सेस्त्रीबावा," जमादार गुर्मीनेंच म्हणाला, "तुमी जर आमच्या सरकारी कामांत अस आड येऊं लागला, तर तुमाला दिकून शिरिमंतांम्होरं न्यात्रं लागल."

"फार चांगलं होईल. त्यांच्या हातून होत असलेला अन्याय मला त्यांना प्रत्यक्ष दाखवतां येईल."

"सेस्त्रीबावा, तो कायदा लयी वंगाळ हाय हं!" जमादारानें शास्त्रीबोवांना बजावून सांगितलें, "शिरिमंतांस्नी येट दिल न्हायीत म्हंजे त्ये लई म्होटी शिक्षा करत्यात."

"मोठी शिक्षा म्हणजे काय करतील? कैदखान्यांत टाकतील, उपाशी ठेवतील, डोकं मारतील, एवढंच कीं नाहीं? (सगळ्या

शेतकऱ्यांकडे बोट दाखवीत ) या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीं मी आनंदानं मरणसुद्धा पत्करीन. चला पकडा मला. न्या श्रीमंतांपुढें."

असें म्हणत रामशास्त्री पुढें झाले. आपले दोन्ही हात त्यांच्यापुढें करीत ते म्हणाले,

"बांधा, बांधा. करा गिरफदार श्रीमंतांपुढें न्यायला !"

★

# १२

आणि खरोखरच ढालइतांनीं, त्या वेठ्यांबरोबर रामशास्त्र्यांनाही जेरबंद करून पुण्यास आणलें. आपल्या कामाला अडथळा केला म्हणून ढालाईत रामशास्त्र्यांवर चिडलेले होते. त्यांनीं घडलेला प्रकार तिखट मीठ लावूनच कारभारी सखारामबापूंना सांगितला. निकडीच्या कामासाठीं वेठे बोलावले होते, त्याला रामशास्त्री आडवे आले, योजलेल्या कामांचा ह्या शास्त्र्यामुळें नाश झाला आणि त्याहीपेक्षां आपल्या हुकमाची अंमलबजावणी झाली नाहीं, इतकेंच नव्हे, तर रामशास्त्र्यांसारख्या सामान्य मनुष्यानें आपला हुकूम मोडण्यास शेतकऱ्यांसारख्या लोकांना चिथावलें, याचा बापूंना फार राग आला. ते संतापानें बेचैन होऊन स्वतःच श्रीमंतांकडे तक्रार घेऊन गेले. त्या वेळीं श्रीमंत आपल्या खाजगी दिवाणखान्यांत बसले होते. बापू आले ते संतापाच्या चिडक्या सुरांतच म्हणाले, "आपल्या हुकमाप्रमाणें वेठे धरायला आम्हीं ढालाइतांना पाठवलं, वेठे मिळत होते, पण आपल्या रामशास्त्र्यांनींच त्यांना अडथळा केला."

"रामशास्त्र्यांनीं अडथळा केला ?" श्रीमंतांनीं कांहींशा आश्चर्यानें पण अगदीं शांत वृत्तीनें विचारलें.

"हो हो. रामशास्त्र्यांनीं! वेठे धरले ते कांहीं आमच्या घरच्या कामासाठीं धरले नाहींत, कीं श्रीमंतांच्या खासगी कामासाठीं धरले नाहींत. मराठी राज्याच्या संरक्षणासाठीं अगदीं निकडीचीं कामं करणं जरूर आहे, म्हणूनच धरले आहेत. त्याला रामशास्त्र्यांनीं अडथळा केला, हा खास श्रीमंतांचा नि मराठी राज्याचा गुन्हा केला आहे."

"पण इतकं संतापून सांगायचं काय कारण बापू?" श्रीमंत गंभीर मुद्रेनें अगदीं शांत स्वरांत म्हणाले, "तुम्हीं फक्त ढालाइतांचं म्हणणं ऐकलं आहे. न्यायाच्या दृष्टीनं शास्त्रीबुवांचंही म्हणणं आपल्याला ऐकलं पाहिजे."

"त्यांचं म्हणणं श्रीमंतांनीं खुशाल ऐकावं. पण असल्या गुन्ह्याची गय होतां उपयोगी नाहीं. कारण कायदा तोडायला एकदा उत्तेजन मिळालं, म्हणजे जो उठेल तो कायदा मोडील. कायदेभंगानं देशांत बंड माजेल आणि मग राज्य चालवणंदेखील अशक्य होईल. म्हणून अशा गोष्टी मुळांतच खुडल्या पाहिजेत. एवढ्यासाठीं सगळ्यांना दहशत बसेल अशीच या राजकीय गुन्ह्याला शिक्षा झाली पाहिजे." बापूंचें तें पुराण ऐकून श्रीमंतांनाही त्यांचा थोडा राग आला. ते किंचित् करड्या सुरांत म्हणाले, "पण शास्त्रीबुवांसारखा शांत वृत्तीचा माणूस हा राजकीय गुन्हा करण्याच्या थराला कां गेला, हें तुम्हीदेखील अगोदर पाहिलं पाहिजे होतं बापू! हशम, जा. शास्त्रीबुवांना घेऊन ये."

श्रीमंतांनीं आपल्याला थोडा ठपका दिला, हें सखारामबापूंना आवडलें नाहीं. पण उत्तर देण्यासारखें नसल्यामुळें त्यांची चर्या बेचैन झाली. 'असल्या गुन्ह्यांत त्यांचं काय ऐकायचं' असें ते तोंडांतल्या तोंडांतच पुटपुटले. तोंच रामशास्त्री आले. त्यांच्या पाठोपाठ कांहीं वेठे शेतकरीही आले होते. श्रीमंतांना आणि बापूंना नमस्कार करून रामशास्त्री उभे राहिले. सखारामबापूंनीं त्यांचा नमस्कार घेतला

नाहीं. ते त्यांच्याकडे रागानेंच पाहात होते. श्रीमंतांनीं रामशास्त्र्यांकडे एकदा पाहिलें व म्हटलें,

"आमच्या पदरीं असलेल्या तुमच्यासारख्या शास्त्रीबुवांनीं अशा तऱ्हेनं आमच्यापुढें येणं, आम्हांला कांहीं बरं वाटलं नाहीं."

"श्रीमंतांच्या बोलण्याचा भावार्थ स्पष्टपणें माझ्या ध्यानांत आला नाहीं."

"वेठे धरायला आमच्या ढालाइतांना तुम्हीं हरकत केली म्हणे?"

"होय."

शास्त्रीबोवांनीं गुन्हा कबूल करण्याबरोबर सखारामबापू अगदीं बेभानपणें म्हणाले,

"सरकारी कामांत व्यत्यय आणणं हा गुन्हा आहे शास्त्रीबुवा."

सखारामबापू मध्येंच बोलले हें पाहून रामशास्त्र्यांना त्यांचा राग आला. त्यांच्याकडे तशाच मुद्रेनें पाहात ते किंचित ठासून म्हणाले,

"होय."

रामशास्त्र्यांच्या त्या उत्तरानें सखारामबापूही थोडे चिडले, पण तसें न दाखवतां त्यांनींही तसेंच ठासून उत्तर दिलें,

"आणि असल्या गुन्ह्याला शिक्षा फार मोठी असते शास्त्रीबुवा!"

श्रीमंतांकडे विशेष अर्थानें पाहात रामशास्त्री प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाले,

"पण न्यायानं तो गुन्हा ठरला तर! तसं झालं, तर शिक्षा भोगायला मी तयार आहें."

"न्यायानं म्हणजे?" श्रीमंतांनीं रामशास्त्र्यांच्या बघण्याचा अर्थ ओळखला हें त्यांच्या विचारण्यांत स्पष्ट दिसलें.

रामशास्त्री गंभीर स्वरानें म्हणाले, "म्हणजे वेठ धरणं हेंच मुळीं न्यायावर अधिष्ठित नाहीं."

सखारामबापू मध्येंच कावले, "तुम्हां शास्त्रीपंडितांचीं न्यायतत्त्वं नको आहेत इथें! आम्हांला राजकारणांतला व्यवहार बघायचा आहे."

"बापू, शास्त्रीबुवांचं म्हणणं आम्हांला ऐकून घ्यायचंय्!" श्रीमंतांनीं निश्चयी मुद्रेनें बापूंना बजावलें. रामशास्त्री पुढें बोलूं लागले,

"प्रजेशीं संबंध येणारा राजकारणाचा सगळा व्यवहार न्यायतत्त्वांवरच आधारलेला असला पाहिजे. म्हणून मी म्हणतों, वेठ धरणं हें न्यायावर अधिष्ठित नाहीं आणि वाटेल त्या वेळीं वेठ धरणं हा तर निव्वळ जुलूम आहे."

"सरकारी कामाच्या विशेष निकडीच्या वेळींच आम्ही लोक वेठीला धरतों आणि त्यांना योग्य तो मोबदलाही देतों. म्हणजे कांहीं आम्ही त्यांच्यावर जुलूम करीत नाहीं."

रामशास्त्र्यांनीं श्रीमंतांना ठासून उत्तर दिलें, "नुसता जुलूमच नव्हे, तर या वेळीं वेठे धरून, आपणच राजा आणि प्रजा यांच्यांत बेदिली निर्माण करतां."

"लाखो प्रजेच्या हितासाठीं पांच पन्नास लोकांची बेदिली राजनीतीला मंजूर आहे." सखारामबापू आढ्यतेनें म्हणाले.

"लाखो प्रजेच्या हितासाठीं पांचपन्नास काय पण शेपांचशे लोकांची बेदिलीसुद्धा राजनीतीला मंजूर आहे." रामशास्त्र्यांनीही त्याच आढ्यतेंत उत्तर दिलें.

"होय ना?" म्हणत सखारामबापू विजयी मुद्रेनें हसले.

"होय. पण शेतकामाच्या वेळीं शेतकऱ्यांना वेठीला धरणं म्हणजे लाखो प्रजेचं अनहित करण्यासारखं आहे. श्रीमंतांनीं स्वतः एक प्रकारें आत्मघात करण्यासारखं आहे." रामशास्त्र्यांनीं शेवटलें वाक्य श्रीमंतांना उद्देशून म्हटलें.

"तो कसा काय?" श्रीमंतांनीं आश्चर्यानें विचारलें.

"वेठीच्या मजुरीवर कांहीं शेतकऱ्याला वर्षभर पोट भरतां येत नाहीं. शेतीच्या दिवसांत शेतकऱ्यांना वेठीला धरलं, तर त्यांनीं जमिनीची मशागत कधीं करावी? ती कशी पिकवावी? ती पिकली नाहीं तर त्यांनीं सरकारचा सारा कसा भरावा! शेतें पिकलीं नाहींत

तर सरकारचा सारा मिळणार नाहीं. याच पिकावर अवलंबून असलेल्या श्रीमंतांच्या इतर प्रजेला अन्न मिळणार नाहीं. म्हणजे पर्यायानं प्रजेला उपाशीं मारल्याचं पातक श्रीमंतांना लागेल."

सखारामबापू कुत्सितपणें हसत मध्येंच म्हणाले, "म्हणजे पयार्यानं राज्यांतल्या कोणत्याही मनुष्याला कामाला बोलावण्याचा श्रीमंतांना हक्क नाहीं, असं स्पष्टच म्हणा कीं शास्त्रीबुवा."

"हक्क आहे." रामशास्त्री शब्दांवर जोर देत निश्चयानें म्हणाले, "मराठी राज्यांतल्या प्रत्येक मनुष्याला हाक मारण्याचा श्रीमंतांना हक्क आहे. पण तो हक्क गाजविण्याची वेळ आहे. मराठी राज्यावर संकट ओढवलं आणि त्या वेळीं हिंदशाहीच्या धन्यानं हाक मारली, तर मराठी राज्यासाठीं नि हिंदभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं देशांतला माणूस न् माणूस धापा टाकीत, श्रीमंतांच्या पायांजवळ धावत येईल." शास्त्रीबोवांचें म्हणणें वेठ्यांना पूर्णपणें पटलें. त्यांनीं अगदीं सहज उमाळ्यानें शास्त्रीबोवांच्या म्हणण्याला दुजोरा दिला,

"व्हय–व्हय–अक्षी खरं !"

"अक्षी म्हंजे अक्षी खरं ! आमच्या कालजांतल सबुद बोल्लासा सास्त्रीबावा !"

"अशा वक्ताला पुड्यांतली भाकरी टाकून हामी धावत येऊं."

"हामीच काय पन हामचीं येवडीं येवडीं प्वारं दिकून यकाद्या वासरावानी टाण् टाण् उड्या मारीत येत्याल."

"अव सेखीबावा, म्हराटी राज्यापायीं हामी पुरुसच काय, पन वकुत आला, तर आमच्या बायका, पिनाऱ्या प्वारांस्नी बी मांडीवरन ढकलून गोपनीनं धोंड भिर्र भिर्र भिरकावीत यत्याल."

शेतकऱ्यांचा तो आवेश आणि उत्साह पाहून रामशास्त्री अभिमानानें श्रीमंतांना सांगूं लागले, "आणि श्रीमंत, या लोकांच्या नुसत्या आवेशाच्या गप्पा नव्हेत या ! छत्रपति शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून आपल्या परवांच्या लढाईपर्यंतचा इतिहास पाहा ! त्यांनीं

आपला प्रत्येक शब्द कृतीनं खरा करून दाखविला आहे. मग मराठी राज्यासाठीं आपल्या प्राणांचीच काय, पण बायकापोरांचीही पर्वा न करणाऱ्या या राजनिष्ठ शूर लोकांना भलत्या वेळीं वेठीला धरणं श्रीमंतांना इष्ट वाटतं ? मुत्सद्देगिरीचं वाटतं ?" श्रीमंत रामशास्त्र्यांचें बोलणें अगदीं शांत व गंभीर मुद्रेनें ऐकत होते. त्यांचें म्हणणें त्यांना पटत होतें. अखेरीस ते शास्त्रीबोवांना म्हणाले,

"शास्त्रीबुवा, तुमचं म्हणणं अगदीं बरोबर आहे. राजाचं प्रजेविषयींचं कर्तव्य आणि आजपर्यंत माझ्या हातून होत असलेल्या अन्यायाची जाणीव तुम्हीं मला स्पष्टपणानं दिलीत, याबद्दल मला फार आनंद वाटला. या सगळ्या वेठ्यांना मी दोषमुक्त करून सोडून दिलं आहे आणि पुन्हा कोणत्याही राज्यकर्त्या पेशव्यांच्या हातून हा अन्याय घडूं नये, म्हणून आजपासून आमच्या राज्यांतून ही वेठ बिगार मी परिच्छिन्न मना केली आहे."

★

# १३

श्रीमंत माधवरावांच्या त्या निर्णयानें राज्यांतल्या निरनिराळ्या लोकांत आनंदाच्या निरनिराळ्या ऊर्मि उसळल्या. शेतकऱ्यांना तर रामशास्त्री देवासारखे वाटूं लागले. आपल्या नि आपल्या जनावरांच्या गळ्यांतलें जीव घेणारें दावें तोडून मोकळें केल्याचा त्यांना आनंद झाला. गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांसाठीं आपण टाकलेला शब्द श्रीमंत माधवरावांनीं मानला आणि अशा तऱ्हेनें राजा व रयत या दोघांच्याही कल्याणाला, आपण कारणीभूत झालों म्हणून रामशास्त्र्यांना सात्त्विक आनंद झाला. राज्यांतला एक जुलमी कायदा रद्द करून आपल्या तमाम शेतकरी रयतेला प्रसन्न केल्यामुळें श्रीमंत माधवरावांना

जो आनंद झाला, त्याला सीमाच नव्हती. रामशास्त्र्यांबद्दल त्यांना पूर्वीपासूनच विशेष आदर होता, या प्रसंगानें तो शतपट वाढला. प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकलीं गेलीं व लोकांना योग्य न्याय मिळाला, म्हणजे प्रजा खरोखरीच राजनिष्ठ आणि संतुष्ट असते. रामशास्त्र्यांसारखा शास्त्रसंपन्न, व्यवहारचतुर आणि न्याय्य गोष्टींत कोणाचीही भीडमुर्वत न ठेवणारा पुरुष आपल्या राज्यांत न्यायाधिकारी असला, तर मराठी राज्य रामराज्यासारखें आदर्श आणि सुखी होईल, असें श्रीमंत माधवरावांना वाटलें. त्यांनीं लागलीच रामशास्त्र्यांना आपल्या राज्यांत मुख्य न्यायाधीश नेमून न्यायाधिकाराचीं वस्त्रेंही पाठविलीं.

या वेळीं रामशास्त्री आपल्या माहुली गांवीं होते. पेशव्यांनीं रामशास्त्र्यांना मुख्य न्यायाधीश नेमल्याची बातमी हां हां म्हणतां गांवांत पसरली. गांवकऱ्यांना मोठा आनंद झाला. आपला आनंद, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं गांवकऱ्यांनीं, विशेषत: शेतकऱ्यांनीं, रामशास्त्र्यांना निरोप देण्याचा समारंभ घडवून आणला. या समारंभाला आसपासच्या दोन चार गांवचे शेतकरी आले होते. सगळ्यांनीं आपापल्या ऐपतीप्रमाणें रामशास्त्र्यांना लहानमोठे अहेर आणले होते. म्हणतां म्हणतां रामशास्त्र्यांच्यापुढें अहेराचा नुसता ढीग पडला. माहुलीच्या पाटील-कुलकर्ण्यांचा शेवटचा अहेर झाल्या-वर रामशास्त्री भरून आलेल्या अंत:करणानें सर्वांना उद्देशून म्हणाले,

"तुम्हां सर्वांच्या आशीर्वादानं मला हें महत्तम पद मिळालं आहे. तरी मी माहुली गांवचा आपल्यांतलाच एक सामान्य ग्रामस्थ आहें, हें मी कधीं विसरणार नाहीं. श्रीमंत पेशव्यांनीं मला मुख्य न्यायाधीश नेमून माझा एकट्याचाच नव्हे, तर सगळ्या माहुली गांवाचा सन्मान केला आहे. त्यानिमित्त तुम्हीं प्रेमानें अर्पण केलेल्या या अहेराच्या संपत्तीवर माहुली गांवाचीच खरी सत्ता आहे. म्हणून माझी सर्वांना अशी प्रार्थना आहे, कीं हें द्रव्य आपण पंचायतींत ठेवावें, त्या

द्रव्यांतून यंदापासून श्रीकृष्णाबाईचा उत्सव चालू करावा 'आणि वस्त्रें पात्रें गोरगरिबांना वाटून टाकावींत. ”

रामशास्त्र्यांच्या या भाषणानें सर्वांचीं अंतःकरणें भरून आलीं. त्यांच्याविषयींचा त्यांचा आदर अधिकच वाढला. जमलेल्या ब्राह्मण वर्गानें “धन्य धन्य शास्त्रीबुवा” असे उद्गार काढले, तर शेतकरी वर्गानें नुसत्या साश्रुनयनांनीं त्यांच्याकडे पाहिलें. तोंच सातारचे वृद्ध अनगळ सावकार गर्दीतून झप् झप् पावलें टाकीत आवेशानें रामशास्त्र्यांच्यापुढें येऊन उभे राहिले. रामशास्त्र्यांनीं त्यांना ओळखतांच ते आदरानें उठून उभे राहिले व त्यांनीं हात जोडले. रामशास्त्री उठल्याबरोबर सगळेच लोक उठून उभे राहिले. अनगळ सावकारांनीं रामशास्त्र्यांच्या तोंडाकडे ओझरतें पाहिलें. मग ते त्यांच्याकडे निरखून पाहूं लागले. अनगळ सावकारांच्या डोळ्यांपुढें रामची पूर्वीची चर्या उभी राहिली. तो आपल्या पायांवर पाणी घालतो आहे, त्याची धार चुकली, आपण रागावलों, त्यानें आपल्या कानांतील भिकबाळीचा उल्लेख केला, आपण त्याची चेष्टा केली, त्याला थप्पड दिली, या सगळ्या गोष्टी जणूं आतांच घडताहेत अशा त्यांना दिसूं लागल्या आणि त्या प्रसंगीं रामच्या ज्या गालावर थप्पड दिली होती तोच गाल सावकारांनीं या वेळीं हातानें बाजूला वळवून, त्याचें तोंड निरखून पाहिलें. त्यांनीं त्याला ओळखलें. ते आनंदानें म्हणाले,

“ तोच ! तोच ! ”

असें म्हणत म्हणतच सावकारांनीं रामशात्र्यांना कडकडून मिठी मारली. सगळे लोक आश्चर्यानें त्या दोघांकडे पाहात राहिले. सावकारच अभिमानाच्या स्वरांत रामशास्त्र्यांना उद्देशून म्हणाले,

“ भीष्माचार्यांच्या निश्चयानं तूं आपली प्रतिज्ञा पुरी केलीस. विद्वान् झालास, शास्त्री झालास, न्यायाधीश झालास, आमच्या गांवचं भूषण झालास, लाजवलंस मला, पण मला आनंद झाला हं राम ! माझा तुला आशीर्वाद आहे. ”

रामशास्त्री सावकारांना नमस्कार करीत लोकांना उद्देशून म्हणाले,

" ग्रामस्थ मंडळी हो, हे साताराचे नानासाहेब अनगळ सावकार, मला गुरूच्या ठिकाणीं आहेत. "

" तसं नाहीं हो, " पश्चात्तापाच्या सुरानें अनगळ सावकार मध्येंच म्हणाले, " उलट एका प्रसंगीं मीं त्याचा अपमान केला होता.... रागाच्या भरांत मीं त्याच्या तोंडांत मारली होती...."

"....आणि म्हणूनच आज मी या पदाला पोचलों आहें. नाहींतर जन्मभर राम्याचा राम्याच राहिलों असतों. "

रामशास्त्र्यांच्याच तोंडून ' राम्या ' येण्याबरोबर अनगळ सावकारांना पूर्वीची आठवण झाली व ते म्हणाले, " त्याच नांवानं एकदा तरी तुला हाक मारूं दे रे मला ! " आणि त्यांनीं खरोखरीच हाक मारण्याच्या सुरांत म्हटलें,

" राम्या, राम्या, धन्य धन्य मी. माझा राम्या शागीर्द विद्वान् झाला, रामशास्त्री झाला, श्रीमंत पेशवेसरकारचा मुख्य न्यायाधीश झाला. माझ्या रामचा गौरव तरी कसा करूं मी ! "

" नानासाहेब, आपला आशीर्वाद हाच माझा गौरव आहे. "

" तुझी ही थोर शालीनता तुझ्या विद्वत्तेला भूषण आहे रे, पण ज्या भिकबाळीनं तुझा मीं अपमान केला, ज्या भिकबाळीनं मीं तुझी हेटाळणी केली, तीच ही भिकबाळी मी मोठ्या अभिमानानं तुझ्या कानांत घालतों." असें म्हणत म्हणत नानासाहेब सावकारांनीं आपल्या कानांतील भिकबाळी काढून आपल्या हातांनीं रामशास्त्र्यांच्या कानांत घातली आणि तिच्याकडे पाहात ते कौतुकानें म्हणाले, " खरंच ! छान शोभते तुला ! आतां कानांतन कधीं काढूं नको हं हीं ! राम्याच्या निश्चयी चिकाटीचं आणि अनगळ सावकाराच्या पश्चात्तापाचं हें प्रतीक तुझ्या कानांत अखंड तळपत राहिलं पाहिजे."

★



" विद्वत्तेच्या जोरावर पेशव्याच्या दरबारीं शास्त्रीपदाचा मान मिळाला."

" आ रो पी हजर झाला नाहीं तर त्याला जेरबंद करून आणा."



" फिर्यादीचं स्वरूप फौजदारी आहे."

दप्तरदारांनीं नम्रपणें उत्तर दिलें.

" कोण आहेत फिर्यादी ? हजर आहेत ते ?"

" होय. फिरंग्यांचे वकील फिर्यादी असून ते हजर आहेत."

" अस्सं; आणि आरोपी कोण आहेत ?"

" वसईचे सरसुभे विसाजीपंत लेले आरोपी आहेत," दप्तरदार म्हणाले.

" आरोपी हजर आहेत ?" रामशास्त्र्यांनीं विचारलें,

" ते सखारामबापू कारभाऱ्यांच्या कचेरींत बसले आहेत. त्यांना बोलावणं पाठवलं आहे, पण अजून ते आले नाहींत."

दप्तरदारांच्या या उत्तरावर कांहीं श्रोत्यांनीं एकमेकांकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहिलें. गणेशभट तर शेजारच्या गृहस्थाला म्हणालेदेखील, " पाहिलंत, न्यायाधीशाच्या परीक्षेची ही खरी वेळ आहे. फिर्यादी नि आरोपी दोन्ही बडीं धेंडं आहेत."

" फिरंग्याला कोण विचारतो म्हणा, पण विसाजीपंत लेले म्हणजे सखारामबापूंच्या गळ्यांतला अगदीं ताईत !"

" आणि श्रीमंतांजवळ दांडगं वजन असलेला."

तिसऱ्या एका गृहस्थांनीं दुजोरा दिला.

" म्हणूनच म्हणतों, निःस्पृह म्हणवणाऱ्या या न्यायाधीशाची आज खरी परीक्षा आहे." गणेशभट म्हणाले.

एवढ्यांत रामशास्त्र्यांचे कागद पाहून झाले. ते फिर्यादीला उद्देशून म्हणाले, " काय फिर्याद आहे तुमची ?"

दुभाष्यानें त्यांची फिर्याद रामशास्त्र्यांना समजावून दिली.

" आमचीं कांहीं जहाजें सुवर्णदुर्गावरून वसईस जात असतांना विसाजीपंत सरसुभ्यांनीं वहिवाटीप्रमाणें जकात न घेतां त्या जहाजां-वरचा वीस लाखांचा सगळाच्या सगळा माल लुटला, अशी आमची

फिर्याद आहे आणि आमचा तो सगळा माल परत तरी मिळावा नाहींतर त्याची किंमत वीस लक्ष रुपये आम्हांला भरपाई व्हावी, अशी आमची मागणी आहे."

"हां, तुम्ही मागाल पुष्कळ! पण विसाजीपंत असलं मोठं घबाड सोडतोय होय?" गोविंदभटजी नारायणभटजींना उद्देशून डोळे मिचकावीत म्हणाले. त्यावर नारायणभट म्हणाले,

"पण न्यायाधीशांचा हुकूम झाल्यावर काय करतोय?"

"अहो असले छप्पन्न न्यायाधीश बघितले असतील त्यानं. डोकीवर कारभाऱ्यांचं छत्र असल्यावर न्यायाधीशाचा हुकूम तरी कशाला होतोय?"

नारायणभटजींचा अंदाज अगदींच खोटा नव्हता. विसाजीपंतांनीं सखारामबापूंना सगळी हकिगत सांगितली होती आणि सखारामबापूंनीं त्यांना अभयही दिलें होतें. रामशास्त्र्यांच्या पुढें खटला रीतसर सुरू झाला तरी सखारामबापूंनीं विसाजीपंतांना निक्षून सांगितलें,

"तुम्ही जाऊं नका, मी सांगतों, विसाजीपंत, तुम्ही मुळींच जाऊं नका त्या न्यायकचेरींत."

"पण खटला चालू झाला आहे. ढालाईत येऊन उभा राहिला आहे. जातों मी! नाहींतर रामशास्त्री आहे तो बापू."

"मूर्ख आहे तो!" सखारामबापू एकदम उसळून म्हणाले, "तुमच्यासारख्या सुभेदाराचा, त्यांतून असल्या खटल्याचा न्याय करायचा त्या सामान्य न्यायाधीशाला अधिकारच नाहीं मुळीं. थांबा हां, मीच त्यांना इकडे बोलावतों."

लागलीच त्यांनीं हुजऱ्याला हुकूम दिला, "जा रे, रामशास्त्र्यांना म्हणावं, मी सखारामबापू कारभाऱ्यांनीं तुम्हांला आत्तांच्या आत्तां कचेरींत बोलावलं आहे."

हुकमाप्रमाणें हुजऱ्या रामशास्त्र्यांच्या न्यायकचेरींत आला आणि म्हणाला,

"कारभारी सखारामबापूंनीं आपल्याला कचेरींत बोलावलं आहे."

कागद वाचीत असल्यामुळें खालीं असलेली मान वर करून कांहींशा जरबेच्या सुरांत रामशास्त्र्यांनीं त्याला उलट निरोप दिला,

"त्यांना सांग, न्यायासनापुढें काम चाललं आहे. या वेळीं ते येत नाहींत."

कांहींशा त्याच सुरांत दप्तरदारांना उद्देशून रामशास्त्री पुढें म्हणाले,

"दप्तरदार, आरोपीला आणखी एकदां बोलावणं पाठवा." विसाजी-पंतांना बोलावण्यासाठीं हशम गेल्यावर रामशास्त्र्यांनीं दुभाष्यांना विचारलें, "तुमच्या म्हणण्याला कांहीं साक्षी पुरावा आहे?"

"आहे." दुभाष्यानें उत्तर दिलें, "विजयदुर्गला आम्ही धुळपाकडे जकात भरली. त्या वेळीं त्यांनीं दिलेल्या जकात पावतींत जहाजावरील मालाची अंदाजी किंमत वीस लक्ष रुपये धरली आहे. ही ती पावती!"

दुभाष्यानें दिलेली पावती नीट तपासून पाहात रामशास्त्री जणूं काय स्वतःशींच पुटपुटले,

"पावती अस्सल आहे यांत शंका नाहीं. काय हो दप्तरदार, आरोपी अजून येत नाहींत?"

रामशास्त्र्यांनीं असें म्हणायला आणि त्यांच्या उत्तरानें अपमानित झालेले सखारामबापू स्वतःच कचेरींत यायला एक गांठ पडली. अपमानानें चिडलेल्याच स्वरांत बापू ठासून म्हणाले, "नाहीं, येत नाहींत. हा खटला राजकीय स्वरूपाचा आहे. तो या न्यायासनाच्या अधिकारांत येत नाहीं."

रामशास्त्र्यांनींही तशाच सुरांत बापूंना उत्तर दिलें, "खटला फौजदारी स्वरूपाचा आहे. फिर्याद दाखल झाली आहे. दप्तरदार, आरोपीच्या नांवाचा तीनवार पुकारा करा आणि हजर झाला नाहीं, तर त्याला जेरबंद करून आणा."

रामशास्त्र्यांच्या त्या उर्मट भासणाऱ्या उत्तरानें बापू अधिकच चिडले. ते कांहींसे ओरडून म्हणाले, "शास्त्रीबुवा, वसईचे सुभेदार विसाजीपंत, खुद्द राज्यकर्त्यांचे जिवलग, त्यांना जेरबंदीचा हुकूम देतां? कसली एवढी धुंदी चढली आहे तुम्हांला?"

बापूंना अधिक बोलूं न देतां रामशास्त्र्यांनीं हशमाला इशारा दिला, "हशम!"

हशमानें तो इशारा ओळखला. त्यानें अधिकारी स्वरांत पुकारलें,

"खामोश, निगाह रक्खो. आरोपी विसाजीपंत हजर आहेत?"

आतां विसाजीपंतांना हजर होण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. हशमाचा तिसरा पुकारा पुरा होतो न होतो तोंच विसाजीपंत कोर्टांत हजर झाले; पण एखाद्या अधिकाऱ्यासारखे सरळ बापूंजवळ जाऊन बसले. रामशास्त्र्यांनीं लागलीच त्यांना चमकावलें,

"विसाजीपंत, तुम्ही आरोपी आहांत, तुम्हांला बसतां येणार नाहीं."

रामशास्त्र्यांच्या या आज्ञेनें विसाजीपंत मनांतल्या मनांत चडफडले, पण आज्ञा अमान्य करण्याचें त्यांना धैर्य झालें नाहीं. ते आरोपीप्रमाणें हात जोडून उभे राहिले. रामशास्त्र्यांनीं त्यांना जाब विचारला,

"गलबतावरचा वीस लक्षांचा माल तुम्हीं लुटलात, असा तुमच्यावर आरोप आहे. आहे तुम्हांला कबूल?"

सखारामबापू मध्येंच संतापानें म्हणाले,

"लुटला? पेशव्यांच्या सुभेदाराला तुम्ही काय चोर, दरोडेखोर समजतां?"

बापूंच्या या लुडबुडीनें रामशास्त्री चिडले. ते किंचित दरडावणीच्या सुरांत म्हणाले,

"बापू, न्यायाच्या कामांत ढवळाढवळ करण्याचा आपल्याला मुळींच अधिकार नाहीं. मग काय विसाजीपंत, आरोप तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं?"

"नाहीं. सुभेदार या नात्यानं मी तो माल केवळ जप्त केला होता."

"अस्सं, मग तो माल तुम्हीं सरकारांत जमा केलेलाच असेल. बापू पेशवाईचे मुख्य कारभारी आहेत, त्यांच्या सहीची वीस लाखांची पावती आणा म्हणजे झालं."

रामशास्त्र्यांनीं हा चांगलाच पेच घातला होता. विसाजीपंत चांगलेच घोटाळ्यांत पडले. त्यांनीं कांहींसें भांबावूनच बापूंकडे पाहिलें. बापूंनाही एकदम कांहीं सुचलें नाहीं. एवढ्यांत रामशास्त्र्यांनीं विसाजीपंतांना पुन्हा विचारलें,

"काय ? आहे पावती ?

प्रसंगावधान राखूनच विसाजीपंतांनीं उत्तर दिलें,

"याचं उत्तर मी देत नाहीं."

"ठीक आहे. गलबतावरचा माल वीस लक्षांचा होता, याबद्दल ही जकातीची पावती. ही तरी तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं ?" असें म्हणत रामशास्त्र्यांनीं ती पावती विसाजीपंतांना दाखवली. त्याबरोबर त्यांचा चेहेरा पांढरा फटफटीत झाला. आत्तांचें मरण टाळण्यासाठीं ते एवढेंच म्हणाले,

"मला इथें कांहींच सांगायचं नाहीं."

"ठीक आहे. पंच मंडळी, ही पावती बघा, अस्सल आहे. ती पाहून तुम्हीच निर्णय द्या. आरोपी दोषी आहे, कीं निर्दोषी आहे ?"

विसाजीपंतांवर आतां मात्र शेकल्याशिवाय राहात नाहीं, अशी बापूंची खात्री झाली. तरी पण विसाजीपंतांना वांचवण्याचा त्यांनीं प्रयत्न केलाच. ते म्हणाले, "शास्त्रीबुवा, नीट विचार करा. विसाजीपंतांचा दर्जा तुम्हांला माहीत आहे. पेशव्यांशीं असलेला त्यांचा संबंध जगजाहीर आहे. म्हणजे हा खटला तुम्ही पंतांच्या विरुद्ध नव्हे, तर खुद्द पेशव्यांच्या विरुद्ध चालवीत आहांत ...."

त्यांना अधिक बोलूं न देतां रामशास्त्री मध्येंच चढ सुरांत बापूंना म्हणाले, "बापू, विसाजीपंत सुभेदार असले तरी ते या न्यायमंदिराच्या

बाहेर. इथें या न्यायासनासमोर ते आरोपी म्हणून उभे आहेत. त्यांचा दर्जा, तुमचा अधिकार, किंबहुना खुद्द राज्यकर्त्यांची सत्ता, यांपैकीं कुणाचीही पर्वा न्यायदेवतेला नाहीं, तिच्या प्रतिनिधि असलेल्या या न्यायासनाला नाहीं किंवा पंचांना नाहीं."

सखारामबापू उपहासानें किंचित् हसून म्हणाले,

"तुम्हांला पर्वा नसेल, पण पंचांना असली पाहिजे. कारण या पंचांत पुण्यांतले प्रतिष्ठित आहेत, त्यांना पुण्यांत राहायचं आहे. एका परदेशी फिरंग्याच्या वतीनें राज्यांतल्या सुभेदाराविरुद्ध...."

रामशास्त्र्यांचा राग अनावर झाला. ते बापूंच्या अंगावर ओरडून म्हणाले,

"बापू, माझ्या कचेरींत, माझ्यासमोर पंचांवर दडपण आणूं पाहातां? न्यायाच्या इभ्रतीसाठीं तुम्ही इथें राहाणं इष्ट नाहीं. मी तुम्हांला फर्मावतों, तुम्ही इथून निघून जा."

"आणि नाहीं गेलों तर?"

"न्यायासनाचा उपमर्द केल्याबद्दल कडक शासन करावं लागेल."

जरब देण्याचा रामशास्त्र्यांचा तो आव पाहून तेथें अधिक वेळ थांबण्याची बापूंची छाती झाली नाहीं. ते तावातावानें निघून गेले. ते गेल्यावर रामशास्त्री पंचांना उद्देशून म्हणाले, "पंच मंडळी, न्यायाला स्मरून, ईश्वराला स्मरून, कुठल्याही सत्तेची तमा न धरतां तुम्ही आपला निर्णय द्या. सांगा, आरोपी दोषी आहे का निर्दोषी?"

पंचांनीं पूर्ण विचार करून आरोपी दोषी असल्याचें आपलें मत सांगितलें, तेव्हां रामशास्त्र्यांनीं विसाजीपंतांना आपला निर्णय सांगितला,

"तुमच्यावरील आरोप पुराव्यानें सिद्ध झाला आहे. तुम्ही गुन्हेगार आहांत. तुमच्या या गुन्ह्याला शिक्षा म्हणून मी हुकूम देतों, कीं तुम्हीं फिर्यादी फिरंग्यांना वीस लक्ष रुपये द्यावेत आणि दीड लक्ष रुपये गुन्हेगारी सरकारांत आदा करावी."

★

# १५

पेशवाई दौलतीची इभ्रत वाढवणारे आपल्या पदरीं जे कांहीं पुरुष आहेत, त्यांत रामशास्त्री प्रमुख आहेत, ही श्रीमंत माधवरावांची खात्री झाली. राजकारणाच्या दुसऱ्याही अनेक बाबतींत श्रीमंत माधवरावांना रामशास्त्र्यांचा दांडगा आधार वाटे. त्या मानानें लहान वयांतच श्रीमंत माधवरावांवर राज्याची फार मोठी जबाबदारी पडली होती. राज्याच्या जबाबदारीखेरीज घरांतल्या भाऊबंदकीनेंही त्यांना जर्जर केलें होतें. प्रत्यक्ष चुलत्याशीं–रघुनाथरावदादांशींही–त्यांना लढाया द्याव्या लागल्या होत्या. घरचीं भांडणें वेशीवर टांगलीं जाऊं नयेत म्हणून त्यांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. अखेरीस अर्ध्या राज्याची हाव धरून राज्यांत बखेडे माजवणाऱ्या प्रत्यक्ष चुलत्याला – राघोबांना व आनंदीबाईला–सक्त नजरबंदींत ठेवणें त्यांना भाग पडलें.

एवढ्या लहान वयांत जिवापाड श्रम करावे लागल्यामुळें माधवरावांची प्रकृति फारच खचली व दिवसेंदिवस खालावूं लागली. आपले हे अखेरचे दिवस आहेत अशीं चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हां राज्याची निरवानिरव करण्यासाठीं श्रीमंत माधवरावांनीं, रामशास्त्र्यांच्या विचारानें, राघोबांना बंधमुक्त करून तातडीनें थेउरास बोलावलें. श्रीमंतांची ही आज्ञा घेऊन गोविंदराव खासगीवाले पुण्यास आले त्या वेळीं राघोबादादा आपल्या देवघरांत पूजा करीत बसले होते. गोविंदरावांनीं त्यांना श्रीमंतांची आज्ञा सांगितली.

"धाकटे श्रीमंत अत्यवस्थ झाले आहेत. त्यांनीं आपल्याला टाकोटाक थेऊरला बोलावलं आहे. आपल्यावरची नजरकैद पूर्णपणें काढून घेतली आहे."

विशेषत: आपल्यावरची नजरकैद गेली याचा राघोबादादांना फार आनंद झाला. तो त्यांच्या बोलण्यांत आणि वृत्तींत अगदीं स्पष्ट स्पष्ट दिसूं लागला.

"खरंच? आमच्यावरची नजर अजिबात काढली? खरंच? अं?"

असें म्हणत म्हणत त्यांनीं हातांतलें पळीपंचपात्र तसेंच खालीं ठेवलें व ती बातमी सांगण्यासाठीं ते आनंदीबाईकडे निघाले. उठतां उठतांच त्यांनीं हाका मारण्यास सुरुवात केली,

"अग ए, अग ए, ऐकलंस का? आनंदाची बातमी आली आहे, ऐकलीस का?"

"सांगितल्याशिवाय कशी समजणार? इतकी कसली आनंदाची बातमी आली आहे?"

"तुलादेखील आनंद झाल्याशिवाय राहायचा नाहीं ती बातमी ऐकून!"

"हो, पण कसली बातमी?"

"अग, रावसाहेबांची आज्ञा आली, आपल्यावरची नजर त्यानें अजिबात काढली."

आनंदीबाईनें राघोबांची पूर्ण निराशा केली. आनंदीबाईला ती बातमी आनंदाची वाटली नाहीं, एवढेंच नव्हे, तर राघोबांना झालेल्या आनंदाची तिनें एक प्रकारें हेटाळणीच केली.

"म्हणून का आनंद झालाय आपल्याला एवढा! खरा खरा सांबाचा अवतार ग बाई! अहो, इतकं झाल्यावर तुमच्या रावसाहेबाला जो प्रेमाचा एवढा मोठा उमाळा आला आहे, तो कांहीं अशातशासाठीं असायचा नाहीं. कांहीं तरी चांगला डाव साधायचा असेल त्याला!"

"तूं तरी अशी आहेस! ज्यांत त्यांत कांहींतरी खुसपट काढतेस! मरणाच्या वेळीं कसला डाव खेळतोय? तिकडे थेऊरला अगदीं अत्यवस्थ होऊन पडला आहे बिचारा?"

त्यावर आनंदीबाई अधिक ठासून म्हणाली,

" होय ना ? मग तर शंकाच नको. त्याचा चांगलाच डाव असला पाहिजे ! आतां तो तुम्हांला भेटायला बोलावील, आंजारील, गोंजारील, गोड बोलेल आणि म्हणेल, नारायणाला पेशवाई दे. "

राघोबादादा आढ्यतेनें आनंदीबाईला म्हणाले,

" पण म्हणावं, मी तुझा काका लागून गेलों आहें. या वेळीं मीसुद्धा माझा डाव साधून घेतल्याशिवाय राहाणार नाहीं. "

" असा कोणता डाव आपण साधणार तो तरी सांगावा. "

" कोणता म्हणजे ? अर्धं राज्य मिळवण्याचा ! मी त्याला साफ सांगणार आहें, माझ्या वाटणीचं अर्धं राज्य मिळालं, तरच तुझ्या म्हणण्याप्रमाणें नारायणाला पेशवा करीन मी ! "

राघोबांच्या या सरळ स्वभावी बोलण्यावर आनंदीबाई अधिकच चिडली. ती एकदम उसळून म्हणाली,

" तुमच्या या अर्धवटपणाचाच राग येतो मला ! एकाद्या पोराला पेशवा करायचं ज्याच्या आंगांत सामर्थ्य आहे, त्यानें अर्ध्या राज्यासाठीं काय म्हणून तोंड वेंगाडायचं ? तें कांहीं नाहीं, अर्धं नाहीं न् मुर्धं नाहीं; आतां भीक मागायची नाहीं, सगळं राज्य घ्यायचं ! काय म्हणतें मी ? "

आपल्या बोलण्याचा रघुनाथरावावर परिणाम होतो आहे, हें आनंदीबाईच्या लक्षांत आलें. ती पुढें म्हणाली,

" लढाया माराव्यात तुम्हीं, राज्य वाढवावं तुम्हीं, कारभाराचीं खरकटीं काढावींत तुम्हीं, नि पेशव्यांच्या गादीवर मात्र गुळाचा गणपति होऊन मान घ्यावा तिसऱ्यानेंच ! कां रे बाबा असं ? "

आनंदीबाईचें हें बोलणें रघुनाथरावांना पटलें. तिच्या म्हणण्यांत पुष्कळच अर्थ आहे, असें त्यांना वाटलें. त्याच विचारांच्या नादांत त्यांच्या तोंडून अगदीं सहज उद्गार बाहेर पडले,

" खरं आहे तुझं म्हणणं ! "

“ . . तुझी इच्छा पुरी करीन मी ! ... नारायण माझा आहे. ... ”



" आहे ना खरं ? मग ही सोन्याची संधि दवडूं नका. गुळमुळू करूं नका. कुणाच्या गोड बोलण्याला भाळूं नका. आतां थेऊरला जायचं, ते गारद्यांची फौज घेऊन भावी पेशवे म्हणूनच जायचं. माधवाचा अंत झाल्याबरोबर छावणी ताब्यांत घ्यायची, नांवाची द्वाही फिरवायची नि पेशवे म्हणून मिरवीत पुण्याला यायचं."

★

# १६

आनंदीबाईनें पढवलेला "राघोबा" पुतण्याच्या भेटीला गारद्यांची फौज घेऊन निघाला होता. इकडे थेउरास माधवरावांची स्थिती मोठी कठीण झाली होती. आतां त्यांची सगळी भाषा निरवानिरवीची चालली होती. ते प्रत्येकाला कांहीं ना कांहीं सांगत होते आणि मग एकदा सगळ्यांना उद्देशून म्हणाले,

" दौलतीच्या सेवेंत आपण अखेरपर्यंत माझी पाठराखण केलीत, याबद्दल मी आपणां सर्वांना धन्यवाद देतों. नारायण, नेहमीं ध्यानांत ठेव, राज्याच्या सामर्थ्याचे खरे आधार त्याचे अधिकारीच असतात. माझ्याप्रमाणेंच तुम्हीं सर्वांनीं नारायणाला साहाय्य करावं, अशी माझी इच्छा आहे. आणखी काय सांगूं ? सांभाळा झालं."

बोलतां बोलतां ते रामशास्त्र्यांना उद्देशून म्हणाले,

" शास्त्रीबुवा, आपण तर आमच्या दौलतीचे भूषण आहांत. अशीच कोणाचीही भीडमुर्वत न ठेवतां निःस्पृह न्यायदानानें पेशवाईची इभ्रत अखंड वाढवीत राहा."

ते आणखी कांहीं सांगणार तोंच बाहेर घोड्यांच्या टापा ऐकूं आल्या. सगळे चकित होऊन बाहेर पाहूं लागले. माधवरावांनींदेखील मान किंचित उचलून डोकें वर केलें. एवढ्यांत राणोजीनें बातमी आणली,

" थोरले रावसाहेब गारद्यांची फौज घेऊन दौडत येताहेत."

त्याबरोबर माधवरावांच्या आंगाचा संताप झाला. तसल्याही स्थितींत उठण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले,

" कोण ? काका फौज घेऊन येताहेत ? ही भाऊबंदकीच माझी अखेर करणार ? राणोजी, माझी तरवार आण, घोडा तयार कर."

रामशास्त्री त्यांना सावरीत म्हणाले, " अगदीं तकलीफ घेऊं नये श्रीमंतांनीं. अगदीं शांतचित्त राहावं."

" कुडींत धुगधुगी असेपर्यंत गादीची सेवा करणार मी. राणोजी, चौकी पाहारे बसव. सगळ्यांना इशारा दे. एकटे काकाच भेटीला आले तर त्यांना आंत सोड."

राणोजी 'जी' म्हणून गेला. चौकीपहारे ठेवून बंदोबस्त केला, आणि स्वत: निवडक लोक घेऊन दाराशीं उभा राहिला. एवढ्यांत राघोबा, सुमेरसिंग व गार्दी येऊन थडकलेच. राणोजीनें तोंड अडवलेलें पाहातांच राघोबा त्याला दरडावून म्हणाले,

" राण्या, दरवाजा उघड."

राणोजीनेंही तितक्याच धीटपणें उत्तर दिलें,

" एकट्या शिरिमंतांस्नींच आमंदीं सोडायचा हुकूम हाय."

" राण्या, पुन्हा सांगतों, मुकाट्यानें बाजूला हो."

सुमेरसिंगही राणोजीवर ओरडला, " हट जाव !"

राणोजी हटला नाहीं. तरवार उपसून तो सुमेरसिंगाला म्हणाला,

" सुमेरसिंग, मागं फीर, न्हायीतर समद्यांचीं खांडोळीं व्हतील."

बोलतां बोलतां तो सुमेरसिंगाच्या आंगावर धावला, त्याबरोबर त्याचे लोकही तरवारी उपसून गारद्यांशीं भिडले. दोघांची चकमक सुरू झाली, तोंच रामशास्त्री तेथें आले आणि राघोबांना उद्देशून म्हणाले,

" श्रीमंत, श्रीमंत, आपण काय चालवलं आहे हें ? वेळ कोणती आहे हें लक्षांत घ्यावं. श्रीमंत माधवरावसाहेबांनीं केवळ आपल्या

भेटीसाठीं जीव धरला आहे. प्रत्यक्ष पुतण्या अखेरच्या भेटीसाठीं तळमळत असतांना काकानें त्याच्याच दाराशीं अशी लढाई करावी, त्याला सुखानें मरूंदेखील देऊं नये, हें शोभतं श्रीमंतांना ?"

तोंच आंतून हुंदक्यांचा स्वर ऐकूं आला. गोविंदपंत गडबडीनें रामशास्त्र्यांकडे आले आणि घाबऱ्या घाबऱ्या म्हणाले,

"शास्त्रीबुवा, श्रीमंत पुन्हा घाबरे झाले. आपल्याला हाका मारताहेत. काकासाहेब आलेत काय, म्हणून विचारताहेत."

या सगळ्या प्रकारानें रघुनाथराव एकदम विरघळले. त्यांनीं जणूं गोविंदरावांनाच उत्तर दिलें,

"आलेत, आलेत म्हणावं."

असें म्हणून त्यांनीं घोड्यावरून उडी टाकली. त्यांनीं रामशास्त्र्यांचा हात धरला व अधीरपणें म्हटलें,

"चला, चला शास्त्रीबुवा, माधवाला एकदा भेटूं दे मला !"

रघुनाथरावांना हाताला धरून रामशास्त्री आंत आले. माधवरावांना त्यांनीं वर्दी दिली,

"श्रीमंत दादासाहेब भेटीला आले आहेत."

दादांना पाहातांच नारायणरावांनीं त्यांना उमाळ्यानें हाक मारली,

"काकाऽ"

दादांनीं नारायणरावांची हाक ऐकली कीं नाहीं कोण जाणे, त्यांची सगळी दृष्टि माधवरावांवर होती. ते तडक त्यांच्याजवळ गेले व मायेनें त्यांच्या अंगावरून हात फिरवीत म्हणाले,

"माधव, माधव, काय रे ही तुझी दुर्दशा ?"

माधवरावांनीं दादांकडे पाहिलें आणि अगदीं क्षीण पण उत्साही स्वरांत म्हटलें,

"तुमच्या या मायेच्या स्पर्शानें कुडींत जीव आला काका. माझ्या जीवज्योतीची ही अखेरची दशा आहे हो काका !"

"नको रे असं बोलूं माधव." दादांचा कंठ भरून आला.

" काका माझी अखेरची इच्छा...." नारायणाचा हात घेऊन रघुनाथरावांच्या हातांत देत, माधवराव पुढें म्हणाले, याला " तुमच्या स्वाधीन केला आहे. याला पेशवा करा आणि दौलतीचा सगळा कारभार तुम्ही पाहा."

माधवरावांचे ते शब्द ऐकण्याबरोबर रघुनाथरावदादा चमकले. त्यांची चर्या कावरीबावरी झाली. आनंदीबाईचे शब्द त्यांच्या कानांत घुमूं लागले. तिची चर्या त्यांना स्पष्ट दिसूं लागली. माधवरावांनीं दिलेला नारायणरावांचा हात त्यांच्या हातांतून गळूं लागला. त्यांचें बावरलेलें मन ध्यानांत येतांच रामशास्त्री त्यांना उद्देशून म्हणाले,

" दादासाहेब, वडलांच्या थोर अंत:करणानें आम्हांला क्षमा करा. आमचे सगळे अपराध पोटांत घाला. श्रीमंत आपल्यावर रागावले असतील, टाकून बोलले असतील, एकादे वेळीं त्यांनीं आपला अपमानही केला असेल, पण तें सगळं या वेळीं विसरून जा."

माधवरावांनींही अखेरच्या क्षीण स्वरांत दादांची प्रार्थना केली,

" मला क्षमा करा. माझ्यावरचा राग तुमच्या या लेकरावर काढूं नका." माधवरावांनीं नारायणरावाचा हात पुन्हा रघुनाथरावांच्या हातीं देत पुढें म्हटलें, " त्याचा सांभाळ करा. घराण्याची अब्रू राखा आणि दौलतीची इभ्रत वाढवा. काकाऽ, काकाऽ माझी अखेरची इच्छा..."

दादांचें भाबडें अंत:करण विरघळलें. ते माधवरावांना म्हणाले,

" पुरी करीन मी ! तुझी इच्छा पुरी करीन मी !...नारायण माझा आहे."

असें म्हणत म्हणतच रघुनाथरावांनीं नारायणाला जवळ ओढून घेतलें. आपल्या छातीवर त्याचें डोकें ठेवून ते त्याला थोपटूं लागले. तें पाहून माधवरावांच्या चर्येवर समाधानाचें स्मित दिसलें. त्या दोघांकडे पाहात पाहातच 'गजानन, गजानन' म्हणत माधवरावांनीं अखेरचा श्वास घेतला.

# १७

या वेळीं मात्र कोणाच्या आहारीं न जातां, आपला राज्यलोभही क्षणभर बाजूला ठेवून, रघुनाथरावदादांनीं माधवरावांना अंतकाळीं दिलेलें वचन शब्दशः पूर्ण केलें. त्यांनीं स्वतः साताऱ्याला जाऊन छत्रपतींकडून नारायणरावांना पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं. माधवरावांच्या इच्छेप्रमाणें, नारायणराव पेशव्यांच्या गादीचे धनी झाले होते, किंबहुना आपणच त्यांना धनी केलें होतें, तरी दौलतीचा कारभार आपण स्वतः पाहावयाचा असल्यामुळें गादीचे सत्ताधारी धनी आपणच आहोंत, ही रघुनाथरावांची खात्री होती. त्या भावनेनेंच आतांपर्यंत ते वागत आले. पण नारायणराव पेशवा झाला हें जाहीर करण्यासाठीं भरलेल्या दरबारांत त्यांच्या या भावनेला रामशास्त्र्यांनीं एक जोराचा धक्का दिला.

त्या दरबाराला देशोदेशींचे, खुद्द पेशव्यांचे सरदार आणि निरनिराळ्या दर्जांचे मानकरी जमले होते. श्री. सौ. गंगाबाई व आनंदीबाईही आपापल्या आसनावर येऊन बसल्या होत्या. 'मसनदी'-वर चढण्यासाठीं नारायणरावांनीं दरबारांत प्रवेश केला. त्यांच्याबरोबर रघुनाथराव, सखारामबापू व रामशास्त्री होते. ते आपापल्या स्थानीं गेले. नारायणराव 'मसनदी' वर बसल्यावर रघुनाथरावदादा सगळ्या दरबाराला उद्देशून म्हणाले,

"आमचे पुतणे श्रीमंत नारायणराव छत्रपतींच्या आज्ञेनें पंतप्रधानांच्या 'मसनदी' वर आले आहेत, हें राज्यांत जाहीर करण्यासाठीं आजचा दरबार भरला आहे. जमलेल्या सगळ्या मानकऱ्यांनीं गादीला राजनिष्ठेचे मुजरे केले, म्हणजे आजचा दरबार बरखास्त होईल."

असें म्हणून स्वतः मात्र मुजरा न करतां रघुनाथराव आपल्या जागीं जाऊन बसले. पण मुजरा करण्यास कोणीच उठेनात. सरदार अजून मुजरे अजून कां करीत नाहींत हें रामशास्त्र्यांच्या लक्षांत तेव्हांच आलें. म्हणून ते रघुनाथरावांना उद्देशून नम्रपणें म्हणाले,

"श्रीमंत, राजनिष्ठेचा पहिला मुजरा करण्याचा मान आपला आहे. आपला मुजरा झाल्यावर सगळे मानकरी आपापल्या मानाप्रमाणें मुजरा करतील."

रामशास्त्र्यांच्या या इशाऱ्यानें रघुनाथरावांच्या आणि सखारामबापूंच्या आंगाचा भडका झाला. ते कांहीं बोललेही नाहींत व उठलेही नाहींत. तें पाहून रामशास्त्री पुन्हा म्हणाले,

"श्रीमंत, सगळे मानकरी खोळंबले आहेत. गादीला मुजरा करावा."

त्याबरोबर सखारामबापू चवताळून रामशास्त्र्यांना म्हणाले,

"शास्त्रीबुवा, हे मानकरी नव्हेत गादीपुढें मान झुकवायला! वडिलकीच्या नात्यानें राज्यकारभार पाहाणारे गादीचे दुसरे धनीच आहेत हे!"

"ते धन्याप्रमाणें वागतील, पण धनी होणार नाहींत. या गादीचा खरा धनी एकच आहे. आम्ही सगळे गादीचे सेवक आहोंत."

रामशास्त्र्यांचें म्हणणें सरदारांनाही पटलें व भोसले म्हणाले,

"शास्त्रीबुवांचं म्हणणं खरं आहे."

"राजनिष्ठेचा पहिला मुजरा श्रीमंतांचाच झाला पाहिजे."

गायकवाडांनीं त्यांना दुजोरा दिला. किंबहुना सगळ्याच दरबारानें रामशास्त्र्यांच्या बोलण्याला संमतिदर्शक मान डोलवली, तेव्हां रामशास्त्री रघुनाथरावांना उद्देशून पुढें म्हणाले,

"आणि प्राप्त झालेल्या मानाप्रमाणें आपण गादीला राजनिष्ठेचा मुजरा केला नाहीं, तर आपल्या शुद्ध हेतूविषयीं सगळ्या दरबारला शंका येईल श्रीमंत!"

तें ऐकण्याबरोबर रघुनाथराव आणि सखारामबापू अगदीं अस्वस्थ झाले. दोघांनींही एकमेकांकडे पाहिलें. सगळा दरबार आपल्याकडे साशंक मुद्रेनेंच पाहातो आहे कीं काय, असें त्यांना वाटलें. रघुनाथरावांनीं रामशास्त्र्यांकडे एकवार संतापानें नजर टाकली. पण त्यांना कांहीं उत्तर देतां येण्यासारखें नव्हतें. रामशास्त्र्यांनीं टाकलेला पेच, गादीला सेवक म्हणून मुजरा केल्याशिवाय सुटणें शक्य नव्हतें; त्याखेरीज दरबारचें समाधान होणें शक्य नव्हतें, अशी राघोबादादांची खात्री झाली. तेव्हां जळफळत आपल्या जागेवरून उठून त्यांनीं नारायणरावांना कसेतरी तीन मुजरे केले.

★

# १८

रघुनाथरावांच्या त्या प्रत्येक मुजऱ्याबरोबर आनंदीबाईच्या आंगाची लाही लाही फुटत होती. तिला तें मुळींच सहन झालें नाहीं. ती आवेशानें ताड्दिशीं उठली आणि पाय आपटीत दरबारांतून निघून गेली. ती आली ती तडक आपल्या महालांत येऊन पलंगावर पडली. तिच्या मागोमाग तिच्या दासीही आल्या. येतां येतां एका दासीनें राजवैद्याला बाईसाहेबांची तब्येत बिघडल्याची बातमी सांगितली होती म्हणून वैद्यबोवाही धांदलीनें तेथें आले होते. येण्याबरोबर त्यांनीं एका दासीच्या हातांत सूतशेखर मात्रा देऊन म्हटलें,

"भर्रदिशीं ही मात्रा उगाळ. आटप लवकर."

मात्रा उगाळायला सांगून वैद्यबोवा आनंदीबाईजवळ आले आणि मोठ्या आदबीनें म्हणाले,

"एकाएकीं असं काय झालं बाईसाहेबांना?"

राघोबांच्या त्या विचारसरणीनें विशेषत: त्यांच्या शेवटल्या उद्गारांनीं आनंदीबाईचें बरेंच समाधान झालेलें दिसलें. पण त्यांच्या मनाचा ठाव काढण्यासाठींच कीं काय, ती म्हणाली,

"मग त्याचा एवढा कशाला विचार करायला पाहिजे? खरंच तुमच्या मनांत असलं, तर मी आत्तां सांगतें कसं करायचं नि कसं जमवायचं तें!"

"हो, हो, सांग कीं!"

"मी म्हणतें, हैदर, नाईक, निजाम नि भोसले आपली पाठ राखायला एका पायावर तयार आहेत, तर विचारांत दिवसगत काय म्हणून करावी? आत्तांच लिहावेत त्यांना खलिते..."

कसें करायचें नि कसें जमवायचें तें नुसतें सुचवूनच आनंदीबाई गप्प राहिली नाहीं. तिनें लागलीच तुळ्याला हाक मारली,

"तुळ्या, अरे तुळ्या, जा. आबाजीला हाक मारून घेऊन ये. जा, पळ अगोदर. त्याला म्हणावं श्रीमंतांचे महत्त्वाचे खलिते लिहावयाचे आहेत."

"शाब्बास आहे तुझी हं!" कौतुकानें तिच्या पाठीवर शाबासकी देत रघुनाथराव म्हणाले, "अगदीं हीच मंडळी माझ्या ध्यानांत आली होती. त्यांनाच मी खलिते लिहिणार होतों."

एवढ्यांत तुळ्या आबाजीला घेऊन आला. त्याला उद्देशून आनंदी-बाई म्हणाली,

"हं, बसा तिथें; लिहा श्रीमंत सांगताहेत तसं."

असें म्हणत आनंदीबाई स्वत:च आबाजीला खलित्याचा मजकूर सांगूं लागली. मधून मधून ती रघुनाथरावांकडे पाहात होती. जणूं काय "असंच ना?" असें ती विचारीत होती. रघुनाथरावही तिच्याकडे पाहात, "हो. बरोबर आहे." अशा अर्थाची मान हलवीत होते.

★

# ११

असे कित्येक दिवस खलित्यांवर खलिते चालले होते, निरोप जात होते, गांठीभेटी होत होत्या. एकंदर प्रकरण किती जमत आलें होतें हें कांहीं नक्की सांगतां येत नव्हतें. पण रघुनाथराव–आनंदीबाईंची 'धनी' होण्याची वेळ अद्याप आली नव्हती, एवढेंच नव्हे, तर धनी होण्याची तीं जों जों खटपट करीत होतीं, तों तों त्यांच्या दुर्दैवानें 'बंदी'च होण्याची वेळ जवळ जवळ येत होती.

माधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांचा शरीररक्षक राणोजी नारायण-रावांचाही शरीररक्षक म्हणून राहिला होता. त्यानें आपल्या कर्तबगारीनें नारायणरावांची मर्जी चांगली संपादन केली होती. राघोबादादांच्या एकंदर हालचालीची शंका येतांच त्यांच्या पाळतीवर राहाण्याची महत्त्वाची आणि विश्वासाची कामगिरी नारायणरावांनीं राणोजीवर सोपविली होती.

तो असाच पाळतीवर असतांना एक दिवस राघोबादादांचा खासा जासूद वेशीच्या बाहेर पडतांना त्याला दिसला. राणोजीची आणि त्याची दृष्टादृष्ट होतांच तो किंचित् चपापला, पण चेहेऱ्यावर तसें न दाखवितां तो सरळ पुढें गेला. राणोजीपासून थोडें पुढें जातांच त्यानें घोडा भरधाव फेकला. मग मात्र राणोजीला शंका आली. त्यानेंही लागलीच आपला घोडा मागें वळवून त्याचा पाठलाग केला. कोसा दीडकोसावर त्यानें त्याला गांठलें. दोघांची लहानशी चकमकही झाली. त्यांत राणोजीनें त्याला चांगलेंच घायाळ केलें. त्यानें त्याची झडती घेतल्यावर त्याच्याजवळ राघोबांच्या शिक्क्याचा खलिता सापडला. तो घेऊन त्याच पावलीं तो पुण्याला परतला.

राणोजी खलिता घेऊन नारायणरावांच्या दिवाणखान्यांत आला. त्याच्या आधीं कांहीं वेळ सुमेरसिंग व खरकसिंग त्यांच्याकडे येऊन

राघोबांच्या त्या विचारसरणीनें विशेषतः त्यांच्या शेवटल्या उद्गारांनीं आनंदीबाईचें बरेंच समाधान झालेलें दिसलें. पण त्यांच्या मनाचा ठाव काढण्यासाठींच कीं काय, ती म्हणाली,

"मग त्याचा एवढा कशाला विचार करायला पाहिजे? खरंच तुमच्या मनांत असलं, तर मी आत्तां सांगतें कसं करायचं नि कसं जमवायचं तें!"

"हो, हो, सांग कीं!"

"मी म्हणतें, हैदर, नाईक, निजाम नि भोसले आपली पाठ राखायला एका पायावर तयार आहेत, तर विचारांत दिवसगत काय म्हणून करावी? आत्तांच लिहावेत त्यांना खलिते..."

कसें करायचें नि कसें जमवायचें तें नुसतें सुचवूनच आनंदीबाई गप्प राहिली नाहीं. तिनें लागलीच तुळ्याला हाक मारली,

"तुळ्या, अरे तुळ्या, जा. आबाजीला हाक मारून घेऊन ये. जा, पळ अगोदर. त्याला म्हणावं श्रीमंतांचे महत्त्वाचे खलिते लिहावयाचे आहेत."

"शाब्बास आहे तुझी हं!" कौतुकानें तिच्या पाठीवर शाबासकी देत रघुनाथराव म्हणाले, "अगदीं हीच मंडळी माझ्या ध्यानांत आली होती. त्यांनाच मी खलिते लिहिणार होतों."

एवढ्यांत तुळ्या आबाजीला घेऊन आला. त्याला उद्देशून आनंदीबाई म्हणाली,

"हं, बसा तिथें; लिहा श्रीमंत सांगताहेत तसं."

असें म्हणत आनंदीबाई स्वतःच आबाजीला खलित्याचा मजकूर सांगूं लागली. मधून मधून ती रघुनाथरावांकडे पाहात होती. जणूं काय "असंच ना?" असें ती विचारीत होती. रघुनाथरावही तिच्याकडे पाहात, "हो. बरोबर आहे." अशा अर्थाची मान हलवीत होते.

☆

# ११

असे कित्येक दिवस खलित्यांवर खलिते चालले होते, निरोप जात होते, गांठीभेटी होत होत्या. एकंदर प्रकरण किती जमत आलें होतें हें कांहीं नक्की सांगतां येत नव्हतें. पण रघुनाथराव–आनंदीबाईंची 'धनी' होण्याची वेळ अद्याप आली नव्हती, एवढेंच नव्हे, तर धनी होण्याची तीं जों जों खटपट करीत होतीं, तों तों त्यांच्या दुर्दैवानें 'बंदी'च होण्याची वेळ जवळ जवळ येत होती.

माधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांचा शरीररक्षक राणोजी नारायणरावांचाही शरीररक्षक म्हणून राहिला होता. त्यानें आपल्या कर्तबगारीनें नारायणरावांची मर्जी चांगली संपादन केली होती. राघोबादादांच्या एकंदर हालचालींची शंका येतांच त्यांच्या पाळतीवर राहाण्याची महत्त्वाची आणि विश्वासाची कामगिरी नारायणरावांनीं राणोजीवर सोपविली होती.

तो असाच पाळतीवर असतांना एक दिवस राघोबादादांचा खासा जासूद वेशीच्या बाहेर पडतांना त्याला दिसला. राणोजीची आणि त्याची दृष्टादृष्ट होतांच तो किंचित् चपापला, पण चेहऱ्यावर तसें न दाखवितां तो सरळ पुढें गेला. राणोजीपासून थोडें पुढें जातांच त्यानें घोडा भरधाव फेकला. मग मात्र राणोजीला शंका आली. त्यानेंही लागलीच आपला घोडा मागें वळवून त्याचा पाठलाग केला. कोसा दीडकोसावर त्यानें त्याला गांठलें. दोघांची लहानशी चकमकही झाली. त्यांत राणोजीनें त्याला चांगलेंच घायाळ केलें. त्यानें त्याची झडती घेतल्यावर त्याच्याजवळ राघोबांच्या शिक्कयाचा खलिता सापडला. तो घेऊन त्याच पावलीं तो पुण्याला परतला.

राणोजी खलिता घेऊन नारायणरावांच्या दिवाणखान्यांत आला. त्याच्या आधीं कांहीं वेळ सुमेरसिंग व खरकसिंग त्यांच्याकडे येऊन

थकलेल्या पगाराची मागणी करीत होते. नारायणरावांच्या समजून सांगण्यानें सुमेरसिंगाचें समाधान झालें नव्हतें. तो कांहींशा अवज्ञेच्याच सुरांत म्हणाला,

" आम्हांला आतांच्या आत्तां पगाराची सगळी रक्कम मिळाली पाहिजे."

त्याचा तो हुकमी स्वर आणि चढेल चर्या पाहून नारायणराव संतापानें म्हणाले,

" बेवकूफ, कुणाला हुकूम सोडतोस? आतां सवड आहे त्याप्रमाणें देतों ही रक्कम मुकाट्यानें घे नि चालता हो. बोल, मानानें जायचं आहे, कीं हुजऱ्याकडून शोभा करून घ्यायची आहे? .... राणोजी, अरे राणोजीऽ"

ह्याच वेळीं राणोजी तेथें आला होता. तो 'जी' करीत पुढें झाला. पण नारायणरावांनीं दुसरें कांहीं सांगण्याच्या आधीं राणोजीनें तो लखोटा नारायणरावांच्या हातांत दिला. नारायणरावांनीं तो वाचला. त्यांची मुद्रा रागानें लाल झाली. ते सुमेरसिंगाला म्हणाले,

" सुमेरसिंग, खरकसिंग, अगोदर माझ्याबरोबर चला."

असें म्हणत नारायणराव आवेशानें चालूंच लागले. त्यांच्या मागून राणोजी, सुमेरसिंग व खरकसिंग मुकाट्यानें चालूं लागले. नारायणराव रघुनाथरावांच्या दिवाणखान्याचा दरवाजा जोरानें उघडून आंत शिरले. त्यांच्या मागून राणोजी, सुमेरसिंग, खरकसिंगही शिरले. आनंदीबाई व रघुनाथराव दोघें तेथें बसलीं होतीं. दार उघडून ही मंडळी एकदम आंत घुसल्यामुळें दोघेंही चपापलीं. नारायणरावांनीं हातांतला खलिता राघोबांपुढें नाचवीत म्हटलें,

" राज्याचं धनीपण तुम्हांला पाहिजे आणि तें अशा तऱ्हेनें पाहिजे काय?"

तो खलिता पाहून राघोबा आणि आनंदीबाई ह्यांच्या चर्या एकदम पडल्या. तें पाहून तर नारायणराव अधिकच खोचून म्हणाले,

"पाहा पाहा, तोंडं कशीं खेटरानें मारल्यासारखीं झालीं तीं! सुमेरसिंग, पेशव्यांशीं दगलबाजी करणारा हा काका आणि त्याला साहाय्य करणारी ही काकी, ह्या घटकेपासून तुझ्या स्वाधीन केलीं आहेत, सक्त बंदोबस्तांत ठेव. माझ्या हुकमाशिवाय आंतली बाहेर आणि बाहेरची आंत, कुणा माणसाची सावली सुद्धा पडतां कामा नये."

★

# २०

रघुनाथरावांना आणि आनंदीबाईला नजरबंदींत टाकल्यापासून प्रकरण फारच चिघळत चाललें. जों जों त्यांची नजरबंदी आधिक अधिक सक्त होऊं लागली, तों तों नारायणरावांविषयींचा त्यांचा द्वेष वाढत चालला. नारायणरावांच्या एकंदर वर्तनावर आणि कारभारावर कांहीं मुत्सद्दीही दिवसेंदिवस नाखूष होत चालले होते. त्यांची रघुनाथराव-आनंदीबाईंना मूक सहानुभूति होती. त्याचा त्यांना प्रत्यक्ष फायदा कांहीं होत नव्हता, तरी अप्रत्यक्ष फायदा झाल्याविना राहात नव्हता. नारायणरावांच्या कचाट्यांतून सुटण्यासाठीं रघुनाथराव आणि आनंदीबाई प्रयत्न करीत होतीं. त्यासाठीं कोणता धागा कोठें जोडावा, कोणता धागा किती कच्चा आहे आणि कोणत्या उपायानें तो आपल्याला आपल्या धाग्याशीं जोडतां येईल, हें तीं पाहात होतीं. ह्या कामांत तुळ्या त्यांचा चांगला साहाय्यकारी झाला होता. शोधतां शोधतां त्यांना सुमेरसिंगाचा धागा कच्चा सापडला. त्याच्याशीं त्यांनीं संधान बांधलें. पैशांचें आणि सरदारीचें आमीष दाखवून त्याला त्यांनीं इतका आपलासा केला कीं रघुनाथरावांचा कोणताही हुकूम अमलांत आणण्याची, त्यानें बेलभंडार उचलून शपथ घेतली. त्यांतली मुख्य गोष्ट नारायणरावांना धरून त्यांना बंधमुक्त करावयाचें ही होती.

त्यांनीं ठरवलेला दिवस उजाडला. भाद्रपद शुद्ध १३ शक १६९५ ( सोमवार, ता. ३० ऑगस्ट, १७७३ ) ची ती दोनप्रहर होती. शनिवार-वाड्यापुढें जोरावरसिंग गारद्यांची नित्याची कवाईत घेत होता. रघुनाथराव व आनंदीबाई वरून ती कवाईत पाहात होतीं. आनंदीबाईनें एकदा संकेत केला. त्याला जोरावरसिंगानें सबंध पलटणीची सलामी देत 'सगळी जय्यत तयारी आहे' अशा अर्थाचा उलट संकेत दिला. वाड्याच्या आंतल्या भागांत गणेशोत्सव चालू होता. आरती, मंत्रपुष्प चालू होते. तेथें रामशास्त्री व सखारामबापू होते. गारद्यांनीं आनंदीबाईला व रघुनाथरावांना सलामी दिली, तोंच वाड्यापुढें नारायणराव पेशव्यांची व हरिपंत फडक्यांची पालखी आली. त्यांनाही जोरावरसिंगानें सलामी दिली. गारद्यांना पाहून नारायणराव किंचित चमकले. ते वाड्यांत जातांना हरिपंत फडक्यांच्या कानाशीं लागून म्हणाले,

"हरिपंत, रंघुजी आंग्र्यांनीं सांगितलेलं ध्यानांत आहे ना? आज गार्दी पगारासाठीं गर्दी उडवून देणार आहेत म्हणे."

"श्रीमंतांनीं अगदीं निश्चित असावं, मी तजवीज करतों."

हरिपंतांनीं नारायणरावांना धीर दिला. नारायणरावांची पालखी पाहाण्याबरोबर त्यांच्या पाळतीवर राहाण्यासाठीं तुळ्या पवार आनंदीबाईकडून निघाला होता, तो ह्याच वेळीं तेथें आला होता. हरिपंतांचे शब्द त्यानें ऐकिले. आपला बेत ह्यांना समजला कीं काय, अशी शंका त्याच्या चर्येवर दिसली. तोंच हरिपंत गेले. नारायणराव दिल्ली दरवाजानें आंत शिरले. तुळ्या त्यांच्या मागून गेला. नारायणरावांच्या बरोबर राणोजी होता. तुळ्या आपल्या पाळतीवर आहे, हें त्याच्याही लक्षांत आलें नाहीं. नारायणरावांनीं दरवाजांतून जातां जातां जमादाराला बजावलें,

"पहारा चांगला हुषारीनें कर हां."

राणोजीनेंही त्याला बजावलें.

"अगदीं गाफील व्हाऊं नगसा हं. आतांचं दिस लई वंगाळ हैती बुदासिंग."

हें भाषण ऐकून तुळ्या पवार बेफिकीरीनें किंचित हसला. नारायणराव आपल्या महालांत गेले. जातां जातां त्यांनीं राणोजीला सांगितलें,

" राणोजी, मी आतां तासभर स्वस्थ निजतों हां, हुषारीनें राहा."

" शिरिमंतांनीं अगदीं सवस्त निजावं. ह्या राण्याच्या कुडींत परान हैती, तंवर शिरमंतांच्या केसालाबी धक्का लागनार न्हाई."

" तूं आणि तुझी बायको शामा, आम्हां नवराबायकोच्या खरोखरीच ढाली आहांत."

राणोजीची बायको शामा हीही श्री. सौ. गंगाबाईच्या तैनातींतील खास दासी होती. राणोजीप्रमाणेंच तीही गंगाबाईच्या शरीररक्षका-सारखी झाली होती. तिलाच उद्देशून नारायणरावांनीं राणोजीजवळ तो उल्लेख केला होता.

नारायणराव जाऊन निजले व घोरूंही लागले. राणोजीनें दार लावून घेतलें. नारायणरावांना चांगली झोप लागली हें पाहून तुळ्या धावत धावत आनंदीबाईकडे आला व म्हणाला,

" धाकल्या शिरिमंतांस्नी अक्षी दाट झोप लागलीया."

" तूं बघितलंस, खात्री करून घेतलीस ?"

" एवडा दिकून संशाय नग, म्यां सवता, ह्या, ह्या, डोळ्यांनीं बागितलंया."

" तर मग वेळ अगदीं दवडूं नको. गारद्यांना लागलीच इशारा दे."

" जी." म्हणून तुळाजी सज्जावर गेला आणि त्यानें सांकेतिक तऱ्हेनें हातरुमालाच्या खुणा करून गारद्यांना येण्यास इशारत दिली. त्याबरोबर गारदी वाड्याकडे दौड करूं लागले. घोड्यांच्या दौडीचा आवाज ऐकतांच बुधसिंगानें बाहेर येऊन पाहिलें व " दगा, दगा " असें ओरडत तो आंत शिरला. दुसरेही पहारेकरी गडबडून उठले. बुधसिंग दरवाजा लोटूं लागला. ते पहारेकरी त्याला मदत करूं लागले. एक दरवाजा लावला व दुसरा कसाबसा लावला, तोंच दरवाजावर गारद्यांची धाड येऊन पडली. बुधसिंग व पहारेकरी दार आंतून रेटून कडी व अडणा

घालण्याचा प्रयत्न करीत होते, पण गारद्यांनीं जोराची धडक देऊन दरवाजा उघडला. दरवाजा उघडण्याबरोबर आंत शिरणाऱ्या एकदोन गारद्यांना बुधसिंगानें मारलें. एवढ्यांत गारदी दोन्ही दरवाजे सताड उघडून आंत शिरले. त्यांनीं बुधसिंगाला आणि त्याच्या तीन पहारेकऱ्यांना ठार मारून दुसऱ्या दोघातिघांना बांधून टाकलें. सुमेरसिंगानें त्या दरवाजाला आपणच आंतून कडी लावली. इसुफखान, खरकसिंग व जोरावरसिंग ह्यांनीं मस्तानी, जांभळी, नारायण व गणेश दरवाजांकडे धाव घेतली आणि तेथल्या सगळ्या पहारेकऱ्यांना मारून ते चारही दरवाजे आंतून बंद केले, तेथें आपले पहारे ठेवले व ते पुन्हा दिल्ली दरवाजावर सुमेरसिंगाला येऊन मिळाले.

एवढ्यांत, गारदी वाड्यांत शिरून धुमाकूळ घालीत असल्याची बातमी सगळीकडे पसरली. सगळ्यांची एकच धांदल उडाली. सगळीकडे धावाधाव सुरू झाली. लोक धावतां धावतां एकमेकांना ओरडून सांगूं लागले,

"पळा, पळा, लपा, लपा, सुमेरसिंग गारदी सगळ्यांना गारद करीत चालला आहे."

कोणी खोल्यांतून दडूं लागले, कोणी कोपऱ्यांत दडले, कोणी पेट्या-कपाटांच्या मागें दडले, कोणी देवघरांत गेले. राणोजी "शामा शामा" अशा हाका मारीत पळत होता. दोघांची गांठ पडल्याबरोबर राणोजीनें तिला कसेंतरी भर्रदिशीं सांगून टाकलें,

"गारद्यांनीं लई गडबड उडवलीया. मी शिरिमंतांकडे जातों. तूं गंगाबाईसाहेबांना लपवून ठेव."

राणोजी गेला, शामाही तशीच धावत गेली. ती पार्वतीबाईच्या महालाजवळ थांबून दरवाजांतूनच ओरडली,

"बाईसाब, बाईसाब, दार लावून घ्या, गार्दी दंगल करीत यत्याती."

ती तशीच पुढें गंगाबाईच्या महालाकडे धावत गेली. त्यांना सांगण्यासाठीं ती आंत जाणार, तोंच तिला गारद्यांची गडबड ऐकूं आली,

घेतलें. पण गारद्यांच्या धडकीपुढें तें टिकलें नाहीं. समोर नारायणराव आणि राणोजी पळत असलेले दिसत असल्यामुळें त्यांनीं शामाकडे दुर्लक्ष केलें. ते तसेच पुढें त्यांचा पाठलाग करूं लागले, तरी जोरावरसिंगानें जातां जातां शामाकडे रागानें पाहात 'निमकका सच्चा लवंडी' म्हणत तिला एक तरवारीचा वार केलाच. शामा चक्कर येऊन पडली, गारदी पुढें झटकले.

"दुष्मन पळाला, पकडा, पकडा," हे सुमेरसिंगाचे शब्द ऐकून नारायणराव फारच घाबरले. बोबडी वळल्याप्रमाणें त्यांनीं राणोजीला हाक मारली,

"राणोजी, राणोजी, काय करायचं रे आतां?"

राणोजीनें तात्काळ उपाय सुचवला,

"काकांच्या गळ्यामंदी पडायचं."

असें म्हणत म्हणतच राणोजीनें रघुनाथरावांच्या दिवाणखान्याचें दार उघडलें आणि नारायणरावांना आंत ढकललें. रघुनाथराव, शंकरावर अभिषेक करीत बसले होते. त्यांना पाहातांच नारायणराव धावतच त्यांच्याकडे गेला. त्यांच्या गळ्याला मिठी मारून तो अगदीं दीनवाणीनें म्हणाला,

"काका, काका, मला वांचवा हो! सुमेरसिंग गारदी ठार मारतोय मला! काकी, मी तुमचं लेकरूं आहे हो!"

आनंदीबाई तिरस्कारानें म्हणाली,

"लेकरूं? पोट फाडून आईचाच जीव घेणाऱ्या लेकराचा जीव घेतला तर देवाच्या घरांत सुद्धा पाप होत नाहीं."

"काकी, काकी, असं म्हणूं नका हो. दीन होऊन आलेल्या ह्या लेकराला वांचवा."

"दीन? तूं दीन? कोण म्हणेल? अरे, राजाला देखील कैदेंत टाकणारा पेशवा तूं! मराठी राज्याचा धनी तूं! आणि आम्ही, दगलबाज, फितूर, दुष्मन, तुझे नजरबंदी."

" काकी, काकी, माझे सगळे अपराध पोटांत घाल, काका, तुम्ही तरी सांगा तिला ! तुम्हांला राज्याचं धनीपण पाहिजे ना ? घ्या, मला नजरबंदी करा तुम्ही ! पाहिजे तर एखाद्या किल्ल्यांत टाका, पायांत मणामणाच्या बेड्या ठोका, नाचण्याची अर्धी भाकरी द्या, तुम्ही आपल्या हातानें रोज मला थोबाडींत मारा पाहिजे तर. पण...."

तोंच गारद्यांचा गलबला ऐकूं आला. रघुनाथरावांनीं चमकून तिकडे पाहिलें. नारायणराव रघुनाथरावांना अधिकच बिलगला आणि म्हणाला,

" ....पण गारद्यांच्या हातनं माझा जीव घेऊं नका. थोरल्या रावांना मरतेवेळीं दिलेलं वचन आठवा. काका, काका, तुम्हीं मला पोटाशीं धरलं होतंत, आतां दूर लोटूं नका."

माधवरावांच्या मृत्यूवेळचें दृश्य रघुनाथरावांना डोळ्यांपुढें स्पष्ट दिसूं लागलें. त्यांनीं नारायणरावाला पोटाशीं ओढून घेतलें. ते दृढ व निश्चयाच्या सुरानें एकदम म्हणाले,

" नाहीं, नाहीं, तुला मी दूर लोटणार नाहीं, सुमेरसिंगच काय पण प्रत्यक्ष यम आला तरी तुला दूर लोटणार नाहीं मी !"

तोंच सुमेरसिंग, जोरावरसिंग, इसुफखान वगैरे आले. त्यांना पाहातांच, नारायणराव रघुनाथरावांना अधिकच बिलगला. सुमेरसिंग रघुनाथरावांना कांहींशा हुकमी स्वरांत म्हणाला,

" सरकार, सोडा शिरिमंतांस्नी !"

त्याच्याकडे रागानें पाहात रघुनाथराव म्हणाले,

" कुणाला हुकूम सोडतोस ? आलास तसा चालता हो. खबरदार नारायणाच्या अंगाला हात लावलास तर !"

असें म्हणून राघोबांनीं नारायणरावाला आपल्या दोन्ही हातांचा विळखा घालीत जवळ घेतलें. राघोबांचें तें बोलणें ऐकून सुमेरसिंग एकदम चमकलाच ! पण तो रागानें लाल झाला. त्याची पर्वा न करतां रघुनाथराव त्याला अधिकच दरडावून म्हणाले,

" चालता हो म्हणतों ना ? नारायणाच्या अंगाला हात लावायचा नाहीं, कीं त्याला धरायचा नाहीं."

रघुनाथरावांचें हें बदललेलें रूप पाहून आनंदीबाईलाही त्यांचा संताप आला. रघुनाथरावांच्याच अंगावर उसळून ती म्हणाली,

" काय हें तुमचं बोलण्यांत बोलणं नाहीं. त्यांचा असा विश्वासघात करायचा होता, तर अगोदर बेलभंडार कशाला दिलात. आतां ते काय म्हणून ऐकतील ?"

आनंदीबाईच्याही ह्या बोलण्याकडे लक्ष न देतां रघुनाथरावांनीं पुन्हा सुमेरसिंगाला सांगितलें,

" चालता हो म्हणतों ना ? नारायणाला धरायचा नाहीं."

सुमेरसिंग खवळून म्हणाला,

" नुसता धरायचा नाहीं, तर ठार मारायचा आहे."

रघुनाथरावही तसेच खवळून म्हणाले,

" मुस्काड फोडून टाकीन वाटेल तें बोललास तर."

" कोण वाटेल तें बोलतोय ? तुम्ही का मी ?"

लागलीच सुमेरसिंगानें जोरावरसिंगाच्या खिशांतील रघुनाथरावांचा हुकूम काढला आणि त्यांतल्या एका ओळीवर बोट ठेवीत तो म्हणाला,

" हें काय आहे ? 'रावास मारावें.' तुमच्या सहीशिक्क्याचा हुकूम !" बोलतां बोलतां हुकमाची घडी करून सुमेरसिंगानें ती पुन्हा जोरावरसिंगाकडे ठेवण्यास दिली.

हुकमांतले 'रावास मारावें' हे शब्द पाहातांच रघुनाथराव विस्मयचकित झाले. ते आश्चर्यानें ओरडून म्हणाले,

" कोण म्हणतंय रावास मारावें ? रावास धरावें असा मीं हुकूम दिला होता. मारावें असा तुला कुणीं हुकूम दिला ?"

आनंदीबाई एकदम पुढें झाली आणि म्हणाली, " मीं, मीं दिला तो हुकूम. 'ध' चा 'मा' मीं केला. तुमच्यासाठीं, तुम्हांला पेशवे

करण्यासाठीं, तुम्हांला पेशव्यांच्या गादीचे धनी करण्यासाठीं, मीं तो हुकूम दिला."

रघुनाथराव हताश झाले. त्यांच्या मनांत परस्परविरोधी विचारांचा नुसता कल्लोळ उडाला. त्यांची मुद्रा बावरी झाली. ते तशाच मुद्रेनें आनंदीबाईकडे पाहात होते, तों नारायणाची अंत:करण पिळवटून टाकणारी दीन हाक आली,

"काका, काका, मला वांचवा हो!"

त्याबरोबर रघुनाथरावांनीं सुमेरसिंगाला पुन्हा हुकमी स्वरांत सांगितलें,

"मी दुसरा हुकूम देतों, निघून जा, रावाच्या अंगाला हात लावूं नको."

"आतां हा हुकूम ऐकायला मी बेवकूफ नाहीं. रावाला आत्तां सोडून मी माझीं पाळंमुळं खणून घेणार नाहीं. श्रीमंत, रावाला मुकाट्यानें सोडा."

रघुनाथराव कांहीं बोलले नाहींत, पण नारायणरावाला त्यांनीं सोडलें नाहीं, तेव्हां सुमेरसिंगानें आपल्या तरवारीची मूठ राघोबांच्या हातावर मारली. त्याबरोबर नारायणरावाला घातलेला त्यांचा विळखा सुटला. तुळ्यानें नारायणरावाला राघोबापासून ओढून सुमेरसिंगापुढें आडवें टाकलें. सुमेरसिंगानें नारायणरावावर सपासप वार करून त्याचे तुकडे तुकडे केले. रक्तानें माखलेली तरवार वर नाचवीत खून चढलेल्या सुरांत तो मोठ्यानें ओरडला,

"दुष्मन मारला, सरकार, खुषी करावी."

नारायणरावाच्या रक्तांत हात बुडवून रघुनाथरावांच्या कपाळाला त्याचा टिळा लावीत सुमेरसिंगानें पुन्हा तोच विजयनाद केला,

"दुष्मन मारला, सरकार, खुषी करावी."

आनंदीबाईनें आपल्या गळ्यांतला मोत्यांचा कंठा सुमेरसिंगाच्या अंगावर फेकला. रघुनाथरावाजवळ जाऊन आनंदाच्या कांहींशा लाडिक स्वरांत ती म्हणाली,

"ऐकलं का? सुमेरसिंगानें तुमचा दुष्मन् मारला, तुम्हांला मुक्त केलं, तुम्हांला पेशवा केलं, तुम्हांला धनी केलं, त्याची खुषी करा."

रघुनाथरावांची चर्या फारशी बदलली नव्हती, तरी ती किंचित् हसरी झाल्याचा भास झाला. त्याच भावनेनें ते सुमेरसिंगाला म्हणाले,

"तुला अभय आहे. आजपासून पहिल्या मानाचा सरदार केला आहे तुला!"

त्याबरोबर सुमेरसिंग, जोरावरसिंग व इसुफखान ह्यांनीं जयजयकार केला,

"श्रीमंत रघुनाथराव पेशवे की जय, श्रीमंत रघुनाथराव पेशवे की जय."

# २१

ज्यांनीं गादीचा धनी मारला, त्यांनींच रघुनाथरावांचा जयजयकार करून दुसरा धनी त्याच वेळीं अशा रीतीनें जाहीर केला. त्याला छत्रपतींच्या आज्ञेनें मान्यता मिळाली हें राज्यांत रीतसर जाहीर करण्यासाठीं, पूर्वीप्रमाणेंच आज शनिवारवाड्यांत दरबार भरणार होता. हा दिवस सगळ्यांनीं आनंदांत घालवावा व एक प्रकारें नगरवासीयांनींही रघुनाथरावांच्या 'धनी'पणाला मान्यता द्यावी म्हणून गांवभर दवंडी पिटवली होती,

"होऽहोऽहोऽएकून एक नगरलोक ऐका हो ऐका. आज शिरिमंत रगूनातराव, पेशव्यांच्या गादीवर बसनार म्हनूनशान साऱ्या नगर लोकांनीं उच्छाव करा. घर घर गुडी उबारा नि मानूस न् मानूस गूळपोळी खावा होऽहोऽ."

पण हा प्रसंगच असा होता, कीं त्यांत पुष्कळ मतभेद असावेत. उत्सव करून गूळपोळी खाण्याची ही वेळ नव्हे असें कित्येकांना

वाटत होतें, तर कित्येकांना त्याच्या अगदीं उलट वाटत होतें. पण कांहीं असलें, तरी राजाज्ञा पाळलीच पाहिजे अशा बुद्धीनें आपापल्या परीनें सर्व उत्सव करीत होते. मनाचा सदसद्विचार बाजूला सारून राजाज्ञेनें, राजनिष्ठेचें ढोंग करणें, हें पाप आहे म्हणून जे लोक स्वस्थ राहिले होते, त्यांना राजदूत ती आज्ञा पाळण्यास भाग पाडीत होते. आनंदोत्सवाचें जें बाह्य चिन्ह, घरावर गुढी उभारणें, तें तरी ते त्यांच्याकडून करवून घेत होते. त्यांत त्यांना पुष्कळ यशही येत होतें. पण रामशास्त्र्यांच्या पुढें त्यांचा कांहीं इलाज चालला नाहीं. आपल्या घरावर जबरीनें गुढी उभारूं पाहाणाऱ्या राजदूतांना त्यांनीं अगदीं स्पष्टपणें खडसावून सांगितलें,

"श्रीमंतांच्या मृत्यूनें मी सुतकी आहें, माझ्या घरावर हें मंगलचिन्ह मी मुळींच लावूं देणार नाहीं."

असें म्हणत राजदूतांना धुडकावून ते आंत सदरेवर आले न आले तोंच त्यांच्या दारांत एक मेणा उतरला. त्यांतून सखारामबापू आणि भवानराव प्रतिनिधि बाहेर आले. सदरेवर रामशास्त्र्यांना पाहातांच दोघांनींही त्यांना नमस्कार केला. पण सुतकी रामशास्त्र्यांनीं परत नमस्कार करून त्यांचा नमस्कार स्वीकारला नाहीं. हे दोघेही श्रीमंत रघुनाथरावांकडून शास्त्रीबोवांना दरबारचें आमंत्रण देण्यास आले होते. बापू म्हणाले,

"श्रीमंतांकडून निरोप आला आहे; गुंता उरकला, आतां सर्वांनीं आजच्या दरबारला हजर राहावं, दौलतीला साहाय्य करावं, असं त्यांचं म्हणणं आहे."

रामशास्त्री कांहींशा चिडलेल्या स्वरांत म्हणाले,

"बापू, पुण्यासारख्या राजधानींत, पेशव्यांच्या वाड्यांत, दिवसा ढवळ्या खुद्द पेशव्यांचा खून होतो आणि तुमच्यासारखे पेशवाईचे धुरंधर दरबार साजरे करतात, गांवांत गुढ्या तोरणें उभारतात, ह्याचा अर्थ काय?"

बापूंना तो टोमणा झोंबला. त्याच तिखट सुरांत त्यांनीं रामशास्त्र्यांना विचारलें,

" श्रीमंतांचा खून झाला, म्हणून हा आनंदोत्सव चालला आहे, असं का आपलं म्हणणं आहे ? "

" हो. कां म्हणूं नये असं ? तसं नसतं तर खून करणारा सुमेरसिंग राजरोसपणें कां वावरला असता ? त्याला कां पकडला नाहीं ? त्याला कां शासन झालं नाहीं ? "

हें म्हणतांना रामशास्त्र्यांचा स्वर आणि झालेलें रूप पाहून बापूंनीं एकदम पडतें घेतलें. ते कांहींशा मऊ स्वरांत म्हणाले,

" हें पाहा शास्त्रीबुवा, राजकारणाचा गुंता आहे हा ! तो सोडवण्याच्या भानगडींत आपण आज तरी पडूं नये.... "

त्यांना अधिक बोलूं न देतां रामशास्त्री मध्येंच निश्चयानें म्हणाले,

" ठीक आहे. तर मग पेशवाईला डाग लावणाऱ्या ह्या प्रकरणाचा न्याय्य निवाडा झाल्याखेरीज तुमच्या कारभारांत एकही शब्द मी बोलणार नाहीं. "

" मग आमचा नाइलाज आहे. "

असें म्हणून दोघेही नमस्कार करून निघून गेले. पण ह्या सगळ्या प्रकारानें रामशास्त्री फार अस्वस्थ झाले. त्याच स्थितींत ते माडीवर जाऊन उगीचच इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागले. तोंच बाहेर रघुनाथराव पेशव्यांच्या नांवाचा जयघोष ऐकूं आला, म्हणून त्यांनीं खिडकीशीं जाऊन बाहेर पाहिलें, तों रघुनाथरावांची मिरवणूक चालली होती. सुमेरसिंग सरदारी पोषाखांत अग्रभागीं होता. तो देखावा पाहून रामशास्त्री चिडले. तें पाहाणेंदेखील नको, म्हणून त्यांनीं खिडकी लावून घेतली. ते मागें वळतात, तों शामा उभी. त्यांनीं तिला आश्चर्यानें विचारलें,

" कोण ? शामा ? काय पाहिजे तुला ? "

" न्याव ! "

काडली. इतक्यामंदी माज धनी आल, त्येची तरवार वरच्यावरच उडविली त्येनीं. जोरावरसिंगानं दुसरी तरवार काडली, दोगांची लडाई जुपली तवा माज्या धन्यानें म्हटलं, 'शामा, तूं शिरिमंतांकड जा अदुगर.' म्या म्हटलं, 'जी. मी जातु, पन ह्येच्याजवळ पत्र हाये त्ये काय वी करून मिळवा."

रामशास्त्री उत्सुकतेनें म्हणाले,

"कुठें आहे तें पत्र ?"

एक दीर्घ सुस्कारा टाकून शामा म्हणाली,

"कुनाला दक्कल होरं काय काय झालंया त्ये ?"

एक मोठा सुस्कारा टाकून रामशास्त्री निराशेनें म्हणाले,

"मग काय उपयोग त्याचा! असल्या बेजबाबदार पुराव्यावर कोण विश्वास ठेवील ?"

पण योगायोगच म्हणायचा! त्याच वेळीं जखमी राणोजी दरवाजांत आला. त्यानें हाक मारली, "शामा! शामा!!" ती ऐकल्याबरोबर "धनी, धनी" म्हणत शामा त्याच्याकडे गेली.

राणोजी अगदीं घायाळ झाला होता. तो कसेंतरी म्हणाला,

"शामा, त्या हरामखोराला छिनलं, हें घे पत्र.

तिनें राणोजीला नीट बसविलें आणि पत्र घेऊन ती शास्त्रीबोवांकडे धावत आली व म्हणाली,

"सेस्त्रीबावा, सेस्त्रीबावा, हे बगा त्ये पत्र."

रामशास्त्र्यांनीं तें पत्र घेतलें. एकदा वाचलें, दोनदा वाचलें, तीनदा वाचलें. वाचतां वाचतां त्यांच्या मनांत अनेक विचारांचें काहूर उसळलें. अखेरीस त्यांनीं एक निश्चय केला. ते वळले. घाईघाईनें त्यांनीं कपडे चढवले. डोक्यावर पागोटें ठेवलें आणि देवाला नमस्कार करण्यासाठीं ते देवघरांत आले. त्या वेळीं जानकी पूजा आटोपून तीर्थ घेत होती. ते धीर गंभीर स्वरानें म्हणाले,

"मलाही तीर्थ दे."

२९५८
भारत
१८८८

जानकीनें एकदम वळून मागें पाहिलें. रामशास्त्र्यांचा कचेरीचा पोषाख पाहून ती आश्चर्यानें म्हणाली,

" म्हणजे ? "

असें म्हणत म्हणतच तिनें त्यांच्या हातावर तीर्थ घातलें. तें त्यांनीं घेतलें. ओला हात पुसण्यासाठीं ते इकडे तिकडे पाहूं लागले, तों जानकीनेंच पुढें होऊन आपल्या पदरानें त्यांचा ओला हात पुसला. ती पुढें म्हणाली,

" आज कचेरी आहे ? "

रामशास्त्र्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं तिच्याकडे पाहिलें. कांहीं तरी बोलावें असें वाटून त्यांचे ओठ हलले. पण त्यांनीं लागलीच निश्चय केला. ते म्हणाले,

" जानकी, जातों मी ! "

जाण्यासाठीं ते एकदम वळले देखील. त्यांचा एकंदर आविर्भाव पाहून जानकी कांहींशी बेचैन झाली. त्यांना अडवून ती म्हणाली,

" आज सगळंच वागणं इतकं चमत्कारिक कां होतंय् ? बाहेर जातांना नेहमीं ' मी जाऊन येतों हं ' असा निरोप घ्यायचा नि आजच माझं नांव घेऊन ' जातों ' असं कां म्हणायचं ? "

" खरंच मी तुझा निरोप घेतों आहें. निरोप घेतांना हृदय भरून येतं नि सहजच उमाळ्यानें आवडत्या माणसाचं नांव तोंडांतून निघतं. "

" अशा बोलण्यानें माणसाचा धीर सुटतो. "

" पण माझी जानकी अशा सामान्य माणसांसारखी नाहीं. मी काशीला गेलों त्या वेळीं केवढ्या धीरानें तूं सगळं सहन केलंस ? घर सांभाळलंस, आईला सांभाळलंस. तुझं कर्तृत्व आणि तुझा धीर पाहिला म्हणजे वाटतं, सत्याचं नि न्यायाचं व्रत पाळण्यासाठीं तरवारीच्या धारेखालीं आज मला वैकुंठाची यात्रा करावी लागली तरी हरकत नाहीं, मागें जानकी आहे, ती सगळं सांभाळील. "

"...ह्यांच्यासारख्या भ्याडाची त्या पवित्र गादीला स्पर्श करण्याची देखील हिंमत होणार नाहीं."

रामशास्त्री एकदम वळले व बाहेर निघाले. समोरून त्यांचा मुलगा गोपाळ येत होता. त्याला चटदिशीं उचलून घेऊन त्यांनीं त्याचा मुका घेतला, त्याला खालीं ठेवलें व म्हटलें,

“जा. आईकडे जा. ती सांगेल तें ऐक, ती शिकवील तें शीक. माझा तुला आशीर्वाद आहे.”

गोपाळ आईकडे गेला. तिनें त्याला जवळ घेतलें. रामशास्त्र्यांनीं त्या दोघांकडेही एक अखेरची अर्थपूर्ण दृष्टि टाकली आणि पुन्हा मोह पडूं नये म्हणूनच कीं काय, ते तेथून एकदम झटकले.

★

# २२

इकडे शनिवारवाड्यांतील हेरंब महालांत दरबार पूर्णपणें भरला होता. सगळे सरदार, दरकदार, मानकरी, आपापल्या मानाप्रमाणें व्यवस्थित बसले होते. बायकांच्या दालनांत, पूर्वी गंगाबाई बसल्या होत्या त्या ठिकाणीं आज आनंदीबाई ‘धनि’णीच्या दिमाखांत बसली होती. दोन दासी तिच्यावर चवऱ्या ढाळीत होत्या. दरबारांत जमलेल्या प्रत्येक माणसाकडे आनंदीबाई विशेष शोधक दृष्टीनें पाहात होती. तोंच रघुनाथरावदादांची मिरवणूक दारांत आल्याचा जयघोष ऐकूं आला. सगळा दरबार सावध झाला. आनंदीबाई मोठ्या उत्सुकतेनें रघुनाथरावांच्या येण्याच्या रस्त्याकडे पाहूं लागली. हेरंब महालाच्या प्रवेशद्वाराशीं येतांच त्यांच्या आगमनाची सूचना देणारे भालदार चोपदार ललकारले. सगळा दरबार खडा झाला. रघुनाथरावांना पंतप्रधान पेशव्यांच्या दरबारी पोषाखांत पाहातांच आनंदीबाई देखील हर्षातिशयानें, जणूं त्यांचें स्वागत करण्यासाठींच, आपल्या आसनावर उठून उभी राहिली. रघुनाथरावांवर तिची साभिमान

दृष्टि अचल झाली. सुवासिनींच्या आरत्या झाल्या. दरबारी लोकांचे मुजरे होऊं लागले. मुजरे घेत घेत रघुनाथराव पेशव्यांच्या 'मसनदी' कडे चालूं लागले. त्यांच्या एका बाजूला, त्यांनीं केलेला नवा सरदार सुमेरसिंग, खरकसिंग, इसुफखान, वगैरे मंडळी, तर दुसऱ्या बाजूला सखारामबापू, त्रिंबकजीपंत, भवानराव प्रतिनिधि, वगैरे मंडळी चालली होती. चालतां चालतां रघुनाथराव मध्येंच थबकले. ते सगळे सरदार, नि दरबारचा तो सगळा देखावा पाहून रघुनाथरावांना एकदम कसली तरी स्मृति झाली. त्या स्मृतीनें त्यांना खरोखरीच वाईट वाटलें कीं काय, हें सांगणें कठीण आहे. पण त्या वेळीं त्यांचे डोळे मात्र पाण्यानें भरले. त्याच स्थितींत ते सगळ्या दरबारला उद्देशून म्हणाले,

"मी दुर्भागी! राव मारला गेला, मीच जिवंत राहिलों, वाईट वाटतं मला."

त्यांची स्थिति जाणून त्यांचें समाधान करण्याच्या सुरांत सखाराम-बापू म्हणाले,

"श्रीमंत जाणते आहेत. कर्तव्यापुढें शोक आवरला पाहिजे. मराठी राज्यांतले सगळ्या हिंदुस्थानचे मानकरी नव्या पेशव्यांना मानाचा मुजरा करायला उत्सुक झाले आहेत. पेशव्यांच्या अनाथ झालेल्या या गादीला आम्हां सगळ्यांच्या साक्षीनें श्रीमंतांनीं सौभाग्य द्यावं."

असें म्हणत बापू श्रीमंतांचा हात धरून त्यांना चालवूं लागले, तोंच "थांबा, थांबा" असा धीरगंभीर पण हुकमी आवाज त्यांना ऐकूं आला. त्याबरोबर सगळ्यांनीं चमकून मागें पाहिलें.

ते रामशास्त्री होते. त्यांना असे एकाएकीं आलेले पाहून बापूंना व भवानरावांना आश्चर्य वाटलें. रघुनाथराव मनांतल्या मनांत चरकले. आनंदीबाई तर संतापानें बेचैन झाली. शास्त्रीबोवा बाह्यत: तरी गंभीर व निर्विकार मुद्रेनें, पण सगळ्या दरबारी लोकांच्या, मुख्यत: रघुनाथ-रावांना कोंडाळें करून गादीकडे नेत असलेल्या लोकांच्या, चर्या

तीक्ष्ण व भेदक नजरेनें पाहात रघुनाथरावांजवळ आले. अगदीं शांत स्वरानें ते म्हणाले,

"पेशवाईचा न्यायाधीश म्हणून श्रीमंतांना गादीकडे नेण्याचा मान माझा आहे."

रामशास्त्र्यांनीं त्यांचा हात धरला. ते त्यांना गादीकडे चालवूं लागले. रघुनाथरावांनीं एक सुस्कारा टाकला. ते कांहींशा दुःखी पण रुक्ष स्वरांत रामशास्त्र्यांना उद्देशून म्हणाले,

"शास्त्रीबुवा, नारायणाला मीं माझ्या पोटच्या मुलाप्रमाणें वागवलं हो! गारद्यांच्या गर्दीत तो मारला गेला, अंतःकरण कसं तिळ तिळ तुटतंय् माझं!"

"आपल्या अंतःकरणांत कसली कालवाकालव चालली आहे, हें मी ओळखत का नाहीं?"

रघुनाथराव थोडे उल्हसित होऊन म्हणाले,

"शास्त्रीबुवा, तुमच्या या स्वामिनिष्ठेनें आम्हांला धीर आला. आमच्याही राज्यांत तुमची नेमणूक कायम राहील. पेशवाई न्यायाचा दरारा हिंदुस्थानभर गाजत राहाण्यासाठीं आमची तरवार सदैव तुमची पाठ राखील."

"त्याची मला खात्री आहे. तसाच प्रसंग आला, तर पेशव्यांच्या न्यायाची प्रतिष्ठा राखण्यासाठीं आपल्या हातून ती काढून घ्यायलाही हा न्यायाधीश रामशास्त्री भिणार नाहीं."

शास्त्रीबोवांच्या बोलण्यांतली छुपी धार रघुनाथरावांना झोंबली. त्यांनीं चमकून शास्त्रीबोवांकडे पाहिलें. आनंदीबाईचीही चुळबूळ सुरू झाली. या वेळीं दोघेही गादीजवळ आले होते. शास्त्रीबोवा पुढें म्हणाले,

"चलावं श्रीमंत, ही पेशव्यांची 'मसनदी' आहे. श्रीमंत बाजीराव या गादीवर होते, तेव्हां भीमथडीच्या लाटांचा प्रतिध्वनि गंगाकिनारीं उमटत होता. माधवराव या गादीवर होते, तेव्हां हैदर निजामापासून दिल्लीच्या पातशाहीपर्यंत हिच्या जरीच्या तेजानें

हिंदुस्थान दिपत होतं आणि श्रीमंत माधवराव थेऊरला वारले आपण होतात तिथें, त्यांना अंतकाळीं आपण वचन दिलं होतं, 'नारायण माझा आहे. मी सांभाळ करीन त्याचा' !"

त्या आठवणीनें बेभान होऊन रघुनाथराव ओरडले,

"शास्त्रीबुवा ! शास्त्रीबुवा ! !"

"भीति कशाची वाटली श्रीमंत ! उचला पाऊल. ही पेशव्यांचीच 'मसनदी' आहे. हिरवाच रंग आहे तिचा ! रक्तानें लाल झालेला नाहीं."

आतां मात्र आनंदीबाईला राहवलें नाहीं. तिनें निषेधाच्या अधिकारी स्वरांत, बापूंच्या नांवानें सगळ्या दरबारला दबावलें,

"बापू, हा काय पोरखेळ चालला आहे ?"

शास्त्रीबोवांनीं आनंदीबाईकडे एकवार रोखून दृष्टि टाकली पण तिकडे लक्ष दिलें नाहीं. ते रघुनाथरावांनाच म्हणाले,

"चलावं श्रीमंत, बाईसाहेब अधीर झाल्या आहेत. काय ? गादीवर बसण्याची भीति वाटते ? छेः छेः तसं वाटण्याचं कांहीं कारण नाहीं, गादीवर कोणी नाहीं. गादी रिकामी आहे. माधवराव गेले, नारायणराव गेले, होय, खरंच गेले ते ! आठवतं ना आपल्याला, गारद्यांनीं घाव घातले, तेव्हां त्यांनीं किंकाळी फोडली, ' काका, मला वांचवा, काका, मला वांचवा.' "

रामशास्त्र्यांनीं ते शब्द अशा तऱ्हेनें उच्चारले, कीं नारायणरावाची अखेरची किंकाळीच आपण ऐकतों आहों, असें रघुनाथरावांना वाटलें. ते शब्द पुन्हा पुन्हा त्यांच्या कानांत घुमूं लागले. ते भेदरले. मागें पाय घेत ते एकदम म्हणाले,

"नाहीं, नाहीं, मी या गादीवर बसणार नाहीं."

"श्रीमंत, श्रीमंत," करीत बापूंनीं त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला, तरीही रघुनाथराव मागें पाय घेऊं लागले. तेव्हां आनंदीबाईनें रघुनाथरावांना उद्देशून म्हटलें,

" काय हें ? काय हें ? मागें फिरावं, गादीवर बसावं."

आतां मात्र रामशास्त्र्यांनीं आपलें उग्र रूप धारण केलें. आनंदीबाईला व रघुनाथरावांना चांगलेंच झोंबेल अशा तिखट, उपरोधी स्वरांत ते म्हणाले,

" कसे बसतील ? थोरल्या बाजीरावसाहेबांची पवित्र गादी आहे ती ! शत्रूंचंच रक्त पिऊन मस्त झालेली आहे ती ! यांच्यासारख्या भ्याडांना तिला स्पर्श करण्याची देखील हिंमत होणार नाहीं."

" हां, हां, शास्त्रीबुवा," शिंदे मध्येंच म्हणाले, " तुमच्या जागीं दुसरा कोणी असता तर त्याची जीभच छाटली असती. दर रिकिबीला तरवार गाजवीत जो देशोदेशीं सफेगंजी उडवीत होता, उत्तरेंतल्या चौपन्न पातशाहीला ज्यानें एक वेळ जेरदस्त केलं होतं, थेट रुमशामच्या तक्ताला ज्यानें शह दिला होता, तो भ्याड ?"

रामशास्त्र्यांनीं शिंद्यांच्याच आवाजांत त्यांना उत्तर दिलें,

" भ्याड, भ्याड, नामर्द, पापी, गादीच्या लोभानें प्रत्यक्ष पुतण्याचा खून करवणारा मांग."

आतां मात्र आनंदीबाईच्यानें राहावेना. तिनें सगळ्या दरबारलाच विचारलें,

" भर दरबारांत पेशव्यांचा अपमान करणाऱ्या या राजद्रोह्याच्या अजून कुणीच कशा मुसक्या बांधीत नाहीं. दरबारांत जमलेले सगळेच पुरुष अगदीं नामर्द आहेत काय ?"

रामशास्त्र्यांनींच आनंदीबाईला ठासून उत्तर दिलें,

" होय बाईसाहेब, या दरबारांत जमलेले सगळे पुरुष नामर्द आहेत. हे सखारामबापू आणि हे प्रतिनिधि आपल्या पापाच्या विक्राळ दर्शनानें हतबुद्ध झाले आहेत. नाहींतर गादीच्या खऱ्या धन्याचा खून करून त्याच्या रक्तानें कपाळ माखून, गादीवर चढणाऱ्या या राज्यलोभ्याला प्रतिनिधि, तुम्ही, बापू, तुम्ही, खालीं ओढला असतात."

शास्त्रीबोवांनीं केलेल्या या धडधडीत आरोपानें रघुनाथराव तर गोंधळून गेले. कांहींशा बावचळलेल्या सुरानें ते म्हणाले,

" नारायणरावाचा खून मीं केला? नाहीं, नाहीं, मीं नाहीं केला खून ! या गार्द्यांच्या गर्दीत...."

" अस्सं ! गार्द्यांनीं खून केला म्हणतां ? आणि म्हणून या खुनी हरामखोरांना मानाचे शिरपेंच दिलेत? अं ? श्रीमंतांच्या पायपोसा-जवळ सुद्धा उभें राहाण्याची ज्यांची योग्यता नाहीं, त्या सुमेरसिंग-खरकसिंगाला...."

सुमेरसिंग एकदम तरवार उसपून रामशास्त्र्यांच्या आंगावर ओरडला,

" खामोश बम्मन !"

पण त्याच्या दरडावणीला न दबतां रामशास्त्री एक पाऊल पुढेंच सरले आणि म्हणाले,

" थांबलास कां? उचल, उचल ती तरवार, म्हणजे तिच्यावर असलेले नारायणरावांच्या रक्ताचे डाग तरी या मानकऱ्यांना दिसतील आणि या मारेकरी पेशव्याला मुजरा करण्यासाठीं तिष्ठत राहिलेल्या या नागपूरकर भोसल्यांचं, या ग्वाल्हेरकर शिंद्यांचं अजून घोरत पडलेलं इमान कदाचित जागं होईल."

" खबरदार शास्त्रीबुवा " शिंदे म्हणाले, " आमच्या इज्जतीचा अपमान करणारी नि गादीच्या धन्यावर पुराव्याशिवाय बेगुमान आरोप करणारी जीभ आतां आवरा."

" पेशव्यांच्या दौलतीचा न्यायाधीश हा रामशास्त्री भरपूर पुरावा असल्याशिवाय कधींही आरोप करणार नाहीं. शिंदे, भोसले आणि इथें जमलेल्या मराठी राज्यांतल्या सर्व मानकऱ्यांनो, हा पाहा पुरावा, यांच्या सहीचा अस्सल हुकूम !"

रामशास्त्री आतां पुरावा बाहेर काढणार, तोंच आनंदीबाईनें सुमेरसिंगाला हुकूम दिला,

" सुमेरसिंग, खरकसिंग, पकडा त्याला, बेड्या ठोका त्याच्या पायांत."—

"घे त्रिवार मुजरा
तुला महाराष्ट्राचा."

२९५५८
बालकवाङ्मय
१६२८
दि. २४।६१

सुमेरसिंग, खरकसिंग रामशास्त्र्यांना पकडण्यासाठीं पुढें झाले. त्याबरोबर शिंदे आडवे आले आणि सुमेरसिंगाला दरडावून म्हणाले,

" खबरदार सुमेरसिंग, मागं फीर, न्यायाची इज्जत राखण्यासाठीं शिंद्यांच्या तरवारी रामशास्त्र्यांचं रक्षण करतील."

शिंद्यांचे लोक नागव्या तरवारी घेऊन रामशास्त्र्यांचें रक्षण करण्यासाठीं पुढें झाले. तें पाहून रामशास्त्री म्हणाले,

" शाबास शिंदे, गादीच्या रक्षणासाठीं बाहेर निघालेल्या तुम्हां वीरांच्या तरवारी, बेइज्जत करणाऱ्याच्या रक्ताचा घोट घेतल्याशिवाय म्यान होत नाहींत, हें मी जाणतों. माझा पुरावा खोटा ठरला, तर खुश्शाल माझ्या रक्ताचा घोट घेऊन तुमच्या तरवारी म्यान करा."

असें म्हणत रामशास्त्र्यांनीं खिशांतलें पत्र काढलें, सगळ्या दरबारला ऐकूं जाईल व समजेल इतक्या मोठ्या व स्पष्ट आवाजांत ते तें वाचूं लागले,

" राजेश्री सुमेरसिंग, खरकसिंग, इसुफखान व जोरावरसिंग गारदी, जमादार निसबत, खासा हुजूरात यांसी, तुम्हीं समक्ष कबूल केल्याप्रमाणें रावास मारावें. त्याबद्दल तुम्हांला पांच लक्ष रुपये रोख आणि नगर, पुरंदर व साष्टी हे तीन किल्ले देण्याचा करार केला असे."
पत्र वाचून झाल्यावर शास्त्रीबोवा सगळ्या सरदारांना उद्देशून म्हणाले,

" खास हस्ताक्षराची सही आणि श्रीमंतांचा खास शिक्का. ऐकलात हुकूम ? पाहिलात सहीशिक्का ? आतां खुशाल या मारेकरी मांगाला पेशव्यांच्या पवित्र गादीवर चढवा आणि या खुनी गार्द्यांच्या बरोबर तुम्हां स्वामिनिष्ठांचेही मुजरे त्यांना झडूं द्यात."

आतां रघुनाथरावांना बोलायला तोंडच नव्हतें. ते अगदीं आर्जवी स्वरानें शास्त्रीबोवांना म्हणाले,

" शास्त्रीबुवा, राजकारणाचा कठीण मामला आंगावर पडला, म्हणजे जाणतं नेणतं अनुचित कर्म घडतं हातून."

रामशास्त्री मध्येंच उसळून म्हणाले, "घडतं? घडलं नाहीं, हें अनुचित कर्म तुम्हीं मुद्दाम केलं आहे."

त्यावर कांहींशा अधिकारी सुरांत रघुनाथराव म्हणाले, "शास्त्रीबुवा, मी विचारतों तेवढंच सांगा. तुम्ही धर्मशास्त्रपारंगत शास्त्री एवढ्याच नात्यानें मी तुम्हांला विचारतों आहें. आपद्धर्म म्हणून मनुष्याच्या हातून घडलेल्या अनुचित कर्माला तुमच्या शास्त्रांत कांहीं प्रायश्चित्त आहे का?"

रामशास्त्र्यांनीं गंभीरपणें उत्तर दिलें, "आहे. असलं अनुचित कर्म करणाऱ्याला शास्त्रानें प्रायश्चित्त सांगितलं आहे."

"असलं तर सांगा. तुमच्यासाठीं आणि सामान्य जनतेच्या समाधानासाठीं आम्हीं तें घेऊं पाहिजे तर...."

"असल्या अनुचित कर्माला धर्मानें एकच प्रायश्चित्त सांगितलं आहे नि तें देहान्त प्रायश्चित्त आहे."

तें प्रायश्चित्त ऐकतांच आनंदीबाईनें संतापातिरेकानें गारद्यांना हुकूम दिला,

"सुमेरसिंग, खरकसिंग, भेकडासारखे ऐकतां काय? पकडा त्याला, बेड्या ठोका त्याच्या पायांत."

त्या हुकमाप्रमाणें सुमेरसिंग, खरकसिंग रामशास्त्र्यांना पकडण्यास धावले, तोंच शिंदे ओरडून म्हणाले,

"हां हां सुमेरसिंग, खरकसिंग, लक्षांत ठेवा. आतां शास्त्रीबुवांच्या केसाला धक्का लागला, तर बेदिली माजेल, दरबारांत रक्त सांडेल."

"शिंदे, तुम्ही कशाला उगीच दंगल माजवताय? प्रत्यक्ष पुतण्याच्या रक्ताचा टिळा लावून गादीवर बसणाऱ्या धन्याचा आणि त्याला साहाय्य करणाऱ्या या चांडाळचौकडीचा धिक्कार करून मीच निघून जातों." रामशास्त्री आवेशानें जाऊं लागले व जातांजातां म्हणाले,

"पेशव्यांच्या पवित्र गादीवर बाईलबुद्धि, खुनी पेशवा आहे तोंपर्यंत रामशास्त्री या पुण्यांत पाणी सुद्धा पिणार नाहीं."

आतां मात्र रामशास्त्री झप् झप् पावलें टाकूं लागले. तोंच शिंदे पुढें झाले. ते जणूं काय सगळ्या दरबारच्या वतीनें म्हणाले,

"शास्त्रीबुवा, तुम्ही आज पेशवाईची अब्रू राखलीत, श्रीमंत माधवरावांच्या आत्म्याला समाधान दिलंत. गादीला मुजरा करण्या-साठींच म्यानाबाहेर निघालेल्या मराठ्यांच्या या तरवारी आज मानाचा पहिला मुजरा तुम्हांला करीत आहेत."

शिंद्यांची तरवार रामशास्त्र्यांच्या चरणांवर तीन वार नमली. शिंद्यांच्या सगळ्या 'तरवारीं'नीं रामशास्त्र्यांना प्रणाम केले. त्यांच्या निष्ठुर भासणाऱ्या निःस्पृह न्यायदानाच्या प्रभावानें दिपून गेलेल्या दरबारांतल्या दुसऱ्याही 'तरवारी' रामशास्त्र्यांना तीन वार नमल्या. त्यांचे प्रणाम घेत घेत रामशास्त्री हेरंब महालांतून बाहेर पडले.

वाड्याच्या बाहेर नागरिकांची म्हणजे कोण गर्दी उसळली होती. त्यांत नाना तऱ्हांचे नि नाना विचारांचे लोक होते. रामशास्त्री दरबारांत जाण्यासाठीं घराबाहेर पडले त्या वेळीं लोकांनीं त्यांच्याबद्दल निरनिराळे तर्क केले होते. "तुमचे शास्त्रीबुवा दरबारला निघाले वरं. अहो सत्तेपुढें शाहाणपण चालत नाहीं. 'मी यंव करीन नि त्यंव करीन' म्हणणाऱ्या तुमच्या शास्त्रीबुवाला अखेरीला नाक घासावं लागलं." असें एक गृहस्थ म्हणाला; तर त्याला उत्तर म्हणून दुसरा एक गृहस्थ म्हणाला, "अहो, त्यांची चर्या बघा, त्यांचा आवेश बघा नि मग बोला. भर दरबारांत दादांच्या तोंडावर सांगायला भ्यायचा नाहीं आमचा शास्त्रीबुवा." त्यावर तिसरा गृहस्थ म्हणाला, "काय मजाल आहे शास्त्रीबुवांची तसं म्हणण्याची ? अहो ज्यानें नारायणराव पेशव्यांचीं सुद्धा खांडोळीं केलीं, त्याला शास्त्रीबुवांची काय किंमत ? त्याच्या जिभेचे राईराईएवढे तुकडे करतील दादासाहेब."

या गृहस्थाची कल्पना खोटी नव्हती. स्वतः रामशास्त्र्यांना सुद्धा तसेंच वाटत होतें; पण ते भ्याले नाहींत. दादांना प्रायश्चित्त सांगून ते बाहेर आले त्या वेळीं लोकांनीं त्यांचा प्रचंड जयजयकार केला.

शास्त्रीबोवा घरीं निघाले. लोकही त्यांचा जयजयकार करीत त्यांच्या मागून निघाले. शास्त्रीबोवांनीं घरीं जाऊन देवांची संबळी भरली. जानकीला आणि गोपाळला बरोबर घेऊन ते घराच्या बाहेर पडले. ते पुणें सोडून निघाले. लोकही त्यांचा जयजयकार करीत त्यांना पोचवण्यासाठीं वेशीपर्यंत आले होते. हास्यमुखानें नमस्कार करीत शास्त्रीबोवांनीं लोकांचा निरोप घेतला. लोकांनींही भरलेल्या अंत:करणानें मुजरा करीत शास्त्रीबोवांना निरोप दिला—

**घे त्रिवार मुजरा तुला महाराष्ट्राचा ।**
**अवतारच तूं नरवरा । ब्रह्मभास्करा सत्यधर्मांचा ।**
**घे त्रिवार मुजरा तुला महाराष्ट्राचा ।**
**नभिं चंद्र सूर्य झळकती । कीर्ति तंवर ती वाढत्या तेजें ।**
**गातील उद्यांचीं युगें पवाडे तुझे ।**
**धोक्यांत प्राण तरि ढळे न ब्रीद इमान ।**
**नच जुलमी सत्तेपुढें वाकते मान ।**
**तुजसमान पुरुषच देशाचा अभिमान ।**
**तुजमुळें जगीं वाढला, गौरव भला भरतखंडाचा ।**

— स. अ. शुक्ल

आणि खरोखरीच तो बाईलबुद्धि खुनी पेशवा गादीवर असेपर्यंत रामशास्त्री पुण्यास आले नाहींत. पुढें खुनाला वाचा फुटली, राघोबा दरबारी मुत्सद्द्यांच्या मनांतून उतरले. बारभाईचें कारस्थान झालें, तें सिद्धीलाही गेलें. श्री. गंगाबाईच्या पोटीं श्रीमंत सवाई माधवरावांचा जन्म झाला आणि त्यांच्या नांवानें राज्यकारभार सुरळीत चालूं लागल्यावर कारभाऱ्यांनीं रामशास्त्र्यांना पुन्हा न्यायाधीशपदावर आणलें. मग मात्र अखेरपर्यंत आपल्या नि:स्पृह न्यायदानानें ते सगळें भरतखंड निनादित करीत होते.



IRBK-0101966
IRBK-01019

शास्त्रीबोवा घरीं निघाले. लोकही त्यांचा जयजयकार करीत त्यांच्या मागून निघाले. शास्त्रीबोवांनीं घरीं जाऊन देवांची संबळी भरली. जानकीला आणि गोपाळला बरोबर घेऊन ते घराच्या बाहेर पडले. ते पुणें सोडून निघाले. लोकही त्यांचा जयजयकार करीत त्यांना पोंचवण्यासाठीं वेशीपर्यंत आले होते. हास्यमुखानें नमस्कार करीत शास्त्रीबोवांनीं लोकांचा निरोप घेतला. लोकांनींही भरलेल्या अंत:करणानें मुजरा करीत शास्त्रीबोवांना निरोप दिला—

**घे त्रिवार मुजरा तुला महाराष्ट्राचा ।**
**अवतारच तूं नरवरा । ब्रह्मभास्करा सत्यधर्माचा ।**
**घे त्रिवार मुजरा तुला महाराष्ट्राचा ।**
**नभिं चंद्र सूर्य झळकती । कीर्ति तंवर ती वाढत्या तेजें ।**
**गातील उद्यांचीं युगें पवाडे तुझे ।**
**धोक्यांत प्राण तरि ढळे न ब्रीद इमान ।**
**नच जुलमी सत्तेपुढें वाकते मान ।**
**तुजसमान पुरुषच देशाचा अभिमान ।**
**तुजमुळें जगीं वाढला, गौरव भला भरतखंडाचा ।**
**घे त्रिवार मुजरा अखेरचा हा आमुचा ॥**

— स. अ. शुक्ल

आणि खरोखरीच तो बाईलबुद्धि खुनी पेशवा गादीवर असेपर्यंत रामशास्त्री पुण्यास आले नाहींत. पुढें खुनाला वाचा फुटली, राघोबा दरबारी मुत्सद्द्यांच्या मनांतून उतरले. बारभाईंचें कारस्थान झालें, तें सिद्धीलाही गेलें. श्री. गंगाबाईंच्या पोटीं श्रीमंत सवाई माधवरावांचा जन्म झाला आणि त्यांच्या नांवानें राज्यकारभार सुरळीत चालूं लागल्यावर कारभाऱ्यांनीं रामशास्त्र्यांना पुन्हा न्यायाधीशपदावर आणलें. मग मात्र अखेरपर्यंत आपल्या नि:स्पृह न्यायदानानें ते सगळें भरतखंड निनादित करीत होते.

IRBK-0101966
IRBK-0101966